मूळ संस्कृत श्लोकांसह

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ऋग्वेद

भाग १९



षष्ठम् मंडलम्

प्रथम खंड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १९

षष्ठम मंडलम्

प्रथम खंड

सूक्त १ ते २५

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – **श्री. श्रीपाद काळे**

सहाय्य- **डॉ. हेमंत विंझे**

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १९

षष्ठं मंडलम् (प्रथम खंड)

सूक्त १ ते २५

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २५ ऑक्टोबर २०२६ (कोजागिरी पोर्णिमा)

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

पहिल्या मंडलाचे मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व “शांखायन” अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला “शाकल संहिता” असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती

मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

मनोगत

रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र पाडव्यापासून ऋग्वेदातील पहिला भाग ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केला. त्यानंतर गेल्या वर्ष अखेरी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १९१ सूक्ते आणि त्यातील २००६ ऋचाचा अनुवाद ई साहित्य प्रतिष्ठान यांनी ९ भागात प्रकाशित केला. पहिल्या भागातील सर्व १९१ सूक्त एकत्र घेऊन संपूर्ण पहिले मंडल सुद्धा ई साहित्य प्रतिष्ठानी प्रकाशित केले.

पहिले मंडल प्रकाशित करताना अनेक वाचकांनी अमूल्य अभिप्राय कळवला. त्यामुळे पुढील मंडल अनुवादित करण्यास ऊर्जा मिळत आहे

जानेवारी २०२६ पासून दुसऱ्या व तिसऱ्या मंड्लाचे काम पूर्ण केले. ही सर्व सूक्त एकच भागात प्रकाशित करत आहोत.

मे महिन्या पासून चवथे मंडल दोन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील हा पहिला भाग आहे.

श्रीपाद काळे

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे

संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

ऋग्वेदा बद्दल काही उपयुक्त माहिती

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरु परंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. त्यामध्ये "आश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व शांखायन सारख्या ऋषींनी श्लोकांची मांडणी केली परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे आपण ज्या ऋग्वेद पठण करतो ते शाकल ऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहेत शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला शाकल संहिता असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडळ असे म्हणतात. शाकल ऋषींनी श्लोकाची विभागणी केली त्याला मंडळ म्हणतात. मंडळातील प्रत्येक मंडळामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले . प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात . सर्व ऋचा या पद्य स्वरूपाच्या आहेत. शक्कल ऋषींनी तयार केलेल्या ऋग्वेदात १० मंडले, १०२८ सूक्ते, १०५५२ ऋचा आहेत.

श्रीपाद काळे

पंचम मंडलाविषयी

ऋग्वेदाचे पाचवे मंडळ प्रामुख्याने 'अत्री मंडळ' म्हणून ओळखले जाते.

या मंडळाची मराठीत थोडक्यात आणि महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एकूण सूक्ते: या मंडळात ८७ सूक्ते (स्तोत्रे) समाविष्ट आहेत. त्यामुळे याचे आपण चार भाग करणार आहोत प्रत्येक भागात २२ सूक्त असतील पाचव्या महिन्यातला पहिला भाग पाठवत आहे

या मंडळातील बहुतांश सूक्तांची रचना महर्षी अत्री आणि त्यांच्या वंशजांनी (उदा. श्यावाश्व, गविष्ठिर, भौम अत्री) केली आहे. त्यामुळे याला 'अत्री मंडळ' म्हणतात

सूर्यग्रहण कथा (सूक्त ५.४०): या मंडळातील ४० व्या सूक्तामध्ये एका ऐतिहासिक खगोलीय घटनेचा उल्लेख येतो. जेव्हा राहु आणि असुर स्वरभानूने सूर्याला आपल्या अंधाराने झाकले (सूर्यग्रहण झाले), तेव्हा महर्षी अत्री यांनी आपल्या मंत्रशक्तीने आणि प्रार्थनेने सूर्याला पुन्हा प्रकाशमान केले, अशी कथा यात आढळते.

श्रीपाद काळे

षष्ठम मंडलाविषयी

ऋग्वेदातील सहावे मंडल हे अत्यंत प्राचीन आणि महत्त्वपूर्ण मानले जाते.अनेक संशोधकांच्या मते हे भाषा आणि रचनेच्या दृष्टीने सर्वात जुने मंडल असण्याची शक्यता आहे.

हे मंडल पूर्णपणे भारद्वाज ऋषी आणि त्यांच्या वंशजांनी (भारद्वाज कुळ) रचलेले आहे.

या मंडलातील सूक्त ६१ (हे संपूर्णपणे सरस्वती नदीला समर्पित असून तिचे अफाट आणि पवित्र रूप यात वर्णिले आहे. या मंडलातील '६.४५.३१' या मंत्रामध्ये 'गंगा' या शब्दाचा उल्लेख आढळतो यामध्ये सुरुवातीच्या वैदिक काळातील पशुपालन, गाईंचे महत्त्व, आणि संपत्ती (मुख्यतः गोधन आणि धान्य) मिळवण्यासाठी देवांकडे केलेली प्रार्थना यावरून तत्कालीन सामाजिक जीवनाचा स्पष्ट आरसा दिसतो.

या मंडळातील २७ व्या सूक्ता मध्ये 'हरियूपिया' या नावाचा उल्लेख येतो. अनेक प्रसिद्ध इतिहासकार (उदा. डी. डी. कोसंभी) यांच्या मते, ऋग्वेदातील 'हरियूपिया' म्हणजेच सिंधू संस्कृतीचे प्रमुख शहर 'हडप्पा' असण्याची दाट शक्यता आहे.

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३९१

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२. फोन नं. : २५४१४५४/२५४०३६२. विश्वावसु वर्षे १९४५

E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

आषाढ शुद्ध १२ सोमवार

दि. ७/७/२०२५

श्री. डॉ. विठ्ठल हेमंत लक्ष्मण

मुंबई.

मो. 7678094624

वीरस्थ देवतेचे उत्तम आइतिथि व आपले नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात ते ही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय सुरुवाती आहे.

खरे तर आपण ऑनलाईनरित्या सर्जन. अनेकांची ऑपरेशन करत आपण या या लोकांनी आरोग्य प्राप्ती करून दिली. व या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृद्धांचे आशीर्वाद ही घेतले. फलीभाव असा झाला की व्यावहारिक निवृत्तीनंतर ही आपण आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध सत्कर्मी म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लावला. खरं तर ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व सर्वांच्या भाषेतील आशीर्वाद खूप आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुद्धा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुलकर्णी यांनी यजुर्वेदी लोक. व ऋग्वेद: सम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या श्रीमंत आबासाहेब देशपांडे बसून (वय ९८ वर्षे) ते अहर्निशपणे भाषांतर करत होते. असो. कदाचित ही संधी गरुडझेप असेल पण आम्हाला माहित कधी नव्हे.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच वीरस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा वीरस्थ देवतेचे अनेक आइतिथि व आपले नारायण स्मरण सर्वांस विदित करावे.

महानुग्रहांकित वरीवर्ति

श्री. जगद्गुरु शंकराचार्य.

करवीर पीठ.

कोल्हापूर.

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- अनुष्टुप्, ११ शक्वरी

त्वं ह्यग्ने प्रथमो मनोतास्या धियो अभवो दस्म होता ।
त्वं सीं वृषन्नकृणोर्दुष्टरीतु सहो विश्वस्मै सहसे सहध्यै॥१॥
हे शत्रूंचा नाश करणाऱ्या (दस्म), संकल्पना पूर्ण करणाऱ्या अग्निदेवा ! आपण यज्ञमध्ये अग्रणी यज्ञकर्ते आणि पहिले रक्षक आहात. हे शक्तीचा वर्षाव करणाऱ्या अग्निदेवा ! सर्व प्रकारच्या आक्रमक आणि विरोधी शक्तींना चिरडण्यासाठी आणि त्यांच्यावर पूर्ण विजय मिळवण्यासाठी आपण आम्हाला अजिंक्य असे आत्मबळ (अकृणोर्दुष्टरी) प्रदान करावे ही विनंती ॥१॥

अधा होता न्यसीदो यजीयानिळस्पद इषयन्नीड्यः सन् ।
तं त्वा नरः प्रथमं देवयन्तो महो राये चितयन्तो अनु ग्मन्॥२॥
हे पूजनीय, ऊर्जा प्रदान करणाऱ्या अग्निदेवा ! आपण यज्ञवेदीवर अग्रणी यज्ञकर्ते म्हणून विराजमान झाले आहात. चिंतन करणारे, देवत्वाची इच्छा करणारे भक्तगण ऐश्वर्य मिळवण्यासाठी आपलेच अनुसरण करतात. ॥२ ॥

वृतेव यन्तं बहुभिर्वसव्यैस्त्वे रयिं जागृवांसो अनु ग्मन् ।
रुशन्तमग्निं दर्शतं बृहन्तं वपावन्तं विश्वहा दीदिवांसम्॥३ ॥
घृताची आहुती स्वीकारणाऱ्या, ऐश्वर्यशाली हे अग्निदेवा ! जागरूक असणारे यज्ञकर्ते भक्तगण आपलेच अनुसरण करतात.

यज्ञकर्ते भक्तगण चमकणाऱ्या, दैदिप्यमान, दर्शनीय, महान अग्निदेवांना शरण येतात. ॥३ ॥

पदं देवस्य नमसा व्यन्तः श्रवस्यवः श्रव आपन्नमृक्तम् ।
नामानि चिद्दधिरे यज्ञियानि भद्रायां ते रणयन्त संदृष्टौ॥४॥
हे अग्निदेवा ! कीर्ती इच्छा करणारे यज्ञकर्ते भक्तगण नतमस्तक होऊन आपल्या परम स्थानाचा शोध घेतात. भक्तगण आपल्या यज्ञीय नावांचा जप करत आपल्या मंगलमय दर्शनाचा आनंद अनुभवतात ॥४ ॥

त्वां वर्धन्ति क्षितयः पृथिव्यां त्वां राय उभयासो जनानाम् ।
त्वं त्राता तरणे चेत्यो भूः पिता माता सदमिन्मानुषाणाम् ॥५॥
हे अग्निदेवा ! आंतरिक आणि बाह्य समृद्धीच्या प्राप्तीसाठी पृथ्वीवरील भक्तगण आपली स्तुती करतात आणि आपल्याला प्रदीप्त करतात. आपण माता पित्याप्रमाणे भक्तगणांना संकटातून पार पडणारे रक्षणकर्ते आणि पूजनीय आहात. ॥५ ॥

सपर्येण्यः स प्रियो विक्ष्वग्निर्होता मन्द्रो नि षसादा यजीयान्।
तं त्वा वयं दम आ दीदिवांसमुप ज्ञुबाधो नमसा सदेम ॥६॥
पूजनीय,सर्वांचे प्रिय हे अग्निदेवा ! आनंददायी, अग्रणी यज्ञकर्ता म्हणून भक्तगणांनी आपल्याला यज्ञवेदी मध्ये प्रदीप्त केली आहे. हे दैदिप्यमान अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या निवासस्थानी गुडघे टेकून, नम्रतेने आणि आदराने नतमस्तक होऊन आपली उपासना करतो. ॥६ ॥

तं त्वा वयं सुध्यो नव्यमग्ने सुम्नायव ईमहे देवयन्तः ।
त्वं विशो अनयो दीद्यानो दिवो अग्ने बृहता रोचनेन॥७ ॥

हे नित्य तरुण आणि पूजनीय अग्निदेवा ! शुद्धबुद्धीचे, सुखाची इच्छा करणारे यज्ञकर्ते भक्तगण आपली प्रार्थना करतात. दिव्य प्रकाशाने संपूर्ण आकाशाला प्रकाशित करणाऱ्या हे प्रकाशमान, अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांना सन्मार्गाकडे घेऊन जावे ही विनंती. ॥७ ॥

विशां कविं विश्पतिं शश्वतीनां नितोशनं वृषभं चर्षणीनाम् ।
प्रेतीषणिमिषयन्तं पावकं राजन्तमग्निं यजतं रयीणाम्॥८ ॥
भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असणाऱ्या, पालनकर्त्या, शत्रूंचा नाश करणाऱ्या, प्रगतीपथावर नेणाऱ्या, श्रेष्ठ, महाज्ञानी, सुखाचा वर्षाव करणाऱ्या, हे अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करतो ॥८ ॥

सो अग्न ईजे शशमे च मर्तो यस्त आनट् समिधा हव्यदातिम्।
य आहुतिं परि वेदा नमोभिर्विश्वेत्स वामा दधते त्वोतः ॥९ ॥
हे अग्निदेवा ! जे मर्त्य भक्तगण आदराने, नतमस्तक होऊन परिश्रमपूर्वक समिधा, हविष्यान्नाची आहुती देण्याची योग्य पद्धत जाणतात, ते भक्तगण आपल्या द्वारे सुरक्षित राहून सर्व प्रकारची सुख-समृद्धी आणि कल्याणकारी धन प्राप्त करतात .॥९ ॥

अस्मा उ ते महि महे विधेम नमोभिरग्ने समिधोत हव्यैः ।
वेदी सूनो सहसो गीर्भिरुक्थैरा ते भद्रायां सुमतौ यतेम॥१०॥
हे बलपुत्र अग्निदेव ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण समिधा, हविष्यान्नाची आहुती अर्पण करून नतमस्तक होऊन स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने आपली पूजा करतो. हे यज्ञवेदीमध्ये प्रदीप्त

झालेल्या अग्निदेवा ! आम्ही भक्तगण आपल्या मंगलमय कृपेला प्राप्त करण्याचा प्रयत्न करत आहोत ॥१० ॥

आ यस्ततन्थ रोदसी वि भासा श्रवोभिश्च श्रवस्यस्तरुत्रः ।
बृहद्भिर्वाजैः स्थविरेभिरस्मे रेवद्भिरग्ने वितरं वि भाहि ॥११॥
हे विघ्नविनाशक अग्निदेवा ! आपल्या तेजाने आणि कीर्तीने आपण पृथ्वीलोक आणि आकाशलोक व्यापून टाकले आहे. आपण आम्हा भक्तगणांना दृढ, महान ऐश्वर्य अन्न आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती ॥११ ॥

नृवद्वसो सदमिद्धेह्यस्मे भूरि तोकाय तनयाय पश्वः ।
पूर्वीरिषो बृहतीरारेअघा अस्मे भद्रा सौश्रवसानि सन्तु ॥१२॥
हे निवासस्थान देणाऱ्या अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना शूर पुत्रांनी युक्त असे वैभव, पुत्रपौत्रांसाठी विपुल अन्न, पशुधन, उपलब्ध करून द्यावे ही विनंती. आम्हाला पापांपासून मुक्ती, उत्तम कीर्ती मंगलमय ऐश्वर्य प्राप्त होवो ही विनंती ॥१२ ॥.

पुरूण्यग्ने पुरुधा त्वाया वसूनि राजन्वसुता ते अश्याम् ।
पुरूणि हि त्वे पुरुवार सन्त्यग्ने वसु विधते राजनि त्वे ॥१३॥
हे सर्वप्रिय राजन्, विविध प्रकारे पूजल्या जाणाऱ्या अग्निदेवा ! आपल्या पूजेमध्ये मग्न असलेल्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना ऐश्वर्य आणि धन प्राप्त होऊ दे ही विनंती कारण आपल्याकडेच भक्तांना देण्यासाठी अफाट ऐश्वर्य आहे . ॥१३ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- अनुष्टुप्, ११ शक्वरी

त्वं हि क्षैतवद्यशोऽग्ने मित्रो न पत्यसे ।
त्वं विचर्षणे श्रवो वसो पुष्टिं न पुष्यसि ॥१॥

हे अग्निदेवा ! आपण सर्व काही पाहू शकणारे आणि भक्तगणांना आश्रय देणारे आहात. एखाद्या खऱ्या मित्राप्रमाणे आपण राजाच्या निवासस्थानाच्या (क्षैतवत्) ऐश्वर्याचे रक्षण करता. आपण भक्तगणांचे पोषण करावे ही विनंती. ॥१॥

त्वां हि ष्मा चर्षणयो यज्ञेभिर्गीर्भिरीळते ।
त्वां वाजी यात्यवृको रजस्तूर्विश्वचर्षणिः ॥२॥

हे अग्निदेवा ! यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाद्वारे आणि स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे आपली आराधना करतात. कल्याण करणारा, वेगाने प्रवास करणारा, संकटांचा नाश करणारा आपला रथ सुरक्षितपणे भक्तगणांच्या यज्ञस्थळी येवो ही विनंती. ॥२ ॥

सजोषस्त्वा दिवो नरो यज्ञस्य केतुमिन्धते ।
यद्ध स्य मानुषो जनः सुम्नायुर्जुह्वे अध्वरे॥३ ॥

हे अग्निदेवा ! सुखाची इच्छा असणारे यज्ञकर्ते भक्तगण पवित्र यज्ञामध्ये आपले आवाहन करतात तेव्हा आकाशलोकातील सर्व देव एकत्र होऊन यज्ञातील ध्वज म्हणून आपल्याला प्रदीप्त करतात. ॥३ ॥

ऋधद्यस्ते सुदानवे धिया मर्तः शशमते ।
ऊती ष बृहतो दिवो द्विषो अंहो न तरति ॥४॥
हे उत्तम दान देणाऱ्या अग्निदेवा ! जे मर्त्य भक्तगण उत्तम बुद्धीने (धिया) मनःपूर्वक सेवा करतात, ते भक्तगण समृद्ध (ऋधन्) होतात. त्यांना महान आकाशलोकाचे (बृहतः दिवो) रक्षण लाभते आणि ते सर्व संकटे सहजपणे पार करतात ॥४ ॥

समिधा यस्त आहुतिं निशितिं मर्त्यो नशत् ।
वयावन्तं स पुष्यति क्षयमग्ने शतायुषम्॥५॥
हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण समिधांच्या सहाय्याने आपल्याला प्रदीप्त करून हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात, ते भक्तगण पुत्र-पौत्रांनी युक्त अशा समृद्ध कुळाचे पोषण आणि शंभर वर्षांचे दीर्घायुष्य प्राप्त करतात. ॥५ ॥

त्वेषस्ते धूम ऋण्वति दिवि षञ्छुक्र आततः ।
सूरो न हि द्युता त्वं कृपा पावक रोचसे॥६॥
हे पवित्र करणाऱ्या अग्निदेवा ! यज्ञामधून निघणारा आपला दैदिप्यमान, शुभ्र धूर आकाशामध्ये पोहोचतो, तेव्हा आपण अद्भुत तेजाने आणि सुंदररूपाने सूर्यदेवांप्रमाणे तेजस्वीपणे चमकता. ॥६ ॥

अधा हि विक्ष्वीड्योऽसि प्रियो नो अतिथिः ।
रण्वः पुरीव जूर्यः सूनुर्न त्रययाय्यः ॥७॥

हे अग्निदेवा ! आपण सर्व भक्तगणांमध्ये, लोकांमध्ये, स्तुतिपात्र, लाडके अतिथी, सुरक्षित नगराप्रमाणे, अनादिकाळापासून असलेल्या सत्यासारखे, आनंददायी, एखाद्या प्रिय पुत्राप्रमाणे, तिन्ही प्रकारच्या (गार्हपत्य, आहवनीय, दक्षिणाग्नी) अग्निंचे रक्षणकर्ते आहात॥७ ॥

क्रत्वा हि द्रोणे अज्यसेऽग्ने वाजी न कृत्व्यः ।
परिज्मेव स्वधा गयोऽत्यो न ह्वार्यः शिशुः॥८ ॥
हे अग्निदेवा ! जेव्हा आपण सामर्थ्याने यज्ञपात्रामध्ये, अरणीमध्ये, प्रदीप्त केले जाता तेव्हा पराक्रम करण्यास निघालेल्या वेगवान आश्वांसारखे भासता. सर्वत्र पसरणाऱ्या वायुप्रमाणे आपण निवासस्थानाचे रक्षण करता. नागमोडी चालीने, अवखळ बालकाप्रमाणे आपल्या ज्वाळा चोहोबाजूला पसरता. ॥८ ॥

त्वं त्या चिदच्युताग्ने पशुर्न यवसे ।
धामा ह यत्ते अजर वना वृश्चन्ति शिक्वसः॥९ ॥
हे कधीही जर्जर न होणाऱ्या, अविनाशी अग्निदेवा ! गवताच्या कुरणात सोडलेला पशू जसा गवत खाऊन टाकतो त्याप्रमाणे जेव्हा शक्तिशाली ज्वाळा जंगलाला जाळून नष्ट करतात, तेव्हा आपली विनाशी रूपे प्रकट होतात॥९ ॥

वेषि ह्यध्वरीयतामग्ने होता दमे विशाम् ।
समृधो विश्पते कृणु जुषस्व हव्यमङ्गिरः॥१० ॥

हे प्रजापालक, आङ्गिरस ऋषींप्रमाणे तेजस्वी असलेल्या अग्निदेवा ! आपण या भक्तगणांच्या यज्ञामध्ये अग्रणी यज्ञकर्ते आहात. आपण यज्ञामध्ये अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुतीचा आनंदाने स्वीकार करावा ही विनंती ॥१० ॥

अच्छा नो मित्रमहो देव देवानग्ने वोचः सुमतिं रोदस्योः ।
वीहि स्वस्तिं सुक्षितिं दिवो नृन्द्विषो अंहांसि दुरिता तरेम ता तरेम तवावसा तरेम॥११ ॥

हे मित्राप्रमाणे आदरणीय, प्रकाशमान अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना आकाशलोकाची आणि पृथ्वीलोकाची सदबुद्धीची प्रेरणा प्राप्त करून द्यावी ही विनंती. आमच्या प्रार्थना इतर देवांपर्यंत पोहोचवाव्यात, त्यांच्या साहाय्याने आम्ही भक्तगण सर्व शत्रू, पापे, संकटे आणि कठीण परिस्थिती सहज पार करू शकू ॥११ ॥.

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-३

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- त्रिष्टुप्

अग्ने स क्षेषदृतपा ऋतेजा उरु ज्योतिर्नशते देवयुष्टे ।
यं त्वं मित्रेण वरुणः सजोषा देव पासि त्यजसा मर्तमंहः ॥१॥
हे अग्निदेवा ! आपण, मित्रदेवांसह आणि वरुणदेवांसह, जेव्हा विश्वाच्या नियमांचे पालन करणाऱ्या, सत्यातून प्रगती करणाऱ्या भक्तगणांच्या, संकटांना दूर सारून पापांपासून रक्षण करता तेव्हा तो भक्त सुखपूर्वक आणि सुरक्षित निवास करतो आणि आपल्या कृपेने विशाल दिव्य प्रकाश (परम सत्य) प्राप्त करतो ॥१॥

ईजे यज्ञेभिः शशमे शमीभिर्ऋधद्वारायाग्नये ददाश ।
एवा चन तं यशसामजुष्टिर्नांहो मर्तं नशते न प्रदृप्तिः ॥२॥
हे अग्निदेवा ! जे सत्कर्मी यज्ञकर्ते भक्तगण समृद्धीची द्वारे उघडणाऱ्या, यज्ञाद्वारे हविष्यान्नाची आहुती अर्पण करून आपली उपासना करतात, अशा यशस्वी व कीर्तिमान भक्तगणांना कधीही अपयशाचा किंवा उपेक्षेचा सामना करावा लागत नाही, अशा मर्त्य मनुष्याला पाप किंवा अहंकार कधीही स्पर्श करू शकत नाही. ॥२ ॥

सूरो न यस्य दृशतिररेपा भीमा यदेति शुचतस्त आ धीः ।
हेषस्वतः शुरुधो नायमक्तोः कुत्रा चिद्रण्वो वसतिर्वनेजाः ॥३॥
हे अग्निदेवा ! आपले रूप सूर्यदेवांप्रमाणे दैदिप्यमान आणि निर्मळ आहे. जेव्हा आपल्या प्रकाशमान, भयानक रूप धारण करणाऱ्या

ज्वाळा पुढे सरकतात तेव्हा त्या मोठ्याने गर्जना करतात. जंगलातील लाकडांमधून निर्माण झालेल्या हे अग्निदेवा ! आपण रात्रीच्या अंधारातही अत्यंत रमणीय आणि आनंददायी वाटता व प्रत्येकाच्या घरात निवास करता॥३ ॥

तिग्मं चिदेम महि वर्पो अस्य भसदश्वो न यमसान आसा ।
विजेहमानः परशुर्न जिह्वां द्रविर्न द्रावयति दारु धक्षत् ॥४ ॥
विशाल रूप असलेल्या, प्रखर आक्रमण करणाऱ्या हे अग्निदेवा ! वेगाने चारा खाणाऱ्या अश्वांप्रमाणे आपण आपल्या मुखाने सर्वकाही खाऊन टाकता. झाडांना कापणाऱ्या कुऱ्हाडी प्रमाणे आपल्या ज्वाळा झाडे कापून टाकतात. धातु वितळवणाऱ्या कारागीराप्रमाणे आपल्या ज्वाळा लाकडांना वितळवून (भस्मसात)टाकतात॥४॥

स इदस्तेव प्रति धादसिष्यञ्छिशीत तेजोऽयसो न धाराम् ।
चित्रध्रजतिररतिर्यो अक्तोर्वेर्न द्रुषद्वा रघुपत्मजंहाः ॥५ ॥
हे अग्निदेवा ! आपण प्रहार करण्याच्या इच्छेने लक्ष्यावर बाण मारणाऱ्या धनुर्धराप्रमाणे आपले लक्ष्य निश्चित करता. लोखंडाच्या शस्त्राला धार केल्याप्रमाणे आपण आपले तेज प्रखर करता. आपण रात्रीच्या अंधारातही अद्भुत आणि विविध रंगांच्या ज्वाळांसह वेगाने, झाडावर बसणाऱ्या आणि तिथून अत्यंत तीव्र वेगाने झेप घेणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे, संचार करता ॥५ ॥

स ईं रेभो न प्रति वस्त उस्राः शोचिषा रारपीति मित्रमहाः ।
नक्तं य ईमरुषो यो दिवा नृनमर्त्यो अरुषो यो दिवा नृन् ॥६॥

हे अमर आरक्त वर्णीय अग्निदेवा ! आपण रात्रीच्या वेळी आणि दिवसाही यज्ञकर्त्या भक्तगणांना कार्य करण्यास दिशा दाखवता. सर्वांचे कल्याणकारी मित्र असलेल्या हे अग्निदेवा ! स्तुती करणाऱ्या भक्तगणांना आपल्या तेजाने सकाळच्या किरणांनी आच्छादित करून प्रकाशमान करता ॥६ ॥

दिवो न यस्य विधतो नवीनोद्वृषा रुक्ष ओषधीषु नूनोत् ।
घृणा न यो ध्रजसा पत्मना यन्ना रोदसी वसुना दं सुपत्नी ॥७॥

ज्याप्रमाणे स्वर्गातून प्रकाश पसरतो, त्याप्रमाणे यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी आणि नवीन स्तुती करणाऱ्यासाठी, सामर्थ्यशाली अग्निदेव वनस्पतींमध्ये गर्जना करत प्रकट होतात. सूर्यदेवांच्या तेजस्वी किरणांप्रमाणे अग्निदेव आपल्या तीव्रगतीने पुढे जात आकाशलोकांना आणि पृथ्वीलोकांना परिपूर्ण करतात ॥७॥

धायोभिर्वा यो युज्येभिरर्कैर्विद्युन्न दविद्योत्स्वेभिः शुष्मैः ।
शर्धो वा यो मरुतां ततक्ष ऋभुर्न त्वेषो रभसानो अद्यौत्॥८॥

हे अग्निदेवा ! आपण आपल्या पोषक प्रवाहाने,अनुकूल किरणांनी अंगभूत शक्तीने आकाशातील विजेसारखे चमकता. आक्रमक, दिव्य तेजाने प्रकाशित झालेल्या हे अग्निदेवा ! आपण कुशल कारागिराप्रमाणे मरुद्गणांच्या सैन्याला घडवता ॥८॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-४

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- त्रिष्टुप्

यथा होतर्मनुषो देवताता यज्ञेभिः सूनो सहसो यजासि ।
एवा नो अद्य समना समानानुशन्नग्न उशतो यक्षि देवान् ॥१॥
हे बलपुत्रा अग्निदेवा ! ज्याप्रमाणे आपण यज्ञामध्ये अग्रणी यज्ञकर्ते बनून यज्ञांद्वारे देवांचे पूजन करता, त्याचप्रमाणे आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञामध्ये देखील एकाग्र होऊन हविष्यान्नाच्या आहुतीची इच्छा करणाऱ्या सर्व देवतांचे पूजन करावे ही विनंती ॥१॥

स नो विभावा चक्षणिर्न वस्तोरग्निर्वन्दारु वेद्यश्चनो धात् ।
विश्वायुर्यो अमृतो मर्त्येषूषर्भुद्भूदतिथिर्जातवेदाः ॥२ ॥
तेजस्वी, दिवसाप्रमाणे मार्ग दाखवणाऱ्या , पूजनीय, स्तुतीस पात्र, संपूर्ण विश्वाचे जीवन असलेल्या , अमर, पहाटे जागृत होणाऱ्या, अतिथी म्हणून राहणाऱ्या जातवेदा हे अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना अन्न प्रदान करावे ही विनंती. ॥२ ॥

द्यावो न यस्य पनयन्त्यभ्वं भासांसि वस्ते सूर्यो न शुक्रः ।
वि य इनोत्यजरः पावकोऽश्नस्य चिच्छिश्नथत्पूर्व्याणि ॥३ ॥
हे अग्निदेवा ! आपल्या महिमेची स्तुती आकाशलोकाप्रमाणे सर्व यज्ञकर्ते भक्तगण करतात. आपण सूर्यदेवांप्रमाणे तेजाचे वस्त्र परिधान करता. हे अमर, पवित्र, सर्व जग व्यापून टाकणाऱ्या

अग्निदेवा ! आपण “अश्न” असुराच्या प्राचीन शहरांचा पूर्णपणे नाश केला ॥३ ॥

वद्मा हि सूनो अस्यद्मसद्वा चक्रे अग्निर्जनुषाज्मान्नम् ।
स त्वं न ऊर्जसन ऊर्जं धा राजेव जेरवृके क्षेष्यन्तः ॥४ ॥
हे बलपुत्र अग्निदेवा ! आपण यज्ञवेदीवर विराजमान होता आणि यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी आपल्या जन्मापासून सुरक्षित मार्ग तयार करता. हे ऊर्जेचे दान देणाऱ्या अग्निदेवा ! आपण आम्हाला सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती. विजयी राजाप्रमाणे आम्हा भक्तगणांना लांडग्या सारख्या हिंस्र शत्रूंपासून मुक्त असे सुरक्षित निवासस्थान प्रदान करावे ही विनंती. ॥४ ॥.

नितिक्ति यो वारणमन्नमत्ति वायुर्न राष्ट्र्यत्येत्यक्तून् ।
तुर्याम यस्त आदिशामरातीरत्यो न ह्रुतः पततः परिह्रुत् ॥५ ॥
हे अग्निदेवा ! आपण आपले अंधार दूर करणारे तेज प्रखर करता, अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती भक्षण करता, आपण वायू सारखे गतिमान आणि राजासारखे शक्तिशाली असून रात्रीच्या अंधाराचा नाश करता. हे अग्निदेवा ! आपल्या प्रेरणेने, न पकडता येणाऱ्या वेगवान अश्वांप्रमाणे सर्व बाजूंनी आमच्यावर आक्रमण करणाऱ्या शत्रूंचा आम्ही विनाश करणारे व्हावे. ॥५॥

आ सूर्यो न भानुमद्भिरर्कैरग्ने ततन्थ रोदसी वि भासा ।
चित्रो नयत्परि तमांस्यक्तः शोचिषा पत्मन्नौशिजो न दीयन् ॥६ ॥

हे अग्निदेवा ! आपण आपल्या तेजस्वी किरणांनी सूर्यदेवांप्रमाणे आकाश आणि पृथ्वी या दोन्ही लोकांना, अंधकारमय रात्रीच्या वेळी (उशिज ऋषींच्या पुत्रांची इच्छा करणाऱ्या) उषःकालाची इच्छा करणाऱ्या, आकाशात झेप घेणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे आपल्या ज्वाळांच्या तेजाने अंधकाराचा नाश करता. ॥६ ॥

त्वां हि मन्द्रतममर्कशोकैर्ववृमहे महि नः श्रोष्यग्ने ।
इन्द्रं न त्वा शवसा देवता वायुं पृणन्ति राधसा नृतमाः ॥७ ॥
हे अग्निदेवा! आपण अत्यंत आनंददायी, स्तुत्य आहात. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण करत असलेली स्तुतियुक्त स्तोत्रे आपण श्रवण करावीत ही विनंती. ज्याप्रमाणे सर्व देव इंद्रदेवांना आणि वायुदेवांना तृप्त करतात त्याप्रमाणे शक्ती असलेल्या आणि समृद्धीने परिपूर्ण असलेल्या अग्निदेवांना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण प्रसन्न करतो. ॥७ ॥

नू नो अग्नेऽवृकेभिः स्वस्ति वेषि रायः पथिभिः पर्ष्यंहः ।
ता सूरिभ्यो गृणते रासि सुम्नं मदेम शतहिमाः सुवीराः ॥८ ॥
हे अग्निदेवा ! आपण आम्हाला सुरक्षित मार्गांनी समृद्धीकडे घेऊन जावे, सर्व संकटातून मुक्त करावे ही विनंती. आपली स्तुती करणाऱ्या आम्हा भक्तगणांना आणि विद्वान दात्यांना पराक्रमी पुत्र प्रदान करावेत ही विनंती. आम्ही भक्तगण शंभर वर्षे आनंदाने आणि सुखाने जीवन जगू. ॥८ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-५

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- त्रिष्टुप्

हुवे वः सूनुं सहसो युवानमद्रोघवाचं मतिभिर्यविष्ठम् ।
य इन्वति द्रविणानि प्रचेता विश्ववाराणि पुरुवारो अध्रुक्
॥१॥

उत्कृष्ट बुद्धी असलेल्या, कोणाचाही द्रोह न करणाऱ्या, सर्वांना प्रिय असलेल्या हे अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना संपत्ती प्रदान करावी ही विनंती. हे बलपुत्रा, नित्य तरुण, सत्यवचनी अग्निदेवा ! आम्ही भक्तगण आमच्या कल्याणासाठी आवाहन करतो. ॥१॥

त्वे वसूनि पुर्वणीक होतर्दोषा वस्तोरेरिरे यज्ञियासः ।
क्षामेव विश्वा भुवनानि यस्मिन्त्सं सौभगानि दधिरे पावके
॥२ ॥

अनेक रूपे धारण करणाऱ्या, (पुर्वणीक) पवित्र करणाऱ्या, यज्ञातील अग्रणी यज्ञकर्ते असलेल्या हे अग्निदेवा ! यज्ञकर्त्या , भक्तगणांनी रात्रंदिवस आपल्याला प्रदीप्त केले आहे. पृथ्वीचा आश्रय घेणाऱ्या प्राणीमात्रांप्रमाणे आम्ही भक्तगण ऐश्वर्य मिळवण्यासाठी आपला आश्रय घेतो. ॥२ ॥

त्वं विक्षु प्रदिवः सीद आसु क्रत्वा रथीरभवो वार्याणाम् ।
अत इनोषि विधते चिकित्वो व्यानुषग्जातवेदो वसूनि ॥३ ॥

हे सर्वज्ञ, जातवेदा अग्निदेवा ! आपण मानवी प्रजांमध्ये प्राचीन काळापासून निवास करत आला आहात. आपण आपल्या अफाट बुद्धीने स्वीकारण्यायोग्य अशा धनाचे रथी झाला आहात. आपण यज्ञकर्त्या भक्तगणांना निरंतर ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥३॥

यो नः सनुत्यो अभिदासदग्ने यो अन्तरो मित्रमहो वनुष्यात् ।
तमजरेभिर्वृषभिस्तव स्वैस्तपा तपिष्ठ तपसा तपस्वान् ॥४ ॥
हे मित्रांप्रमाणे पूजनीय, तेजस्वी अग्निदेवा! जो कोणी शत्रू लपून-छपून आमचे वाईट करू इच्छितो, जो मित्र बनून राहिलेला, मनात कपट ठेवलेला शत्रू आम्हा भक्तगणांचा नाश इच्छितो अशा दोन्ही प्रकारच्या शत्रूंना आपण आपल्या क्षय न पावणाऱ्या, शक्तिशाली तेजाने भस्मसात करावे ही विनंती ॥४ ॥.

यस्ते यज्ञेन समिधा य उक्थैरर्केभिः सूनो सहसो ददाशत् ।
स मर्त्येष्वमृत प्रचेता राया द्युम्नेन श्रवसा वि भाति ॥५ ॥
हे बलपुत्र, अमर अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाद्वारे समिधा अर्पण करून, स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने आपल्याला हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात ते भक्तगण धन, तेज आणि महान यशाने, विशेष रूपाने सुशोभित होतात ॥५॥

स तत्कृधीषितस्तूयमग्ने स्पृधो बाधस्व सहसा सहस्वान् ।
यच्छस्यसे द्युभिरक्तो वचोभिस्तज्जुषस्व जरितुर्घोषि मन्म ॥६ ॥
हे बलवान अग्निदेवा! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या द्वारे प्रेरित आपण आमचे कार्य त्वरित करावे, आपल्या शक्तीने आपण

आमच्या शत्रूंना दूर हकलून लावावे ही विनंती. हे तेजस्वी अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रकाशमान होता म्हणून आम्ही मनःपूर्वक केलेली स्तोत्रे स्वीकारावीत ही विनंती ॥६॥

अश्याम तं काममग्ने तवोती अश्याम रयिं रयिवः सुवीरम् ।
अश्याम वाजमभि वाजयन्तोऽश्याम द्युम्नमजराजरं ते ॥७॥
हे अग्निदेवा ! आपल्या कृपेने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या मनोकामना पूर्ण होऊ द्याव्यात ही विनंती. हे ऐश्वर्यशाली अग्निदेवा ! आम्हा, प्रगतीचा प्रयत्न करणाऱ्या भक्तगणांना श्रेष्ठ पुत्र-पौत्रांनी युक्त असे धन-ऐश्वर्य, कधीही नष्ट न होणारे चिरंतन यश आणि तेज प्राप्त होवो ही विनंती. ॥७ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-६

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- त्रिष्टुप्

प्र नव्यसा सहसः सूनुमच्छा यज्ञेन गातुमव इच्छमानः ।
वृश्चद्वनं कृष्णयामं रुशन्तं वीती होतारं दिव्यं जिगाति ॥१॥
रक्षण, प्रगतीचा मार्ग शोधण्याची इच्छा करणारे यज्ञकर्ते भक्तगण नवीन रचलेल्या स्तोत्रांच्या माध्यमातून बलपुत्र अग्निदेवांकडे जातात. वृक्षांचा नाश करून आपला मार्ग काळा करणारे, पांढरा शुभ्र प्रकाश देणारे, हविष्यान्नाची आहुती स्वीकारणारे अग्निदेव अग्रणी यज्ञकर्ते आहेत ॥१॥

स श्वितानस्तन्यतू रोचनस्था अजरेभिर्नानदद्भिर्यविष्ठः ।
यः पावकः पुरुतमः पुरूणि पृथून्यग्निरनुयाति भर्वन् ॥२॥
शुभ्र प्रकाशाने चमकणाऱ्या ,गर्जना करणाऱ्या , अंतरिक्षात वास करणाऱ्या , हे तरुण अग्निदेवा! आपण कधीही क्षय न पावणाऱ्या आणि प्रचंड नाद करणाऱ्या आपल्या ज्वाळांसह प्रकट होता. पवित्र करणाऱ्या अनेक रूपांत विस्तारणाऱ्या हे अग्निदेवा! आपण विस्तीर्ण वनांना आणि पदार्थांना आपल्या कचाट्यात घेऊन, त्यांचे भक्षण करत वेगाने पुढे सरकता ॥२ ॥

वि ते विष्वग्वातजूतासो अग्ने भामासः शुचे शुचयश्चरन्ति ।
तुविम्रक्षासो दिव्या नवग्वा वना वनन्ति धृषता रुजन्तः ॥३॥
हे पवित्र आणि शुद्ध रूप असलेल्या अग्निदेवा ! सर्व बाजूंनी वाहणाऱ्या वाऱ्यामुळे वेगवान झालेल्या आपल्या दिव्य ज्वाळा

सर्व दिशांना पसरत आहेत. नऊ अंगांनी युक्त असलेल्या आपल्या ज्वाळा पराक्रमाने वृक्षांना पाडत, जंगलांना वेगाने भस्मसात करत आहेत ॥३ ॥

ये ते शुक्रासः शुचयः शुचिष्मः क्षां वपन्ति विषितासो अश्वाः।
अध भ्रमस्त उर्विया वि भाति यातयमानो अधि सानु पृश्नेः ॥४॥

हे अग्निदेवा! आपले तेजस्वी, पावित्र्याने युक्त असणाऱ्या अश्वरूपी ज्वाळा बंधनातून मुक्त होत पृथ्वीवरील वनस्पतींना भस्मसात करत आहेत. आपला विशाल आणि वेगवान प्रकाश पृथ्वीच्या शिखरांवर अत्यंत प्रखरतेने चमकत आहे ॥४ ॥

अध जिह्वा पापतीति प्र वृष्णो गोषुयुधो नाशनिः सृजाना ।
शूरस्येव प्रसितिः क्षातिरग्नेर्दुर्वर्तुर्भीमो दयते वनानि ॥५॥

हे बलशाली अग्निदेवा! आपल्या विजेसारखा कडकडाट करणाऱ्या ज्वाळा ज्यावेळी वेगाने चहूकडे पसरतात तेव्हा त्या गायींसाठी युद्ध करणाऱ्या योद्ध्याप्रमाणे भासतात. आपण आक्रमकपणे, रोखण्यास अशक्य असलेल्या, दाहक, भयानक रूप धारण करणाऱ्या आपल्या ज्वाळांनी, संपूर्ण जंगलाला भस्मसात करतात. ॥५ ॥

आ भानुना पार्थिवानि ज्रयांसि महस्तोदस्य धृषता ततन्थ ।
स बाधस्वाप भया सहोभिः स्पृधो वनुष्यन्वनुषो नि जूर्व ॥६॥

हे प्रेरक अग्निदेवा! आपल्या तेजाने, पराक्रमाने पृथ्वीवरील विस्तृत प्रदेश व्यापून टाकला आहे. आम्हा भक्तगणांच्या भयांचा

आणि संकटांचा नाश करत आपण आमचे रक्षण करता. आमच्या नुकसान करू इच्छिणाऱ्या विरोधकांना आपण आपल्या तेजाने भस्मसात करता ॥६॥

स चित्र चित्रं चितयन्तमस्मे चित्रक्षत्र चित्रतमं वयोधाम् ।
चन्द्रं रयिं पुरुवीरं बृहन्तं चन्द्र चन्द्राभिर्गृणते युवस्व ॥७॥
हे अद्भुत सामर्थ्य असणाऱ्या अग्निदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या आम्हा भक्तगणांना जीवनदायी, दैदिप्यमान, ज्ञान देणारे, ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आपण
आम्हा भक्तगणांना चंद्रासारखे आल्हाददायक, विशाल आणि अनेक वीर पुत्रांनीयुक्त असे महान धन आपल्या दैवीशक्तीने प्रदान करावे ही विनंती ॥७ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-७

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द**- त्रिष्टुप् ६,७ जगती

मूर्धानं दिवो अरतिं पृथिव्या वैश्वानरमृत आ जातमग्निम् ।
कविं सम्राजमतिथिं जनानामासन्ना पात्रं जनयन्त
देवाः ॥१॥

स्वर्गाचे मस्तक, पृथ्वीचे रक्षक, सत्या मधून प्रकट झालेल्या, सर्व मानवांचे कल्याण करणाऱ्या हे वैश्वानर अग्निदेवा ! देवतांनी आपली निर्मिती केली आहे. आपण भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञानी, भक्तगणांचे आदरणीय अतिथी आहात. देवतांनी आपल्याला यज्ञवेदीमध्ये आहुती स्वीकारण्यासाठी मुख म्हणून स्थापना केली आहे. ॥१॥

नाभिं यज्ञानां सदनं रयीणां महामाहावमभि सं नवन्त ।
वैश्वानरं रथ्यमध्वराणां यज्ञस्य केतुं जनयन्त देवाः ॥२॥

सर्व यज्ञांचे केंद्रस्थान, संपत्तीचे निवासस्थान, महान यज्ञकुंड(महान्-आहावम्) असलेल्या सर्व मानवांचे कल्याण करणाऱ्या हे वैश्वानर अग्निदेवा ! आपली सर्वजण स्तुती करतात. पवित्र यज्ञांना पुढे नेणाऱ्या आणि यज्ञाचा मुख्य ध्वज असलेल्या अग्निदेवांना देवांनी उत्पन्न केले आहे. ॥२ ॥

त्वद्विप्रो जायते वाज्यग्ने त्वद्वीरासो अभिमातिषाहः ।
वैश्वानर त्वमस्मासु धेहि वसूनि राजन्त्स्पृहयाय्याणि ॥३ ॥

हे अग्निदेवा ! आपल्या कृपेने विद्वान पुरुष जन्माला येतात, बलवान योद्धे निर्माण होतात. आपल्या आशीर्वादाने, अहंकार करणाऱ्यांचा (अभिमातिषाहः) ,पराभव करणारे वीर पुत्र प्राप्त होतात. सर्व मानवांचे कल्याण करणाऱ्या हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना स्पृहणीय ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥३ ॥

त्वां विश्वे अमृत जायमानं शिशुं न देवा अभि सं नवन्ते ।
तव क्रतुभिरमृतत्वमायन्वैश्वानर यत्पित्रोरदीदेः ॥४॥
हे वैश्वानर अग्निदेवा ! जेव्हा दोन अरणींच्या मंथनातून आपण जन्म घेऊन दैदिप्यमान झाला तेव्हा लहान बालकाप्रमाणे सर्व अमर देवांनी आपल्याला लक्ष्य करून आपली स्तुती केली. आपल्या सामर्थ्यामुळे त्या सर्व देवांना अमरत्व प्राप्त झाले ॥४ ॥

वैश्वानर तव तानि व्रतानि महान्यग्ने नकिरा दधर्ष ।
यज्जायमानः पित्रोरुपस्थेऽविन्दः केतुं वयुनेष्वह्नाम् ॥५ ॥
हे वैश्वानर अग्निदेवा ! आपली कधीही खंडित न होऊ शकणारी सर्व सर्व कर्मे महान आहेत. आकाश आणि पृथ्वी या माता-पित्यांच्या कुशीत उत्पन्न झालेल्या हे अग्निदेवा ! आपण दिवसाच्या ध्वजाला म्हणजे ज्ञानाला प्रकाशमान केले॥५ ॥

वैश्वानरस्य विमितानि चक्षसा सानूनि दिवो अमृतस्य केतुना।
तस्येदु विश्वा भुवनाधि मूर्धनि वया इव रुरुहुः सप्त विस्रुहः॥६ ॥

अमरत्वाचे प्रतीक असणाऱ्या हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण आपल्या ध्वजाप्रमाणे असलेल्या प्रकाशाने स्वर्गलोकातील सर्व शिखरे प्रकाशमान केली आहेत. आपल्या शिखरावर ही सृष्टी आश्रित आहे आणि त्यामुळे ज्याप्रमाणे एकाच वृक्षापासून अनेक फांद्या फुटतात, त्याप्रमाणे वाहणाऱ्या सात नद्या उत्पन्न होऊन सर्वत्र पसरल्या आहेत. ॥६ ॥

वि यो रजांस्यमिमीत सुक्रतुर्वैश्वानरो वि दिवो रोचना कविः ।
परि यो विश्वा भुवनानि पप्रथेऽदब्धो गोपा अमृतस्य रक्षिता ॥७ ॥

श्रेष्ठ बुद्धी असलेल्या आणि सर्व मानवांचे कल्याण करणाऱ्या हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण सर्व विश्वाची , आकाशातील तेजस्वी ताऱ्यांची आणि सर्वत्र असलेल्या सर्व सजीवांची निर्मिती केली. चहूबाजूने संपूर्ण सृष्टीला व्यापून टाकणाऱ्या, अविनाशी हे अग्निदेवा ! आपण अमरत्वाचे आणि वैश्विक नियमांचे रक्षण करता ॥७ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-८

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** जगती -७ त्रिष्टुप्

पृक्षस्य वृष्णो अरुषस्य नू सहः प्र नु वोचं विदथा जातवेदसः।
वैश्वानराय मतिर्नव्यसी शुचिः सोम इव पवते चारुरग्नये॥१॥
भरद्वाज बार्हस्पत्य ऋषी म्हणतात, " मी, पोषण करण्यास समृद्ध, भक्तगणांच्या कामना पूर्ण करणाऱ्या, चमकदार लाल रंगाच्या, सर्व काहीच जाणणाऱ्या जातवेद अग्निदेवांच्या सामर्थ्याची स्तुती करतो. ज्याप्रमाणे यज्ञामध्ये सोमरस गाळून शुद्ध केला जातो त्याप्रमाणे यज्ञामधील तेजस्वी वैश्वानर अग्निदेवांसाठी रचलेली नवीन स्तुतियुक्त स्तोत्रे पवित्र होऊन प्रकट होत आहेत." ॥१॥.

स जायमानः परमे व्योमनि व्रतान्यग्निर्व्रतपा अरक्षत ।
व्यन्तरिक्षममिमीत सुक्रतुर्वैश्वानरो महिना नाकमस्पृशत्॥२॥
हे अग्निदेवा ! आपण दिव्य लोकात सर्वोच्च स्थानावर प्रकट होताच सर्व नियमांचे रक्षण केलेत. महान कृत्य करणाऱ्या मानवाचे कल्याण करणाऱ्या हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण आपल्या सामर्थ्याने अंतरिक्षाला मोजले आणि स्वर्गाला स्पर्श केला. ॥२ ॥

व्यस्तभ्नाद्रोदसी मित्रो अद्भुतोऽन्तर्वावदकृणोज्ज्योतिषा तमः ।
वि चर्मणीव धिषणे अवर्तयद्वैश्वानरो विश्वमधत्त वृष्ण्यम् ॥३॥
मित्राप्रमाणे सर्वांचे कल्याण करणाऱ्या अद्भुत वैश्वानर हे अग्निदेवा! आपण आकाश आणि पृथ्वी या दोघांना घट्ट आधार

देता. आपण अंधाराचा नाश करत, ज्याप्रमाणे एखादे चामडे चांगले ताणून पसरवले जाते त्याप्रमाणे आकाश आणि पृथ्वी या दोन्ही लोकांना आपण सर्व दिशांना पसरवले आहे. आपण सर्व सामर्थ्य आपल्यामध्ये सामावून घेतले आहे. ॥३ ॥

अपामुपस्थे महिषा अगृभ्णत विशो राजानमुप तस्थुऋृग्मियम् ।
आ दूतो अग्निमभरद्विवस्वतो वैश्वानरं मातरिश्वा परावतः॥४॥
जलाच्या मध्यभागी सामर्थ्यवान ऋषींनी घट्ट धरून ठेवलेल्या, पूजनीय राजाप्रमाणे तेजस्वी हे अग्निदेवा! सर्व भक्तगण श्रद्धेने एकत्र आले आहेत. हे वैश्वानर अग्निदेवा! विवस्वानचा दूत असलेल्या मातरिश्वाने आपल्याला दूरवरच्या आकाशलोकातून पृथ्वीवर आणले आहे.॥४ ॥

युगेयुगे विदथ्यं गृणद्भ्योऽग्ने रयिं यशसं धेहि नव्यसीम् ।
पव्येव राजन्नघशंसमजर नीचा नि वृश्च वनिनं न तेजसा॥५॥
हे अमर प्रकाशमान, स्तुती करण्यास योग्य अग्निदेवा ! जे भक्तगण प्रत्येक युगात निरंतर आपली स्तुती करतात त्यांना आपण कीर्ती पसरवणारे श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. हे राजन् आमचे वाईट चिंतन करणाऱ्या आणि पाप बुद्धी असलेल्या शत्रूंना ज्याप्रमाणे मोठ्या वृक्षाला तीक्ष्ण शस्त्राने मुळासकट उपटून टाकतात त्याप्रमाणे आपल्या तेजाने पूर्णपणे नष्ट करावे ही विनंती. ॥५ ॥

अस्माकमग्ने मघवत्सु धारयानामि क्षत्रमजरं सुवीर्यम् ।
वयं जयेम शतिनं सहस्रिणं वैश्वानर वाजमग्ने तवोतिभिः॥६॥

हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण आम्हा धनवान आणि उदार आश्रयदात्यांमध्ये, भक्तगणांमध्ये, कधीही नष्ट न होणारे, शत्रूंसमोर न वाकणारे, अजेय बल आणि उत्तम शौर्य प्रस्थापित करावे ही विनंती. आपल्या सहाय्यामुळे आम्ही भक्तगण शेकडो आणि हजारो पटीने वाढणारे अन्न, ऐश्वर्य आणि विजय प्राप्त करू शकू. ॥६ ॥.

अदब्धेभिस्तव गोपाभिरिष्टेऽस्माकं पाहि त्रिषधस्थ सूरीन् ।
रक्षा च नो ददुषां शर्धो अग्ने वैश्वानर प्र च तारीः स्तवानः॥७॥
हे आम्हा भक्तगणांद्वारे स्तुती केली गेलेल्या, तिन्ही लोकांत निवास करणाऱ्या, पूजनीय वैश्वानर अग्निदेवा ! आपण आपल्या अजिंक्य आणि न फसणाऱ्या रक्षक शक्तींनी आमचे रक्षण करावे ही विनंती. यज्ञामध्ये हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या आम्हा दानशूर भक्तगणांचे रक्षण करून आम्हाला प्रगती व समृद्धीच्या मार्गावर पुढे घेऊन जावे ही विनंती. ॥७ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-९

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

अहश्च कृष्णमहरर्जुनं च वि वर्तेते रजसी वेद्याभिः ।
वैश्वानरो जायमानो न राजावातिरज्ज्योतिषाग्निस्तमांसि ॥१॥

काळोखी रात्र आणि प्रकाशमान दिवस ही दोन्ही सृष्टीची रूपे नियमानुसार एकमेकांनंतर चक्राकार बदलतात. हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण शत्रूवर विजय मिळवणाऱ्या राजाप्रमाणे आपल्या दिव्य प्रकाशाने सर्व अंधाराचा नाश करता ॥१॥

नाहं तन्तुं न वि जानाम्योतुं न यं वयन्ति समरेऽतमानाः ।
कस्य स्वित्पुत्र इह वक्त्वानि परो वदात्यवरेण पित्रा ॥२॥

भरद्वाज बार्हस्पत्य ऋषी म्हणतात, "या संसाररुपी यज्ञामध्ये जे अथक प्रयत्न करणारे लोक उभ्या आडव्या तंतूंनी जीवनाचे वस्त्र तयार करत आहेत ते मी जाणत नाही. या जगात असा कोणता बरं पुत्र आहे, जो आपल्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्या पित्यापेक्षाही अधिक गूढ आणि सत्य गोष्टी सांगू शकेल?"॥२ ॥

स इत्तन्तुं स वि जानात्योतुं स वक्त्वान्यृतुथा वदाति ।
य ईं चिकेतदमृतस्य गोपा अवश्चरन्परो अन्येन पश्यन् ॥३ ॥

हे वैश्वानर अग्निदेवा ! आपण विश्वाचे उभे आडवे धागे पूर्णपणे जाणता, योग्य वेळी सत्य विचार कथन करता, जे भक्तगण या विश्वाला पूर्णपणे समजून घेतात त्यांनाच अमरत्व मिळते. ते

भक्तगण संचार करत स्वतःच्या दृष्टीने सर्व काही पाहतात आणि विश्वाला जाणून घेतात. ॥३ ॥

अयं होता प्रथमः पश्यतेममिदं ज्योतिरमृतं मर्त्येषु ।
अयं स जज्ञे ध्रुव आ निषत्तोऽमर्त्यस्तन्वा वर्धमानः ॥४॥

हे भक्तगणांनो ! तुम्ही सर्वश्रेष्ठ अग्रणी यज्ञकर्त्या अग्निदेवांना पहा. हे कधी नष्ट न होणारे, दिव्य प्रकाश असलेले अग्निदेव मर्त्य मनुष्यांमध्ये, भक्तगणांमध्ये, जन्माला आले आहेत. अमर, शाश्वत, सतत प्रदीप्त होणारे अग्निदेव यज्ञवेदीवर स्थापित झाले आहेत॥४ ॥.

ध्रुवं ज्योतिर्निहितं दृशये कं मनो जविष्ठं पतयत्स्वन्तः ।
विश्वे देवाः समनसः सकेता एकं क्रतुमभि वि यन्ति साधु ॥५॥

हे अग्निदेवा ! आपला दिव्य प्रकाश (ज्ञान) आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या अंतःकरणात आधीपासूनच प्रस्थापित केला आहे (ध्रुवं ज्योतिर्निहितं दृशये) सर्व गतिमान तत्त्वांमध्ये हे मन अत्यंत वेगवान आहे. (मनो जविष्ठं पतयत्स्वन्तः) सर्व इंद्रिये समान ध्येयाचे होऊन एकाच संकल्पाकडे (परमात्म्याकडे) योग्य प्रकारे आणि सरळ मार्गाने मार्गक्रमण करतात. ॥५ ॥

वि मे कर्णा पतयतो वि चक्षुर्वीदं ज्योतिर्हृदय आहितं यत् ।
वि मे मनश्चरति दूरआधीः किं स्विद्वक्ष्यामि किमु नू मनिष्ये ॥६ ॥

भरद्वाज बार्हस्पत्य ऋषी म्हणतात, " हे अग्निदेवा ! माझे कान ऐकण्यासाठी धावत आहेत, माझे डोळे पाहण्यासाठी आतुर आहेत, माझ्या हृदयात दिव्य प्रकाश स्थापित केला आहे. माझे मन दूरवरच्या विचारांमध्ये भटकत आहे, आता मी कसा बरे विचार करू शकेन? "॥६ ॥

विश्वे देवा अनमस्यन्भियानास्त्वामग्ने तमसि तस्थिवांसम् ।
वैश्वानरोऽवतूतये नोऽमर्त्योऽवतूतये नः ॥७ ॥
हे वैश्वानर अग्निदेवा ! अंधारामुळे भीतीने व्याकुळ झालेल्या सर्व देवतांनी आपल्याला आदराने नमस्कार केला. हे अमर वैश्वानर अग्निदेवा ! आपण आमच्या रक्षणासाठी आणि कल्याणासाठी आमचे सदैव रक्षण करावे ही विनंती ॥७ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१०

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** त्रिष्टुप् ७- द्विपदा विराट्

पुरो वो मन्द्रं दिव्यं सुवृक्तिं प्रयति यज्ञे अग्निमध्वरे दधिध्वम्।
पुर उक्थेभिः स हि नो विभावा स्वध्वरा करति जातवेदाः ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुम्ही सुरू केलेल्या हिंसारहित पवित्र यज्ञात आनंददायी, दिव्य आणि अत्यंत शुद्ध अग्निदेवांना अग्रभागी स्थापित करावे. तेजस्वी जातवेद अग्निदेव भक्तगणांच्या स्तुतीमुळे प्रसन्न होऊन या यज्ञाला उत्तम प्रकारे संपन्न करतील ॥१॥

तमु द्युमः पुर्वणीक होतरग्ने अग्निभिर्मनुष इधानः ।
स्तोमं यमस्मै ममतेव शूषं घृतं न शुचि मतयः पवन्ते ॥२॥
हे तेजस्वी आणि अनेक रूपांनी युक्त असलेल्या यज्ञकर्त्या अग्निदेवा ! भक्तगणांनी इतर अग्नींच्या सहाय्याने आपल्याला प्रदीप्त केले आहे. ममता नावाच्या ऋषीच्या पत्नीने ही शुद्ध घृताप्रमाणे पवित्र स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत ॥२ ॥

पीपाय स श्रवसा मर्त्येषु यो अग्नये ददाश विप्र उक्थैः ।
चित्राभिस्तमूतिभिश्चित्रशोचिर्व्रजस्य साता गोमतो दधाति ॥३॥
हे अग्निदेवा ! जे मर्त्य मनुष्य, भक्तगण, आपल्याला स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात त्यांना आपण

कीर्ती आणि अन्नाने समृद्ध करता. हे प्रकाशमान अग्निदेवा ! आपल्या विविध प्रकारच्या रक्षण साधनांनी आपण आपल्या भक्तगणांना गायींनी भरलेल्या गोठ्याची प्राप्ती करून देता ॥३ ॥

आ यः पप्रौ जायमान उर्वी दूरेदृशा भासा कृष्णाध्वा ।
अध बहु चित्तम ऊर्म्यायास्तिरः शोचिषा ददृशे पावकः ॥४॥
धुरामुळे कृष्णवर्णीय मार्ग झालेल्या हे अग्निदेवा ! आपण आपल्या तेजाने विस्तृत पृथ्वीलोक आणि आकाशलोक व्यापून टाकता. हे पावक अग्निदेवा ! आपण रात्रीचा अंधार आपल्या दैदिप्यमान प्रकाशाने दूर करत भक्तगणांचे ज्ञान जागृत करता. ॥४ ॥

नू नश्चित्रं पुरुवाजाभिरूती अग्ने रयिं मघवद्भ्यश्च धेहि ।
ये राधसा श्रवसा चात्यन्यान्त्सुवीर्येभिश्चाभि सन्ति जनान् ॥५॥
हे अग्निदेवा ! आपण आपल्या विविध प्रकारच्या शक्ती देणाऱ्या आणि रक्षण करणाऱ्या साधनांनी आम्हा दानशूर यज्ञकर्त्या भक्तगणांना आता ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती.
आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना असे पुत्र प्रदान करा की जे संपत्ती, अन्न आणि शौर्याने इतरांना पराभूत करू शकतील॥५॥

इमं यज्ञं चनो धा अग्न उशन्यं त आसानो जुहुते हविष्मान् ।
भरद्वाजेषु दधिषे सुवृक्तिमवीर्वाजस्य गध्यस्य सातौ ॥६॥

हे हविष्यान्नाची आहुती ग्रहण करण्याची इच्छा असणाऱ्या अग्निदेवा ! आपण यज्ञवेदीवर प्रसन्नतेने प्रदीप्त व्हावे. हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या आहुतींचा आपण आनंदाने स्वीकार करावा ही विनंती. भारद्वाज ऋषींच्या कुळातील ऋषींनी रचलेल्या या पवित्र स्तोत्रांचा स्वीकार करून आम्हाला विपुल अन्न, ऐश्वर्य प्रदान करावे आणि आमचे रक्षण करावे ही विनंती. ॥६ ॥

वि द्वेषांसीनुहि वर्धयेळां मदेम शतहिमाः सुवीराः ॥७ ॥

हे अग्निदेवा ! आपण आमच्या शत्रूंचा नाश करावा, आमचे अन्नधान्य आणि समृद्धी वाढवावी ही विनंती. आम्हा भक्तगणांना आमच्या पराक्रमी पुत्र-पौत्रांसह शंभर वर्षे आनंदाने आणि उत्साहाने जगण्यासाठी आयुष्य मिळवून द्यावे ही विनंती. ॥७ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-११

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

यजस्व होतरिषितो यजीयानग्ने बाधो मरुतां न प्रयुक्ति ।
आ नो मित्रावरुणा नासत्या द्यावा होत्राय पृथिवी ववृत्याः ॥१॥

यज्ञाचे उत्तम ज्ञान असलेल्या, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी प्रार्थना केलेल्या हे अग्निदेवा ! आपण अग्रणी यज्ञकर्ते बनून यज्ञ करावा ही विनंती. आपण मरुद्गणांप्रमाणे संकटे दूर करणारे आहात. आपण या यज्ञासाठी मित्रदेव, वरुणदेव, अश्विनीकुमार, आकाशलोक आणि धरणीमाता यांनाही घेऊन यावे ही विनंती ॥१॥

त्वं होता मन्द्रतमो नो अध्रुगन्तर्देवो विदथा मर्त्येषु ।
पावकया जुह्वा वह्निरासाग्ने यजस्व तन्वं तव स्वाम् ॥२ ॥

हे अग्निदेवा ! मर्त्य मानवांच्या हृदयात विराजमान झालेले, निष्कपट, विद्वानांमध्ये आमचे कल्याण करणारे, आनंद देणारे आपण अग्रणी यज्ञकर्ते आहात. पावन करणाऱ्या, हविष्यान्नाची आहुती आपल्या मुखाद्वारे ग्रहण करणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण आपल्याच स्वरूपासाठी यज्ञ करावा ही विनंती. ॥२ ॥

धन्या चिद्धि त्वे धिषणा वष्टि प्र देवाञ्जन्म गृणते यजध्यै ।
वेपिष्ठो अङ्गिरसां यद्ध विप्रो मधु च्छन्दो भनति रेभ इष्टौ ॥३ ॥

हे अग्निदेवा ! आङ्गिरस वंशातील ऋषींनी यज्ञाच्या वेळी उत्साहाने, आनंददायी अशा छंदांमध्ये, स्तुतियुक्त स्तोत्रांचे गायन केले त्यावेळी आपल्या कृपेने दिव्य गुणांनी युक्त असलेल्या यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तुती करण्याची शक्ती वृद्धिंगत झाली. ॥३ ॥

अदिद्युतत्स्वपाको विभावाग्ने यजस्व रोदसी उरूची ।
आयुं न यं नमसा रातहव्या अञ्जन्ति सुप्रयसं पञ्च जनाः॥४॥
स्वतः परिपक्व असलेल्या, (स्वपाकः) दैदिप्यमान, प्रकाशमान हे अग्निदेवा ! आपण विस्तीर्ण पसरलेल्या आकाशलोकांचे आणि पृथ्वीलोकांचे पूजन करावे ही विनंती. ज्याप्रमाणे पूजनीय अतिथीचा आदर सत्कार केला जातो त्याप्रमाणे हविष्यान्नाची आहुती अर्पण करणारे पाच वर्णाचे भक्तगण आदराने आपल्याला प्रदीप्त करतात॥४ ॥

वृञ्जे ह यन्नमसा बर्हिरग्नावयामि स्रुग्घृतवती सुवृक्तिः ।
अम्यक्षि सद्म सदने पृथिव्या अश्रायि यज्ञः सूर्ये न चक्षुः ॥५॥
हे अग्निदेवा ! जेव्हा आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आदरपूर्वक आपल्यासाठी कुशासन पसरवतो आणि घृताने भरलेली स्रुवा आपल्यासाठी उचलतो तेव्हा आपले निवासस्थान असलेल्या पृथ्वीवर यज्ञवेदीमध्ये आपण प्रकाशमान होता आणि हा संपूर्ण यज्ञ सूर्यदेवांच्या दिव्यदृष्टीप्रमाणे स्थापित होतो ॥५॥

दशस्या नः पुर्वणीक होतर्देवेभिरग्ने अग्निभिरिधानः ।
रायः सूनो सहसो वावसाना अति स्रसेम वृजनं नांहः ॥६ ॥

अनेक रूपे धारण करणाऱ्या, अग्रणी यज्ञकर्त्या, दिव्य शक्तीने प्रदीप्त झालेल्या, हे अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना आवश्यक असलेले धन आणि ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. हे बलपुत्र अग्निदेवा ! आपण आमचे संरक्षक कवच बनून एखाद्या वर्ज्य करण्यासारख्या शत्रूला दूर केले जाते त्याप्रमाणे आम्हाला सर्व प्रकारच्या पापांमधून आणि संकटांमधून यशस्वीपणे मुक्त करावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१२

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

मध्ये होता दुरोणे बर्हिषो राळग्निस्तोदस्य रोदसी यजध्यै ।
अयं स सूनुः सहस ऋतावा दूरात्सूर्यो न शोचिषा
ततान ॥१॥

यज्ञवेदीच्या अगदी मध्यभागी पवित्र कुशासनावर राजाप्रमाणे विराजमान झालेल्या हे अग्निदेवा ! आपण आकाशलोक आणि पृथ्वीलोक यांच्यासाठी यज्ञ करण्यास उपस्थित रहावे ही विनंती. बलपुत्र, सत्याचे पालनकर्त्या हे अग्निदेवा ! सूर्यदेवांप्रमाणे आपण आपल्या तेजाने संपूर्ण विश्वाला प्रकाशमान करता ॥१॥

आ यस्मिन्त्वे स्वपाके यजत्र यक्षद्राजन्त्सर्वतातेव नु द्यौः ।
त्रिषधस्थस्ततरुषो न जंहो हव्या मघानि मानुषा यजध्यै
॥२॥

स्वतःच परिपक्व असलेल्या, पूजनीय, हे राजन् अग्निदेवा ! ज्याप्रमाणे आकाशलोक सर्वांच्या कल्याणासाठी यज्ञ करतात त्याप्रमाणे त्रिलोकात विराजमान असलेले आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचा यज्ञ संपन्न करावा ही विनंती. अडथळ्यांवर मात करणाऱ्या, वेगात धावणाऱ्या अश्वाप्रमाणे आपण वेगाने भक्तगणांनी अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती देवतांपर्यंत पोहोचवावी ही विनंती॥२ ॥

तेजिष्ठा यस्यारतिर्वनेराट् तोदो अध्वन्न वृधसानो अद्यौत् ।
अद्रोघो न द्रविता चेतति त्मन्नमर्त्योऽवर्त्र ओषधीषु ॥३ ॥
हे अग्निदेवा ! आपल्या ज्वाळा तेजस्वी आहेत. आपण वनामध्ये राजासारखे शोभून दिसता. मार्गक्रमण करत असताना आपण प्रेरणा देता. कोणाशी द्रोह न करणारे, वेगाने धावणाऱ्या रथाप्रमाणे स्वत:हून सर्वांना जागृत करणारे अमर, न रोखता येणारे अग्निदेव वनस्पतीमध्ये निवास करतात. ॥३ ॥

सास्माकेभिरेतरी न शूषैरग्निः ष्टवे दम आ जातवेदाः ।
द्रवन्नो वन्वन्क्रत्वा नार्वोस्रः पितेव जारयायि यज्ञैः ॥४॥
सर्व उत्पन्न झालेल्या पदार्थांना जाणणारे (जातवेदा), सतत क्रियाशील असणाऱ्या, काष्ठ हे अन्न असणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण घरातील यज्ञवेदी मध्ये प्रदीप्त झाला आहात. वेगवान अश्वांप्रमाणे तेजस्वी, वृद्धत्वा पर्यंत नेणाऱ्या पित्याप्रमाणे पूजनीय अग्निदेवांची आम्ही भक्तगण स्तुती करतो. ॥४ ॥

अध स्मास्य पनयन्ति भासो वृथा यत्तक्षदनुयाति पृथ्वीम् ।
सद्यो यः स्यन्द्रो विषितो धवीयानृणो न तायुरति धन्वा राट् ॥५ ॥
हे अग्निदेवा ! जेव्हा आपण पृथ्वीवरील वनाला भस्मसात करत पुढे सरकता तेव्हा यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करतात. हे अग्निदेवा ! ज्याप्रमाणे एखादा चोर पकडला जाण्याच्या भीतीने वेगाने पळत असतो त्याप्रमाणे बंधनातून मुक्त झालेले आपण, निर्जन प्रदेश वेगाने पार करत प्रकाशमान होता. ॥५ ॥

स त्वं नो अर्वन्निदाया विश्वेभिरग्ने अग्निभिरिधानः ।
वेषि रायो वि यासि दुच्छुना मदेम शतहिमाः सुवीराः ॥६ ॥
हे अश्वांप्रमाणे अत्यंत वेगवान अग्निदेवा ! आपण आपल्या शक्तीने प्रदीप्त होऊन आम्हा भक्तगणांचे अपकीर्ती पासून रक्षण करावे, ऐश्वर्य आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती आपण आम्हाला आमच्या शत्रूंचा नाश करणाऱ्या पराक्रमी पुत्र-पौत्रांसह शंभर वर्षे आनंदाने आणि उत्साहाने जगण्यासाठी आयुष्य द्यावे ही विनंती ॥६ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१३

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

त्वद्विश्वा सुभग सौभगान्यग्ने वि यन्ति वनिनो न वयाः ।
श्रुष्टी रयिर्वाजो वृत्रतूर्ये दिवो वृष्टिरीड्यो रीतिरपाम् ॥१॥

हे सौभाग्यशाली, भाग्यवान अग्निदेवा ! वृक्षाच्या फांद्या ज्याप्रमाणे चहुबाजूला पसरतात, अगदी त्याचप्रमाणे आपल्या कृपेने सर्व प्रकारची सुखे, ऐश्वर्य आणि समृद्धी चहुबाजूला पसरतात. आपल्या कृपेने वृत्रासुराचा (शत्रूचा) नाश करणाऱ्या युद्धात त्वरित आकाशातून वृष्टी होते. ॥१॥

त्वं भगो न आ हि रत्नमिषे परिज्मेव क्षयसि दस्मवर्चाः ।
अग्ने मित्रो न बृहत ऋतस्यासि क्षत्ता वामस्य देव भूरेः ॥२ ॥

हे दर्शनीय अग्निदेवा ! आपण वायुदेवांप्रमाणे सर्वत्र संचार करता. आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना भगदेवांप्रमाणे अन्न आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती. नियमांचे रक्षण करणाऱ्या मित्रदेवांप्रमाणे आपण आम्हा भक्तगणांना विपुल धनाचे वाटप करावे ही विनंती. ॥२ ॥

स सत्पतिः शवसा हन्ति वृत्रमग्ने विप्रो वि पणेर्भर्ति वाजम् ।
यं त्वं प्रचेत ऋतजात राया सजोषा नप्त्रापां हिनोषि ॥३ ॥

परमज्ञानी, प्रकट झालेल्या, जलाचे पौत्र असणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण प्रसन्न होऊन ज्या भक्तगणांना धन प्रदान करून पुढे नेता ते आपल्या पराक्रमाच्या जोरावर वृत्रासुरासारख्या शत्रूंचा नाश करतात आणि कंजूष (पणी) शत्रूंवर विजय मिळवतात॥३॥

यस्ते सूनो सहसो गीर्भिरुक्थैर्यज्ञैर्मर्तो निशितिं वेद्यानट् ।
विश्वं स देव प्रति वारमग्ने धत्ते धान्यं पत्यते वसव्यैः ॥४॥
हे बलपुत्र अग्निदेवा ! जे मर्त्य मानव,भक्तगण, स्तुतियुक्त स्तोत्रांनी, यज्ञांच्या माध्यमातून आपल्याकडून प्रेरणा प्राप्त करतात, ते भक्तगण आपल्या कृपेने सर्व प्रकारचे श्रेष्ठ धन-धान्य प्राप्त करतात आणि ऐश्वर्याचे स्वामी बनतात ॥४ ॥

ता नृभ्य आ सौश्रवसा सुवीराग्ने सूनो सहसः पुष्यसे धाः ।
कृणोषि यच्छवसा भूरि पश्वो वयो वृकायारये जसुरये ॥५ ॥
हे बलपुत्र अग्निदेवा ! आपण आपल्या भक्तगणांना आपल्या सामर्थ्याने आमच्या पराक्रमी पुत्रांसाठी अन्न, पशुधन आणि ऐश्वर्य प्रदान करावे जेणेकरून हिंस्र लांडग्या सारखे असलेले शत्रू आणि विरोधक आमचा काहीही वापर करून घेऊ शकणार नाहीत. ॥५ ॥

वद्मा सूनो सहसो नो विहाया अग्ने तोकं तनयं वाजि नो दाः।
विश्वाभिर्गीर्भिरभि पूर्तिमश्यां मदेम शतहिमाः सुवीराः ॥६ ॥
हे महान , बलपुत्र, अग्निदेवा ! स्तुती करणाऱ्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आपण बलवान पुत्र-पौत्र आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती. आम्हाला आपण आमच्या शत्रूंचा नाश करणाऱ्या पराक्रमी पुत्र-पौत्रांसह शंभर वर्षे आनंदाने आणि उत्साहाने जगण्यासाठी आयुष्य द्यावे ही विनंती ॥६ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१४

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि **छन्द** अनुष्टुप् ६ शक्वरी

अग्ना यो मर्त्यो दुवो धियं जुजोष धीतिभिः ।
भसन्नु ष प्र पूर्व्य इषं वुरीतावसे ॥१॥

हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण उत्तम कर्मांद्वारे आणि स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपली सेवा करण्यात रममाण होतात ते भक्तगण दैदिप्यमान होतात, त्यांना कल्याणासाठी आणि स्वतःच्या रक्षणासाठी समृद्धी प्राप्त होऊन ते सर्वांमध्ये श्रेष्ठ बनतात ॥१॥

अग्निरिद्धि प्रचेता अग्निर्वेधस्तम ऋषिः ।
अग्निं होतारमीळते यज्ञेषु मनुषो विशः॥२॥

हे अग्निदेवा ! आपण अत्यंत ज्ञानी (प्रचेता) , समृद्धी देणारे, सर्वोत्तम यज्ञकर्ते, ऋषितुल्य मार्गदर्शक आहात. हे अग्निदेवा ! आपण यज्ञामध्ये सर्व देवतांना आवाहन करता म्हणून यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करतात. ॥२॥

नाना ह्यग्नेऽवसे स्पर्धन्ते रायो अर्यः ।
तूर्वन्तो दस्युमायवो व्रतैः सीक्षन्तो अव्रतम् ॥३ ॥

हे अग्निदेवा ! श्रेष्ठ यज्ञकर्ते भक्तगण आपल्या रक्षणाची इच्छा धरून विविध मार्गांनी दिव्य धनाचा लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. ते भक्तगण सत्कर्मांचे आणि व्रताचे पालन करून, व्रतहीनांचा आणि दस्यूंचा नाश करतात. ॥३ ॥

अग्निरप्सामृतीषहं वीरं ददाति सत्पतिम् ।
यस्य त्रसन्ति शवसः संचक्षि शत्रवो भिया ॥४॥
हे अग्निदेवा ! आपण यज्ञकर्त्या भक्तगणांना, सत्याचा रक्षक (सत्पती), संकटांना व शत्रूंच्या आक्रमणांना धैर्याने तोंड देऊन त्यांचा पराभव करणारा पराक्रमी पुत्र प्रदान करता. त्या पुत्राच्या पराक्रमामुळे सर्व शत्रु त्याला केवळ पाहताक्षणीच भयाने थरथर कापतात.॥४॥

अग्निर्हि विद्मना निदो देवो मर्तमुरुष्यति । सहावा यस्यावृतो रयिर्वाजेष्ववृतः ॥५॥
हे अग्निदेवा ! आपण निश्चितपणे आपल्या मर्त्य मनुष्याचे, भक्तगणांचे, निंदकांपासून आणि संकटांपासून रक्षण करता. आपण शत्रूंचा पराभव करणारे आहात. आपले ऐश्वर्य जीवनाच्या संघर्षात कोणीही रोखू शकत नाही ॥५॥

अच्छा नो मित्रमहो देव देवानग्ने वोचः सुमतिं रोदस्योः ।
वीहि स्वस्तिं सुक्षितिं दिवो नृन्द्विषो अंहांसि दुरिता तरेम ता तरेम तवावसा तरेम॥६ ॥
हे मित्रांप्रमाणे परमप्रिय आणि दिव्यतेजाने युक्त अग्निदेवा ! आपण आकाश आणि पृथ्वी या दोन्ही लोकांमध्ये असणाऱ्या इतर देवतांपर्यंत आम्हा भक्तगणांच्या प्रार्थना पोहोचवून आम्हाला त्यांची कृपा मिळवून द्यावी ही विनंती. आपण आम्हाला कल्याणकारी (स्वस्ति) आणि उत्तम, सुरक्षित निवासस्थान प्रदान करावे ही विनंती. आपल्या सहाय्याने आम्ही भक्तगण आमच्या शत्रूंवर ,सर्व संकटांवर यशस्वीपणे मात करू शकू ॥६॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१५

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि

छन्द ३, १५- शक्वरी,६ अतिशक्वरी , १०, १४. १६, १९ त्रिष्टुप्
१६ अनुष्टुप्: १८ - बृहती, उरलेल्या जगती

**इममू षु वो अतिथिमुषर्बुधं विश्वासां विशां पतिमृञ्जसे गिरा।
वेतीद्दिवो जनुषा कच्चिदा शुचिर्ज्योक्चिदत्ति गर्भो
यदच्युतम् ॥१ ॥**

भरद्वाज कृषी म्हणतात," आपल्या सर्वांच्या घरात अतिथी म्हणून राहणाऱ्या, पहाटेच्या वेळी सर्वात आधी जागृत होणाऱ्या आणि संपूर्ण प्रजेचा स्वामी असणाऱ्या या अग्निदेवांना मी माझ्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न करत आहे. अग्निदेव जन्मापासूनच आकाशलोकातून येथे येतात. अरणीच्या गर्भात सुरक्षित असलेले हे अग्निदेव नष्ट न होणारी हविष्यान्नाची आहुती दीर्घकाळपर्यंत ग्रहण करतात ॥१॥

**मित्रं न यं सुधितं भृगवो दधुर्वनस्पतावीड्यमूर्ध्वशोचिषम् ।
स त्वं सुप्रीतो वीतहव्ये अद्भुत प्रशस्तिभिर्महयसे दिवेदिवे
॥२॥**

हे अद्भुत अग्निदेवा! भृगुऋषींनी आपल्याला अरणीच्या काष्ठात मित्राप्रमाणे सुरक्षितपणे स्थापित केलेल्या आपल्या ज्वाळा ऊर्ध्वगामी आहेत आणि सर्वांना पूजनीय आहेत . हे अग्निदेवा ! हविष्यान्नाची आहुती अर्पण करणाऱ्या वीतहव्य ऋषींच्या (ज्याने यज्ञात हविष्यान्न अर्पण केली आहे अशा भक्ताच्या) यज्ञामध्ये

दररोज स्तुतिस्तोत्रांद्वारे आपण पूजिले जाता. आपण त्यांच्यावर प्रसन्न व्हावे ही विनंती ॥२ ॥

स त्वं दक्षस्यावृको वृधो भूरर्यः परस्यान्तरस्य तरुषः ।
रायः सूनो सहसो मर्त्येष्वा छर्दिर्यच्छ वीतहव्याय सप्रथो
भरद्वाजाय सप्रथः ॥३ ॥
हे बलपुत्र अग्निदेवा! आपण बलवानांचे रक्षण करणारे, समृद्ध करणारे, दूरच्या आणि जवळच्या सर्व शत्रूंचा पराभव करणारे आहात. आपण हविष्यान्नाची आहुती अर्पण करणाऱ्या वीतहव्य ऋषींना, यज्ञात हविष्यान्नाची आहुती अर्पण केली आहे अशा मर्त्य भक्ताला, आणि भरद्वाज ऋषींना सुरक्षित आश्रय स्थान प्रदान करावे ही विनंती ॥३ ॥

द्युतानं वो अतिथिं स्वर्णरमग्निं होतारं मनुषः स्वध्वरम् ।
विप्रं न द्युक्षवचसं सुवृक्तिभिर्हव्यवाहमरतिं देवमृञ्जसे ॥४॥
भरद्वाज ऋषी म्हणतात," मी उत्तम पवित्र स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे, प्रकाशमान मानवांचे रक्षणकर्त्या, अतिथी प्रमाणे पूजनीय, यज्ञातील अग्रणी यज्ञकर्त्या, उत्तम प्रकारे यज्ञ पार पाडणाऱ्या, तेजस्वी वाणी बोलणाऱ्या, हविष्यान्नाची आहुती देवतांपर्यंत पोहोचविणाऱ्या अग्निदेवांना प्रसन्न करतो "॥४ ॥

पावकया यश्चितयन्त्या कृपा क्षामन्नुरुच उषसो न भानुना ।
तूर्वन्न यामन्नेतशस्य नू रण आ यो घृणे न ततृषाणो अजरः
॥५॥

यज्ञकर्त्या भक्तगणांना पवित्र करणाऱ्या, चेतना जागृत करणाऱ्या, आपल्या दिव्य प्रकाशाने पहाटेच्या किरणांप्रमाणे दैदिप्यमान, युद्धामध्ये सूर्यदेवांच्या वेगवान अश्वाप्रमाणे धावणाऱ्या, मार्गावरील शत्रूंचा नाश करणाऱ्या, अमर, तेजस्वी, तहानलेल्या व्यक्तीप्रमाणे यज्ञातील आहुती ग्रहण करण्यासाठी अत्यंत उत्सुकतेने आहुती ग्रहण करणाऱ्या अग्निदेवांची आम्ही भक्तगण उपासना करतो ॥५ ॥

अग्निमग्निं वः समिधा दुवस्यत प्रियम्प्रियं वो अतिथिं गृणीषणि ।
उप वो गीर्भिरमृतं विवासत देवो देवेषु वनते हि वार्यं देवो देवेषु वनते हि नो दुवः ॥६ ॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुमच्या घरामध्ये अतिथीप्रमाणे आलेल्या आणि सर्वांना अत्यंत प्रिय असलेल्या, यज्ञातील अग्निदेवाच्या प्रत्येक रूपाला (अग्निम्-अग्निम्) समिधा अर्पण करून पूजा करावी. आपल्या स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने अमर अग्निदेवांना प्रसन्न करावे कारण प्रकाशमान अग्निदेव सर्वदेवांमध्ये स्वीकारण्यायोग्य ऐश्वर्य प्रदान करतात. ॥६ ॥

समिद्धमग्निं समिधा गिरा गृणे शुचिं पावकं पुरो अध्वरे ध्रुवम् ।
विप्रं होतारं पुरुवारमद्रुहं कविं सुम्नैरीमहे जातवेदसम् ॥७ ॥

समिधांनी उत्तम प्रकारे प्रदीप्त झालेल्या, अत्यंत पवित्र, सर्वांना पावन करणाऱ्या , हिंसारहित, यज्ञाच्या अग्रभागी असणाऱ्या अग्निदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तोत्रांच्या पठणाने स्तुती

करतो. उत्पन्न झालेल्या सर्व सृष्टीला जाणणाऱ्या (जातवेदा), परम ज्ञानी, देवांना आवाहन करणाऱ्या, कोणाचाही द्रोह न करणाऱ्या आणि सर्वांचे कल्याण करणाऱ्या त्या भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेल्या अग्निदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतो ॥७ ॥

त्वां दूतमग्ने अमृतं युगेयुगे हव्यवाहं दधिरे पायुमीड्यम् ।
देवासश्च मर्तासश्च जागृविं विभुं विश्पतिं नमसा नि षेदिरे ॥८ ॥

हे अग्निदेवा! आपण अमर आहात. प्रत्येक युगात देवांनी आणि भक्तगणांनी आपल्याला दूत, यज्ञातील हविष्यान्नाची आहुती देवांपर्यंत वाहून नेणारे , सर्वांचे रक्षण करणारे आणि स्तुतीस योग्य मानून यज्ञवेदीवर स्थापित केले आहे. सदैव जागृत राहणाऱ्या, सर्वव्यापी आणि प्रजेचा स्वामी असलेल्या हे अग्निदेवा! आपल्याला देव आणि मानव या दोघांनी नतमस्तक होऊन यज्ञवेदीवर प्रस्थापित केले आहे ॥८ ॥

विभूषन्नग्न उभयाँ अनु व्रता दूतो देवानां रजसी समीयसे ।
यत्ते धीतिं सुमतिमावृणीमहेऽध स्मा नस्त्रिवरूथः शिवो भव ॥९ ॥

हे अग्निदेवा! आपण आपल्या व्रतानुसार देव आणि मनुष्य या दोघांना तृप्त करता (शोभा वाढवता) आणि आपण देवांचा दूत संदेशवाहक असून पृथ्वी आणि आकाश या दोन्ही लोकांमध्ये निरंतर संचार करता. आम्ही आपल्या दिव्य विचारांचा आणि श्रेष्ठ बुद्धीचा स्वीकार करतो. आपण आमचे तिन्ही स्तरांवर (शरीर, मन

आणि बुद्धीने) रक्षण करणारे तिहेरी कवच बनून आमच्यासाठी अत्यंत कल्याणकारी व्हावे ही विनंती ॥९ ॥

तं सुप्रतीकं सुदृशं स्वञ्चमविद्वांसो विदुष्टरं सपेम ।
स यक्षद्विश्वा वयुनानि विद्वान्प्र हव्यमग्निरमृतेषु
वोचत् ॥१०॥

सुंदर रूप असलेल्या, दर्शनीय आणि यज्ञाच्या ठिकाणी उत्तम रीतीने गमन करणाऱ्या, अत्यंत विद्वान अशा अग्निदेवांची आम्ही अज्ञानी यज्ञकर्ते भक्तगण मनोभावे सेवा करतो. सर्व मार्गांचे आणि ज्ञानाचे पूर्ण भान असलेले सर्वज्ञ अग्निदेव आमचा हा यज्ञ यशस्वी करो आणि आम्ही अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती अमर अशा सर्व देवतांपर्यंत पोहोचवून त्यांना तृप्त करो ॥१० ॥

तमग्ने पास्युत तं पिपर्षि यस्त आनट् कवये शूर धीतिम् ।
यज्ञस्य वा निशितिं वोदितिं वा तमित्पृणक्षि शवसोत
राया ॥११ ॥

हे शूर, भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेल्या अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाच्या प्रारंभी आणि यज्ञाच्या समाप्तीच्या वेळी आपल्याला भक्तिभावाने हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात त्यांचे आपण रक्षण करून सर्व संकटातून सुखरूपपणे बाहेर काढता आणि आशा भक्तांना आपण समर्थ धनाने समृद्ध करता ॥११ ॥

त्वमग्ने वनुष्यतो नि पाहि त्वमु नः सहसावन्नवद्यात् ।
सं त्वा ध्वस्मन्वदभ्येतु पाथः सं रयिः स्पृहयाय्यः सहस्री॥१२॥

हे बलशाली अग्निदेवा ! आपण आम्हा भक्तगणांचा द्वेष करणाऱ्या शत्रूंपासून आमचे रक्षण करावे, निंदनीय कर्मापासून वाचवावे ही विनंती. सर्व दोषांचा आणि अज्ञानाचा नाश करणारी हविष्यान्नाची आहुती आपल्याला प्राप्त होवो आणि आपल्या कृपेने आम्हा भक्तगणांना स्पृहणीय संपत्ती लाभो ही विनती ॥१२ ॥

अग्निर्होता गृहपतिः स राजा विश्वा वेद जनिमा जातवेदाः ।
देवानामुत यो मर्त्यानां यजिष्ठः स प्र यजतामृतावा ॥१३ ॥
हे गृहपती, यज्ञाचे अग्रणी यज्ञकर्ते, प्रकाशमान, उत्पन्न झालेल्या सर्व चराचर सृष्टीला जाणणाऱ्या जातवेदा अग्निदेवा ! आपण देव आणि मर्त्य मानव या दोघांमध्ये सर्वोत्तम यज्ञ करणारे आहात. ॥१३ ॥

अग्ने यदद्य विशो अध्वरस्य होतः पावकशोचे वेष्ट्वं हि यज्वा।
ऋता यजासि महिना वि यद्भूर्हव्या वह यविष्ठ या ते अद्य ॥१४ ॥
हे आपल्या ज्वाळांनी पवित्र करणाऱ्या, नित्य तरुण अग्निदेवा ! आपण यज्ञाचे मुख्य यज्ञकर्ते म्हणून भक्तगणांसाठी यज्ञ करावा ही विनंती. सर्व बाजूला प्रकट झालेल्या हे अग्निदेवा ! आपण सत्याच्या नियमांनुसार देवतांचे पूजन करावे आणि आपल्यासाठी तसेच देवतांसाठी अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती सर्व देवतांपर्यंत पोहोचवावी ही विनंती. ॥१४ ॥

अभि प्रयांसि सुधितानि हि ख्यो नि त्वा दधीत रोदसी यजध्यै ।

अवा नो मघवन्वाजसातावग्ने विश्वानि दुरिता तरेम ता तरेम तवावसा तरेम ॥१५ ॥

हे अग्निदेवा ! उत्तम प्रकारे सिद्ध केलेल्या हविष्यान्नाची आहुती स्वीकारण्यासाठी आपण प्रकट व्हावे ही विनंती. आकाश आणि पृथ्वी या दोघांचे पूजन करण्यासाठी आम्ही भक्तगण आपली स्थापना करत आहोत. आपण युद्धातील विजयात आणि समृद्धीच्या काळात आमचे रक्षण करावे, आपल्या सहाय्याने सर्व संकटातून मुक्त करावे ही विनंती. आपल्या कृपेने आम्ही सर्व संकटे पार करू शकू ॥१५ ॥

अग्ने विश्वेभिः स्वनीक देवैरूर्णावन्तं प्रथमः सीद योनिम् ।
कुलायिनं घृतवन्तं सवित्रे यज्ञं नय यजमानाय साधु ॥१६॥

हे तेजस्वी रूपाच्या अग्निदेवा ! आपण सर्व देवतांना सोबत येऊन घृताने युक्त आणि घरट्यासारख्या सुरक्षित व मऊ अशा या यज्ञवेदीवर सर्वप्रथम विराजमान व्हावे ही विनंती. सर्वांना प्रेरणा देणाऱ्या देवतांसाठी आणि यज्ञ करणाऱ्या भक्तगणांसाठी हा यज्ञ उत्तम प्रकारे देवतांपर्यंत पोहोचवावा ही विनंती. ॥१६ ॥

इममु त्यमथर्ववदग्निं मन्थन्ति वेधसः ।
यमङ्कूयन्तमानयन्नमूरं श्याव्याभ्यः ॥१७॥

हे अग्निदेवा ! ज्ञानी आणि बुद्धिमान यज्ञकर्ते, काळ्या रंगाच्या अरणी मधून, नागमोडी गतीने पसरणाऱ्या (जिव्हा) ज्वाळा असलेल्या आपल्याला महर्षी अथर्वा प्रमाणेच मंथन करून प्रकट करतात. ॥१७ ॥

जनिष्वा देववीतये सर्वताता स्वस्तये ।
आ देवान्वक्ष्यमृताँ ऋतावृधो यज्ञं देवेषु पिस्पृशः ॥१८॥
हे अग्निदेवा ! देवतांना हविष्यान्नाची आहुती अर्पण करण्यासाठी, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी आपण यज्ञवेदीमध्ये प्रदीप्त व्हावे ही विनंती. सृष्टीच्या नियमाचे पालन करणाऱ्या अमर देवतांना आमच्या यज्ञात घेऊन यावे आणि आमचा यज्ञ देवतांपर्यंत पोहोचवा ही विनंती ॥१८॥

वयमु त्वा गृहपते जनानामग्ने अकर्म समिधा बृहन्तम् ।
अस्थूरि नो गार्हपत्यानि सन्तु तिग्मेन नस्तेजसा सं शिशाधि ॥१९ ॥
हे भक्तगणांचे रक्षक आणि घराचे स्वामी असलेल्या अग्निदेवा ! आम्ही भक्तगण पवित्र समिधा अर्पण करून आपल्याला प्रदीप्त करत आहोत. आम्हा भक्तगणांचे कौटुंबिक जीवन स्थिर आणि समृद्ध राहो ही विनंती. आपल्या तेजाने आमची बुद्धी तेजस्वी करावी ही विनंती ॥१९ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१६

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** अग्नि

छन्द १, ६ वर्धमाना, २७, ४७-४८.अनुष्टुप् : ४६ त्रिष्टुप् उरलेल्या जगती

त्वमग्ने यज्ञानां होता विश्वेषां हितः । देवेभिर्मानुषे जने ॥१ ॥

हे अग्निदेवा ! आपण सर्व यज्ञांचे मुख्य यज्ञकर्ते आहात. देवांद्वारे मनुष्य लोकात प्रस्थापित झालेले आपण सर्व मानवांचे परम हितकर्ते आणि कल्याण करणारे आहात. ॥१॥

स नो मन्द्राभिरध्वरे जिह्वाभिर्यजा महः ।
आ देवान्वक्षि यक्षि च ॥२ ॥

हे अग्निदेवा ! आपण आपल्या आनंददायी आणि स्तुती करणाऱ्या जिभांनी (ज्वाळांनी) आमच्या या पवित्र यज्ञात महान देवतांचे पूजन करावे ही विनंती. आपण सर्व देवतांना यज्ञस्थळी घेऊन यावे आणि त्यांचे पूजन करावे ही विनंती ॥२ ॥

वेत्था हि वेधो अध्वनः पथश्च देवाञ्जसा ।
अग्ने यज्ञेषु सुक्रतो ॥३ ॥

हे उत्तम बुद्धी असणाऱ्या आणि सर्वज्ञ अग्निदेवा ! आपण देवलोकांचे सर्व मार्ग आणि विधी उत्तम प्रकारे जाणता म्हणून सरळ मार्गाने सर्व देवतांना आमच्या यज्ञस्थळी घेऊन यावे ही विनंती. ॥३ ॥

त्वामीळे अध द्विता भरतो वाजिभिः शुनम् ।
ईजे यज्ञेषु यज्ञियम् ॥४ ॥
हे अग्निदेवा ! आम्ही भक्तगण आपली स्तुती करतो. पूर्वी भरत राजाने आपल्या वेगवान अश्वांसह ऐहिक व पारलौकिक या दोन प्रकारच्या सुखाच्या प्राप्तीसाठी सर्व यज्ञांमध्ये, यज्ञास पात्र असलेल्या आपली पूजा केली होती ॥४॥

त्वमिमा वार्या पुरु दिवोदासाय सुन्वते । भरद्वाजाय दाशुषे ॥५ ॥
हे अग्निदेवा ! सोमरस सिद्ध करणाऱ्या दिवोदास ऋषींसाठी आणि यज्ञामध्ये हविष्यान्नाची आहुती अर्पण करणाऱ्या भरद्वाज ऋषींसाठी पुष्कळ प्रमाणात श्रेष्ठ आणि स्वीकारण्यास योग्य धन घेऊन यावे ही विनंती ॥५ ॥

त्वं दूतो अमर्त्य आ वहा दैव्यं जनम् ।
शृण्वन्विप्रस्य सुष्टुतिम् ॥६ ॥
हे अमर, देवदूत अग्निदेवा ! आपण स्तुती करणाऱ्या विप्राची, भरद्वाज ऋषींची, प्रार्थना ऐकून दिव्य देवतांना यज्ञस्थळी घेऊन यावे ही विनंती ॥६ ॥

त्वामग्ने स्वाध्यो मर्तासो देववीतये ।
यज्ञेषु देवमीळते ॥७ ॥
हे अग्निदेवा ! शुद्ध मनाने चिंतन करणारे मर्त्य मनुष्य, भक्तगण, देवतांना यज्ञामध्ये आमंत्रित करण्यासाठी सर्व यज्ञांमध्ये देवस्वरूप असलेल्या आपलीच स्तुती करता ॥७॥

तव प्र यक्षि संदृशमुत क्रतुं सुदानवः ।
विश्वे जुषन्त कामिनः ॥८ ॥
हे अग्निदेवा ! उत्तम दान देणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या दिव्यरूपाची आणि श्रेष्ठ संकल्पाची यज्ञामध्ये पूजा करतो आणि आपल्या कृपेची कामना बाळगणारे आम्ही तृप्ती मिळवतो ॥८ ॥

त्वं होता मनुर्हितो वह्निरासा विदुष्टरः ।
अग्ने यक्षि दिवो विशः ॥९ ॥
हे सर्वश्रेष्ठ ज्ञानी, मानवाच्या कल्याणासाठी स्थापित केलेल्या अग्निदेवा ! आपण यज्ञाचे अग्रणी यज्ञकर्ते आहात. आपण देवतांपर्यंत हविष्यान्नाची आहुती पोहोचवावी आणि आम्हा भक्तगणांसाठी स्वर्गातील देवतांचे पूजन करावे ही विनंती ॥९ ॥

अग्न आ याहि वीतये गृणानो हव्यदातये ।
नि होता सत्सि बर्हिषि ॥१०॥
हे अग्निदेवा ! आम्ही करत असलेल्या स्तुतीने प्रसन्न होऊन आम्ही अर्पण केलेल्या हविष्यान्नाची आहुती स्वीकारण्यासाठी आमच्या यज्ञामध्ये अग्रणी यज्ञकर्ता म्हणून कुशासनावर विराजमान व्हावे ही विनंती ॥१० ॥

तं त्वा समिद्भिरङ्गिरो घृतेन वर्धयामसि ।
बृहच्छोचा यविष्ठ्य ॥११ ॥
हे सदैव नूतन राहणाऱ्या आङ्गिरसऋषींच्या कुळातील अग्निदेवा ! आपल्याला आम्ही यज्ञातील यज्ञकर्ते भक्तगण समिधा आणि

घृताची आहुती देऊन प्रदीप्त करत आहोत. आपण आमच्या यज्ञात विशाल रूपात प्रकाशमान व्हावे ही विनंती .॥११ ॥

स नः पृथु श्रवाय्यमच्छा देव विवाससि ।
बृहदग्ने सुवीर्यम् ॥१२॥
हे प्रकाशमान अग्निदेवा! आपण आमच्याकडे येऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना महान कीर्ती, श्रेष्ठ ऐश्वर्य आणि उत्तम सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती॥१२ ॥

त्वामग्ने पुष्करादध्यथर्वा निरमन्थत ।
मूर्ध्नो विश्वस्य वाघतः ॥१३॥
हे अग्निदेवा ! यज्ञाची स्तुती करणाऱ्या (वाघतः), कमळाच्या शिखरावरून अथर्व ऋषींनी मन्थन करून आपल्याला प्रकट केले आहे ॥१३ ॥

तमु त्वा दध्यङ्ङृषिः पुत्र ईधे अथर्वणः ।
वृत्रहणं पुरंदरम् ॥१४ ॥
हे अग्निदेवा ! अथर्व ऋषींचे पुत्र असलेल्या दध्यंग (दधीची) ऋषींनी, शत्रूंचे किल्ले उद्ध्वस्त करणाऱ्या आणि वृत्रासुराचा वध करणाऱ्या, आपली स्तुती केली आणि आपल्याला प्रदीप्त केले. ॥१४ ॥

तमु त्वा पाथ्यो वृषा समीधे दस्युहन्तमम् ।
धनंजयं रणेरणे ॥१५ ॥

हे शत्रूंचा नाश करणाऱ्या, तसेच प्रत्येक युद्धात विजय मिळवून देणाऱ्या, सामर्थ्यवान अग्निदेवा ! आपल्याला पाथ्य ऋषींनी (किंवा यज्ञ करणाऱ्या यजमानाने) यज्ञवेदीवर उत्तम प्रकारे प्रदीप्त केले आहे ॥१५ ॥.

एह्यू षु ब्रवाणि तेऽग्न इत्थेतरा गिरः ।
एभिर्वर्धास इन्दुभिः ॥१६ ॥
हे अग्निदेवा ! आपण आमच्या यज्ञस्थळी यावे, आम्ही भक्तगण आपल्यासाठी सर्वश्रेष्ठ स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करतो. आम्ही अर्पण केलेल्या सोमरसाच्या थेंबांनी आपण समृद्ध व्हावे ही विनंती ॥१६ ॥

यत्र क्व च ते मनो दक्षं दधस उत्तरम् ।
तत्रा सदः कृणवसे ॥१७ ॥
हे अग्निदेवा ! आपण आपले श्रेष्ठ, समर्थ मन ज्या ठिकाणी एकाग्रतेने लावता त्या ठिकाणी आपण आपले हक्काचे आणि आदराचे निवास स्थान निर्माण करता ॥१७ ॥

नहि ते पूर्तमक्षिपद्भुवन्नेमानां वसो । अथा दुवो वनवसे ॥१८ ॥
हे सर्वांना आश्रय देणाऱ्या अग्निदेवा ! आपल्याकडून भक्तांना मिळणारे दान कोणीही नष्ट करू शकत नाही. आम्ही भक्तगण करत असलेली आपली सेवा आपण आनंदाने स्वीकारावी ही विनंती ॥१८ ॥.

आग्निरगामि भारतो वृत्रहा पुरुचेतनः । दिवोदासस्य सत्पतिः ॥१९ ॥

भरत वंशाचे रक्षक, अथांग ज्ञानी, वृत्रासुराचा नाश करणाऱ्या हे अग्निदेवा ! आपण भक्त दिवोदासासाठी प्रकट झाला आहात. ॥१९ ॥

स हि विश्वाति पार्थिवा रयिं दाशन्महित्वना ।
वन्वन्नवातो अस्तृतः ॥२०॥

हे अग्निदेवा ! आपण आपल्या सामर्थ्याने संपूर्ण विश्वाची श्रेष्ठ धर्म संपत्ती आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करता. आपण संकटावर विजय मिळवणारे, अजेय आहात. ॥२०॥

स प्रत्नवन्नवीयसाग्ने द्युम्नेन संयता ।
बृहत्ततन्थ भानुना ॥२१॥

हे अग्निदेवा !आपण प्राचीन आणि नवनवीन अशा दोन्ही प्रकारच्या दिव्य तेजाने युक्त आहात. आपण आपला दैदीप्यमान प्रकाश या संपूर्ण विशाल विश्वामध्ये पसरवला आहे॥२१॥

प्र वः सखायो अग्नये स्तोमं यज्ञं च धृष्णुया ।
अर्च गाय च वेधसे ॥२२॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आपण सर्वज्ञानी, विधात्या अग्निदेवांसाठी अत्यंत धैर्याने आणि उत्साहाने स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करावे, त्यांना हविष्यान्नाची आहुती अर्पण करावी आणि पूजा करावी. ॥२२ ॥

स हि यो मानुषा युगा सीदद्धोता कविक्रतुः ।
दूतश्च हव्यवाहनः ॥२३॥
हे अग्निदेवा ! आपण भक्तगणांच्या प्रत्येक पिढीमध्ये निवास करणारे अलौकिक बुद्धिमत्ता असलेले अग्रणी यज्ञकर्ते, देवांचे दूत आणि भक्तगणांनी अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती देवतांपर्यंत पोहोचवणारे आहात. ॥२३ ॥

ता राजाना शुचिव्रतादित्यान्मारुतं गणम् ।
वसो यक्षीह रोदसी ॥२४॥
हे निवासस्थान प्रदान करणाऱ्या, पूजनीय अग्निदेवा ! आपण यज्ञामध्ये नियमाचे पालन करणाऱ्या मित्रदेव आणि वरुणदेव, सर्व आदित्य देवतांचे, मरुद्गणांचे आकाशलोक आणि पृथ्वीलोक यांचे पूजन करावे ही विनंती ॥२४ ॥

वस्वी ते अग्ने संदृष्टिरिषयते मर्त्याय ।
ऊर्जो नपादमृतस्य ॥२५॥
हे बलपुत्रा, अमर अग्निदेवा ! आपले ऐश्वर्य, संपन्न आणि दिव्य दर्शन मर्त्य मनुष्याला, भक्तगणांना, अन्न, समृद्धी आणि नवी प्रेरणा प्रदान करते ॥२५॥

क्रत्वा दा अस्तु श्रेष्ठोऽद्य त्वा वन्वन्त्सुरेक्णाः ।
मर्त आनाश सुवृक्तिम् ॥२६॥
हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपल्या सत्कर्माद्वारे प्रसन्न करत आहेत, त्यांना आपण सर्वश्रेष्ठ आणि समृद्ध करावे ही

विनंती. अशा स्तुती करणाऱ्या करणाऱ्या मर्त्य मनुष्यांवर, भक्तगणांवर, आपण कृपा करावी ही विनंती. ॥२६ ॥

ते ते अग्ने त्वोता इषयन्तो विश्वमायुः ।
तरन्तो अर्यो अरातीर्वन्वन्तो अर्यो अरातीः ॥२७॥
हे अग्निदेवा ! आपल्याद्वारे रक्षिलेले आणि आपल्या कृपेने अन्न आणि समृद्धी मिळवणारे यज्ञकर्ते भक्तगण आयुष्य आनंदाने व्यतीत करोत. असे भक्तगण शत्रूंच्या कुटील भावनांवर मात करत त्यांचा पूर्ण पराभव करतात ॥२७ ॥

अग्निस्तिग्मेन शोचिषा यासद्विश्वं न्यत्रिणम् ।
अग्निर्नो वनते रयिम् ॥२८॥
हे अग्निदेवा ! आपण आपल्यात तीक्ष्ण ज्वाळांनी सर्व दुष्ट व भक्षण करणाऱ्या राक्षसी शक्तींचा पूर्णपणे नाश करावा तसेच आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम धन आणि समृद्धी प्राप्त करून द्यावी ही विनंती ॥२८ ॥

सुवीरं रयिमा भर जातवेदो विचर्षणे ।
जहि रक्षांसि सुक्रतो ॥२९॥
हे सर्वद्रष्ट्या, सर्व काही जाणणाऱ्या जातवेदा अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम पराक्रमी पुत्रांनी युक्त अशी संपत्ती प्रदान करावी आणि दुष्ट राक्षसी शक्तींचा नाश करावा ही विनंती ॥२९ ॥

त्वं नः पाह्यंहसो जातवेदो अघायतः ।

रक्षा णो ब्रह्मणस्कवे ॥३०॥
हे सर्व काही जाणणाऱ्या जातवेदा, सर्वश्रेष्ठ ज्ञानी, ब्रह्मणस्पती अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सर्व प्रकारच्या संकटांपासून, पापांपासून आणि वाईट प्रवृत्तीच्या लोकांपासून वाचवावे आणि आमचे सदैव रक्षण करावे ही विनंती ॥३० ॥

यो नो अग्ने दुरेव आ मर्तो वधाय दाशति ।
तस्मान्नः पाह्यंहसः ॥३१॥
हे अग्निदेवा ! जो कोणी दुष्ट बुद्धीचा मनुष्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर शस्त्राने प्रहार करण्यासाठी सज्ज झाला आहे अशा पापी आणि दुराचारी शत्रूपासून आपण आमचे सर्व बाजूंनी रक्षण करावे ही विनंती ॥३१॥

त्वं तं देव जिह्वया परि बाधस्व दुष्कृतम् ।
मर्तो यो नो जिघांसति ॥३२॥
हे अग्निदेवा ! जो मनुष्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना इजा पोहोचवण्याची इच्छा ठेवतो अशा पाप कर्म करणाऱ्या शत्रूला आपण आपल्या ज्वाळांनी पूर्णपणे नष्ट करावे ही विनंती ॥३२ ॥

भरद्वाजाय सप्रथः शर्म यच्छ सहन्त्य ।
अग्ने वरेण्यं वसु ॥३३॥
भारद्वाज ऋषी म्हणतात, " हे शत्रूंवर विजय मिळवणाऱ्या, अग्निदेवा! आपण मला सुरक्षित आश्रय, वांछित ऐश्वर्य प्रदान कारवे ही विनंती" ॥३३ ॥

अग्निर्वृत्राणि जङ्घनद्द्रविणस्युर्विपन्यया ।
समिद्धः शुक्र आहुतः ॥३४॥
हे अग्निदेवा ! आपण उत्तम प्रकारे प्रदीप्त होऊन, शुद्ध हविष्यान्नाची आहुती स्वीकारून, स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सुख-समृद्धी प्रदान करावी ही विनंती ॥३४॥

गर्भे मातुः पितुष्पिता विदिद्युतानो अक्षरे ।
सीदन्नृतस्य योनिमा ॥३५॥
हे अग्निदेवा ! आपण दिव्य प्रकाशाने चमकणारा परमपिता आहात. आपण अविनाशी तत्वामध्ये आणि मातेच्या गर्भाच्या रूपात असलेल्या वैश्विक सत्याच्या उत्पत्ती स्थानामध्ये विराजमान आहात. ॥३५ ॥

ब्रह्म प्रजावदा भर जातवेदो विचर्षणे ।
अग्ने यद्दीदयद्दिवि ॥३६॥
हे सर्व काही जाणणाऱ्या जातवेदा, सर्वद्रष्ट्या अग्निदेवा ! आपल्या स्वर्गात चमकणाऱ्या दिव्य प्रकाशाच्या सामर्थ्याने आपण आमच्यासाठी उत्तम अन्न, धन आणि ज्ञान आम्हाला प्रदान करावे ही विनंती ॥३६॥

उप त्वा रण्वसंदृशं प्रयस्वन्तः सहस्कृत ।
अग्ने ससृज्महे गिरः ॥३७ ॥
हे अपार बलाने उत्पन्न झालेल्या, रमणीय रूप असणाऱ्या अग्निदेवा! यज्ञात हविष्य अर्पण करणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण

आपल्या समीप येऊन आमची स्तुती आपल्याला समर्पित करत आहोत ॥३७ ॥

उप च्छायामिव घृणेरगन्म शर्म ते वयम् ।
अग्ने हिरण्यसंदृशः ॥३८ ॥
हे सोन्यासारख्या चमकदार रूप असलेल्या अग्निदेवा ! तीव्र उन्हामध्ये जशी सावली सुख देते, तशाच आपल्या सुखद आश्रयाला आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आलो आहोत. ॥३८ ॥

य उग्र इव शर्यहा तिग्मशृङ्गो न वंसगः ।
अग्ने पुरो रुरोजिथ ॥३९ ॥
हे अग्निदेवा ! आपण उग्र, भयंकर धनुर्धाऱ्याप्रमाणे शत्रूंचा नाश करणारे आणि तीक्ष्ण शिंगे असलेल्या बलाढ्य बैलाप्रमाणे शक्तिशाली आहात. आपण शत्रूंची मोठी आणि मजबूत नगरे पूर्णपणे उद्ध्वस्त केली आहेत.॥३९ ॥

आ यं हस्ते न खादिनं शिशुं जातं न बिभ्रति ।
विशामग्निं स्वध्वरम् ॥४० ॥
हे अग्निदेवा ! ज्याप्रमाणे लोक हातामध्ये नवीन जन्मलेल्या, आभूषण घातलेल्या लहान बालकाला प्रेमाने व काळजीपूर्वक धरतात, त्याचप्रमाणे यज्ञकर्ते भक्तगण , यज्ञ उत्तम प्रकारे पार पाडणासाठी आपल्याला हातात धारण करतात (प्रदीप्त करतात). ॥४० ॥

प्र देवं देववीतये भरता वसुवित्तमम् ।

आ स्वे योनौ नि षीदतु ॥४१ ॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! "देवांना तृप्त करणाऱ्या आणि सर्वश्रेष्ठ धन मिळवून देणाऱ्या प्रकाशमान अग्निदेवांना आदराने यज्ञवेदी मध्ये प्रस्थापित करावे. हे अग्निदेवा ! आपण आपल्या स्वतःच्या योग्य यज्ञवेदीवर चांगल्या प्रकारे विराजमान व्हावे ही विनंती ॥४१॥

आ जातं जातवेदसि प्रियं शिशीतातिथिम् ।
स्योन आ गृहपतिम् ॥४२॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! सर्व काही जाणणाऱ्या, घराचे रक्षण करणाऱ्या, प्रिय, अतिथीरूपी अग्निदेवांना त्यांच्या सुखकारक अशा स्थानावर, यज्ञवेदीवर, उत्तम प्रकारे प्रदीप्त करून स्थापित करावे ॥४२ ॥

अग्ने युक्ष्वा हि ये तवाश्वासो देव साधवः ।
अरं वहन्ति मन्यवे ॥४३॥
हे अग्निदेवा ! आपण आपले उत्तम, कार्यक्षम आणि आज्ञाधारक अश्व आपल्या रथाला जोडून आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥४३ ॥

अच्छा नो याह्या वहाभि प्रयांसि वीतये ।
आ देवान्त्सोमपीतये ॥४४॥
हे अग्निदेवा ! आपण आमच्या यज्ञस्थळी आगमन करावे ही विनंती. या यज्ञातील हविष्यान्नाची आहुती आणि सिद्ध केलेला

सोमरस प्राशन करण्यासाठी सर्व देवतांना घेऊन यावे ही विनंती ॥४४ ॥

उदग्ने भारत द्युमदजस्रेण दविद्युतत् ।
शोचा वि भाह्यजर ॥४५ ॥
हे अग्निदेवा ! आपण कधी वृद्ध न होणारे, भरतकुळाचे रक्षण करणारे आहात. आपण सतत वाहणाऱ्या दिव्य आणि दैदिप्यमान ज्वाळांसह प्रदीप्त व्हावे आणि आपला प्रकाश सर्व दिशांना पसरवावा ही विनंती ॥४५ ॥

वीती यो देवं मर्तो दुवस्येदग्निमीळीताध्वरे हविष्मान् ।
होतारं सत्ययजं रोदस्योरुत्तानहस्तो नमसा विवासेत् ॥४६॥
हे अग्निदेवा ! जे मर्त्य मनुष्य, भक्तगण, हातामध्ये हविष्यान्नाची आहुती घेऊन हिंसारहित यज्ञात आपली स्तुती, आदर सत्कार करतात, ते भक्तगण, पृथ्वी आणि आकाश या दोन्ही लोकांमधील देवांचे आवाहन करत, नतमस्तक होऊन, सत्याचे पूजन करणाऱ्या आपल्याला प्रसन्न करतात ॥४६ ॥

आ ते अग्न ऋचा हविर्हृदा तष्टं भरामसि ।
ते ते भवन्तूक्षण ऋषभासो वशा उत ॥४७ ॥
हे अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अंतःकरणातून अत्यंत श्रद्धेने स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने आपल्यासाठी हविष्यान्नाची आहुती घेऊन आलो आहोत आणि ती आपल्याला अर्पण करत आहोत. आम्ही अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती

आपल्यासाठी पुष्ट करणारे तरुण बलवान बैल (ऋषभ) आणि गायींसारखे समृद्धी देणारे ठरोत ॥४७ ॥

अग्निं देवासो अग्रियमिन्धते वृत्रहन्तमम् ।
येना वसून्याभृता तृळ्हा रक्षांसि वाजिना ॥४८ ॥
हे अग्रगण्य अग्निदेवा ! आपल्याला सर्व देव एकत्र येऊन प्रदीप्त करतात. हे अग्निदेवा ! आपण संकटांचा आणि अंधाराचा नाश करण्यात सर्वोत्तम आहात. आपल्या शक्तिमुळे सर्व प्रकारची सुख-समृद्धी आणि ऐश्वर्य प्राप्त होते आणि सर्व राक्षसी शक्तींचा पूर्णपणे नाश होतो ॥४८ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१७

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप् १५ द्विपदा त्रिष्टुप्

पिबा सोममभि यमुग्र तर्द ऊर्वं गव्यं महि गृणान इन्द्र ।
वि यो धृष्णो वधिषो वज्रहस्त विश्वा वृत्रममित्रिया शवोभिः ॥१॥

हे पराक्रमी इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करतो. आपण सिद्ध केलेला सोमरस प्राशन करावा ही विनंती. हे धैर्यवान इंद्रदेवा! हातात वज्र धारण करून, महान शक्तीने आपण (पणी असुरांनी चोरलेल्या आणि गुहेत लपवलेल्या) गायींना शोधून काढले आणि त्यांना मुक्त केले. आपण आपल्या शक्तीने सर्व शत्रूंचा आणि वृत्रासुराचा वध केला ॥१॥

स ईं पाहि य ऋजीषी तरुत्रो यः शिप्रवान्वृषभो यो मतीनाम्।
यो गोत्रभिद्वज्रभृद्यो हरिष्ठाः स इन्द्र चित्राँ अभि तृन्धि वाजान् ॥२ ॥

सोमरस प्राशन करणाऱ्या, संकटांतून तारून नेणाऱ्या, सुंदर हनुवटी असलेल्या, देखण्या , भक्तांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या, बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या, गायींचे गोठे (किंवा मेघ) मुक्त करणाऱ्या , वज्र धारण करणाऱ्या आणि पिवळसर रंगाच्या अश्व जोडलेल्या रथावर आरूढ होणाऱ्या हे इंद्रदेवा ! आपण आमचे रक्षण करावे आणि आम्हाला विविध प्रकारचे अद्भुत अन्न आणि समृद्धी प्रदान करावे ही विनंती ॥२ ॥

एवा पाहि प्रत्नथा मन्दतु त्वा श्रुधि ब्रह्म वावृधस्वोत गीर्भिः ।
आविः सूर्यं कृणुहि पीपिहीषो जहि शत्रूँरभि गा इन्द्र तृन्धि ॥३ ॥
हे इंद्रदेवा! आपण पूर्वीप्रमाणेच सोमरसाचे प्राशन करावे. सोमरस आपल्याला आनंदित आणि तृप्त करो. आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांच्या श्रवणाने आपली शक्ती वृद्धिंगत होवो. आपण सूर्यदेवांना प्रकट करावे, आम्हा भक्तगणांच्या शत्रूंचा नाश करावा, आणि शत्रूंनी अडवलेल्या गायींना मुक्त करावे ही विनंती॥३ ॥

ते त्वा मदा बृहदिन्द्र स्वधाव इमे पीता उक्षयन्त द्युमन्तम् ।
महामनूनं तवसं विभूतिं मत्सरासो जर्हृषन्त प्रसाहम् ॥४ ॥
हे स्वतःच्याच सामर्थ्याने बलवान असलेल्या इंद्रदेवा ! आम्ही भक्तगणांनी अर्पण केलेला आणि आपण प्राशन केलेला आनंददायी सोमरस आपल्या तेजस्वी शक्तीला वृद्धिंगत करो. शत्रूंवर विजय मिळवणाऱ्या, महान, दोषरहित, अत्यंत शक्तिशाली आणि सर्वव्यापी अशा हे इंद्रदेवा ! हा सोमरस आपल्याला आनंदित करो. ॥४॥

येभिः सूर्यमुषसं मन्दसानोऽवासयोऽप दृळ्हानि दर्द्रत् ।
महामद्रिं परि गा इन्द्र सन्तं नुत्था अच्युतं सदसस्परि स्वात् ॥५ ॥
हे इंद्रदेवा! आपण ज्या सोमरसाच्या प्राशनाने हर्षित झाला त्या सोमरसाच्या शक्तीने आपण कठीण अडथळ्यांना छिन्नभिन्न

करत सूर्यदेवांना आणि उषादेवतेला त्यांच्या स्थानी स्थापन केले. आपण आपल्या स्थानावरून न हलणाऱ्या आणि गायींना कोंडून ठेवलेल्या पर्वताला त्याच्या मूळ स्थानावरून उखडून फेकून दिलेत आणि गायींना मुक्त केले ॥५ ॥

तव क्रत्वा तव तद्दंसनाभिरामासु पक्वं शच्या नि दीधः ।
और्णोर्दुर उस्रियाभ्यो वि दृळ्होदूर्वाद्गा असृजो अङ्गिरस्वान् ॥६ ॥

हे इंद्रदेवा ! आपण आपल्या महान कर्माने आणि अद्भुत शक्तींनी कालवड (बाल) गायींच्या शरीरात मधुर आणि पोषक दूध प्रस्थापित केले. आपण आङ्गिरस ऋषींच्या सहाय्याने मजबूत अंधाऱ्या गुहेचे दरवाजे गायींसाठी उघडले आणि त्या सर्व गायींना मुक्त केले ॥६ ॥.

पप्राथ क्षां महि दंसो व्युर्वीमुप द्यामृष्वो बृहदिन्द्र स्तभायः ।
अधारयो रोदसी देवपुत्रे प्रत्ने मातरा यह्वी ऋतस्य ॥७ ॥

हे महान आणि पराक्रमी इंद्रदेवा ! आपण आपल्या अद्भुत सामर्थ्याने या विशाल पृथ्वीचा विस्तार केला, महान आकाशलोकाला वरच्या वर स्थिर करून आधार दिला. देवांना जन्म देणाऱ्या, सृष्टीच्या नियमाने चालणाऱ्या आणि अत्यंत प्राचीन अशा माता-पिता स्वरूप आकाशलोक आणि पृथ्वीलोक आपणच पेलून धरले आहे. ॥७ ॥

अध त्वा विश्वे पुर इन्द्र देवा एकं तवसं दधिरे भराय ।
अदेवो यदभ्यौहिष्ट देवान्त्स्वर्षाता वृणत इन्द्रमत्र ॥८ ॥

हे इंद्रदेवा! जेव्हा जेव्हा अधर्मी असुरांनी देवांवर आक्रमण केले, तेव्हातेव्हा त्या संग्रामभूमीवर सर्व देवांनी आपलीच निवड केली. त्या युद्धात सर्व देवतांनी आपल्याला मुख्य रक्षक आणि एकमेव शक्तिशाली सेनापती म्हणून नियुक्त केले ॥८ ॥

अध द्यौश्चित्ते अप सा नु वज्राद्वितानमद्भियसा स्वस्य मन्योः ।
अहिं यदिन्द्रो अभ्योहसानं नि चिद्विश्वायुः शयथे जघान ॥९ ॥

हे जीवन प्रदान करणाऱ्या इंद्रदेवा ! जेव्हा आपण पृथ्वीवर आडवे पडून सर्वांना त्रास देणाऱ्या आणि स्वतःचा विस्तार वाढवणाऱ्या वृत्रासुराला वज्राच्या प्रहाराने कायमचे झोपवून टाकले तेव्हा आपला तो प्रचंड क्रोध आणि आपल्या हातातील भयानक वज्राचा प्रहार पाहून आकाशलोक आणि पृथ्वीलोक भयाने आणि आदरयुक्त बुद्धीने नतमस्तक झाले ॥९ ॥

अध त्वष्टा ते मह उग्र वज्रं सहस्रभृष्टिं ववृतच्छताश्रिम् ।
निकाममरमणसं येन नवन्तमहिं सं पिणगृजीषिन् ॥१० ॥

हे उग्ररूप असणाऱ्या, सोमरस आवडीने प्राशन करणाऱ्या इंद्रदेवा ! देवशिल्पी त्वष्टा देवांनी आपल्यासाठी हजारो अणकुचीदार सुळे आणि शेकडो धारा असलेले प्रचंड वज्र निर्माण करून आपल्याला प्रदान केले. हे ऋजीषिन इंद्रदेवा ! आपण, स्वतःचा विस्तार करणाऱ्या, गर्वाने गर्जना करणाऱ्या वृत्रासुराचा पूर्णपणे नाश केला ॥१० ॥

वर्धान्यं विश्वे मरुतः सजोषाः पचच्छतं महिषाँ इन्द्र तुभ्यम् ।
पूषा विष्णुस्त्रीणि सरांसि धावन्वृत्रहणं मदिरमंशुमस्मै॥११॥
हे इंद्रदेवा! आपल्या आनंदासाठी आणि सामर्थ्यासाठी सर्व मरुद्गणांनी एकत्रच येऊन शंभर महिष (यज्ञीय अन्न) सिद्ध केले. आपल्यासाठी पूषन् देव आणि विष्णुदेव वृत्रासुराचा नाश करण्यासाठी, आपला उत्साह वाढवण्यासाठी सोमरस सिद्ध करून तीन सरोवरा एवढ्या मोठ्या पात्रांमध्ये भरत आहेत॥११॥

आ क्षोदो महि वृतं नदीनां परिष्ठितमसृज ऊर्मिमपाम् ।
तासामनु प्रवत इन्द्र पन्थां प्रार्दयो नीचीरपसः समुद्रम् ॥१२॥
हे इंद्रदेवा ! वृत्रासुराने चहूबाजूंनी अडवून धरलेले नद्यांचे अथांग पाणी आणि पाण्याचे प्रचंड वेगवान प्रवाह आपण आपल्या पराक्रमाने पूर्णपणे मुक्त केले. आपण नद्यांना प्रवाहाच्या उताराच्या दिशेने मार्ग दाखवून दिला आणि सतत गतिमान असणाऱ्या त्या नद्यांच्या पाण्याला खालच्या दिशेने थेट समुद्राकडे वाहण्यासाठी प्रेरित केले. ॥१२ ॥

एवा ता विश्वा चकृवांसमिन्द्रं महामुग्रमजुर्यं सहोदाम् ।
सुवीरं त्वा स्वायुधं सुवज्रमा ब्रह्म नव्यमवसे ववृत्यात् ॥१३ ॥
निश्चितपणे ही सर्व महान कार्ये करणाऱ्या, अत्यंत शक्तिशाली, कधीही वृद्ध न होणाऱ्या , बल देणाऱ्या, उत्तम वीरांनी युक्त असलेल्या, श्रेष्ठ शस्त्रांनी आणि उत्कृष्ट वज्राने सज्ज असलेल्या त्या महान इंद्रदेवांना, आम्ही भक्तगणांनी रचलेली ही नवीन स्तोत्रे रक्षणासाठी, आमच्याकडे घेऊन येवोत ॥१३ ॥

स नो वाजाय श्रवस इषे च राये धेहि द्युमत इन्द्र विप्रान् ।
भरद्वाजे नृवत इन्द्र सूरीन्दिवि च स्मैधि पार्ये न इन्द्र ॥१४ ॥
हे इंद्रदेवा ! आम्हाला आणि भरद्वाज कुळातील वंशजांना अन्न, कीर्ती, दैदीप्यमान ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आम्हा भक्तगणांच्या शूर आणि पराक्रमी पुत्रांची वृद्धी करावी ही विनंती. आमच्या अंतिम संकटाच्या प्रसंगी आपण नेहमी आमचे सहाय्य करण्यासाठी उपस्थित राहावे ही विनंती. ॥१४॥

अया वाजं देवहितं सनेम मदेम शतहिमाः सुवीराः ॥१५ ॥
हे इंद्रदेवा! आपल्या कृपेने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम अन्न आणि शक्ती लाभो. आम्ही आमच्या पराक्रमी व सद्गुणी संततीसह समाधानाने शंभर वर्षे आनंदाने जगू शकू. ॥१५ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१८

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप् १५ द्विपदा त्रिष्टुप्

तमु ष्टुहि यो अभिभूत्योजा वन्वन्नवातः पुरुहूत इन्द्रः ।
अषाळ्हमुग्रं सहमानमाभिर्गीर्भिर्वर्ध वृषभं चर्षणीनाम् ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! शत्रूंचा पराभव करणाऱ्या, अजिंक्य, अनेक भक्तगणांकडून बोलावले जाणाऱ्या इंद्रदेवांची आपण स्तुती करावी. तुम्ही स्तुतियुक्त स्तोत्राच्या पठणाने मानवांमध्ये श्रेष्ठ, अजिंक्य, संकटावर विजय मिळवणाऱ्या इंद्रदेवांचे बळ वाढवावे॥१॥

स युध्मः सत्वा खजकृत्समद्वा तुविम्रक्षो नदनुमाँ ऋजीषी ।
बृहद्रेणुश्च्यवनो मानुषीणामेकः कृष्टीनामभवत्सहावा ॥२॥
हे इंद्रदेवा! आपण युद्ध कुशल, सत्यनिष्ठ योद्ध्यांचे रक्षण करणारे, शत्रूंमध्ये भीतीने खळबळ उडवून देणारे, युद्धाचा आनंद घेणारे, शत्रूंचे मर्दन करणारे, सोमरस प्राशन करणारे, रथाच्या वेगाने धुळीचे प्रचंड लोट उडवणारे, शत्रूंना पराभूत करून त्यांच्यामध्ये थरकाप उडवणारे आहात. संपूर्ण मानवजातीचे रक्षण करणारे इंद्रदेव एकमेव शक्तिशाली विजेता ठरले आहेत॥२॥

त्वं ह नु त्यददमायो दस्यूँरेकः कृष्टीरवनोरार्याय ।
अस्ति स्विन्नु वीर्यं तत्त इन्द्र न स्विदस्ति तदृतुथा वि वोचः॥३॥

हे इंद्रदेवा! आपण एकट्यानेच यज्ञ न करणाऱ्या कपटी दस्यूंचा नाश करून, सर्व प्रजेला, प्रगतीशील विचारसरणीच्या भक्तगणांना, अनुकूल करुन त्यांचे रक्षण केले. हे इंद्रदेवा! आपले प्रसिद्ध शौर्य आणि पराक्रम आजही अस्तित्वात आहे ना? ते आपण आम्हाला योग्य वेळी आपल्या पराक्रमात द्वारे स्पष्ट करून दाखवावे ही विनंती ॥३ ॥

सदिद्धि ते तुविजातस्य मन्ये सहः सहिष्ठ तुरतस्तुरस्य ।
उग्रमुग्रस्य तवसस्तवीयोऽरध्रस्य रध्रतुरो बभूव ॥४ ॥
हे अनेक रूपात प्रगट होणाऱ्या इंद्रदेवा! आपले सामर्थ्य सर्वात श्रेष्ठ आहे, आपण अत्यंत वेगवान आणि पराक्रमी आहात असे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण मानतो. बलवानांपेक्षाही अधिक बलवान, प्रचंड शक्तिशाली आणि कधीही न थकवणाऱ्या अशा शत्रूंचा त्वरित नाश करता ॥४ ॥

तन्नः प्रत्नं सख्यमस्तु युष्मे इत्था वदद्भिर्वलमङ्गिरोभिः ।
हन्नच्युतच्युद्दस्मेषयन्तमृणोः पुरो वि दुरो अस्य विश्वाः ॥५ ॥
हे अद्भुत कर्म करणाऱ्या इंद्रदेवा! आङ्गिरस ऋषींनी केलेल्या मंत्रोच्चारांच्या व स्तुतीच्या बळावर, आपण 'वल' नावाच्या असुराचा वध केला. कधीही न हलणाऱ्या पर्वतांनाही हलवणाऱ्या आणि अद्भुत कर्मे करणाऱ्या हे इंद्रदेवा ! 'वल असुराच्या सर्व किल्ल्यांचे दरवाजे पूर्णपणे उघडले अशा पराक्रमी आपल्याशी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची ती जुनी, सनातन मैत्री कायम राहो ॥५ ॥

स हि धीभिर्हव्यो अस्त्युग्र ईशानकृन्महति वृत्रतूर्ये ।
स तोकसाता तनये स वज्री वितन्तसाय्यो अभवत्समत्सु ॥६॥

हे प्रचंड पराक्रमी, सृष्टीवर शासन करणाऱ्या इंद्रदेवा ! आपण वृत्रासुरासोबतच्या या महान युद्धात विजय मिळवणारे, आपल्या पवित्र विचारांनी आणि प्रार्थनांनी पूजनीय आहात. हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपण उत्तम संततीच्या प्राप्तीसाठी तसेच युद्धामध्ये शत्रूंचे पूर्णपणे दमन करण्यासाठी भक्तगणांच्या पाठीशी उभे राहता ॥६ ॥

स मज्मना जनिम मानुषाणाममर्त्येन नाम्नाति प्र सर्स्रे ।
स द्युम्नेन स शवसोत राया स वीर्येण नृतमः समोकाः ॥७ ॥

हे इंद्रदेवा ! आपण आपल्या अथांग सामर्थ्याने, आपल्या कधी नष्ट न होणाऱ्या अमृत दिव्य स्वरूपाने सर्व मानवांच्या मर्यादेपेक्षा अत्यंत श्रेष्ठ ठरता. आपण स्वतःच्या तेजस्वी वैभवाने, अथांग शक्तीने अफाट धनाने अजोड पराक्रमाने परिपूर्ण असून आपण एकमेव सर्वांना आश्रय देणारे आहात. ॥७ ॥

स यो न मुहे न मिथू जनो भूत्सुमन्तुनामा चुमुरिं धुनिं च ।
वृणक्पिप्रुं शम्बरं शुष्णमिन्द्रः पुरां च्यौत्नाय शयथाय नू चित् ॥८ ॥

हे इंद्रदेवा ! आपण कधीही मोहात पडत नाही , कोणाशी कपट किंवा विश्वासघात करत नाही. भक्तगणांना उत्तम ज्ञान देणारे आहात. आपण आपल्या अफाट सामर्थ्याने चुमुरी, धुनी, पिप्रू, शंबर आणि शुष्ण या दुष्ट राक्षसांना चिरडून टाकले; आणि त्यांचे

किल्ले कायमचे उद्ध्वस्त करून त्यांना जमिनीवर लोळवले ॥८ ॥

उदावता त्वक्षसा पन्यसा च वृत्रहत्याय रथमिन्द्र तिष्ठ ।
धिष्व वज्रं हस्त आ दक्षिणत्राभि प्र मन्द पुरुदत्र मायाः ॥९ ॥
हे अत्यंत दानशूर इंद्रदेवा ! आपण आपल्या शत्रूंचे दमन करणाऱ्या प्रचंड प्रशंसनीय पराक्रमाने आपल्या वेगवान रथावर वृत्रासुराचा वध करण्यासाठी आरुढ व्हावे ही विनंती. आपण आपल्या उजव्या हातात शत्रूचा थरकाप उडवणारे वज्र धारण करून दुष्ट शत्रूंच्या सर्व कपटी व मायावी शक्तींचा पूर्णपणे नाश करावा ही विनंती॥९ ॥

अग्निर्न शुष्कं वनमिन्द्र हेती रक्षो नि धक्ष्यशनिर्न भीमा ।
गम्भीरय ऋष्वया यो रुरोजाध्वानयद्दुरिता दम्भयच्च ॥१० ॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे प्रदीप्त अग्निदेव वाळलेल्या जंगलाला क्षणात जाळून भस्मसात करतात त्याचप्रमाणे आपण आपल्या अत्यंत शक्तिशाली आणि भयानक वज्राने दुष्ट राक्षसांना पूर्णपणे जाळून टाकता. आपण आकाशातून पडणाऱ्या भीतीदायक विजेप्रमाणे आपल्या गंभीर आणि महान शक्तीने शत्रूंचे किल्ले उद्ध्वस्त करता, त्यांना भयभीत करता, त्यांची सर्व प्रकारची संकटे आणि पाप करणे नष्ट करता. ॥१० ॥

आ सहस्रं पथिभिरिन्द्र राया तुविद्युम्न तुविवाजेभिरर्वाक् ।
याहि सूनो सहसो यस्य नू चिददेव ईशे पुरुहूत योतोः॥११॥

हे अथांग कीर्ती असलेल्या आणि भरपूर अन्न देणाऱ्या इंद्रदेवा ! आपण सहस्र मार्गांनी अफाट धन आणि समृद्धी घेऊन आम्हा भक्तगणांकडे यावे ही विनंती. हे बलपुत्रा, इंद्रदेवा ! आपल्या सामर्थ्याला कोणताही अधर्मी शत्रू कधीही आणि कोणत्याही प्रकारे रोखू शकत नाही आपण आमच्या यज्ञात रक्षणार्थ यावे ही विनंती ॥११ ॥

प्र तुविद्युम्नस्य स्थविरस्य घृष्वेर्दिवो ररप्शे महिमा पृथिव्याः । नास्य शत्रुर्न प्रतिमानमस्ति न प्रतिष्ठिः पुरुमायस्य सह्योः॥१२॥

अत्यंत तेजस्वी, शाश्वत, शत्रूंना चिरडणाऱ्या, अद्भुत शक्ती असणाऱ्या हे इंद्रदेवा ! आपला महान महिमा स्वर्ग आणि पृथ्वीवर सर्वत्र पसरला आहे. या संपूर्ण विश्वात आपला कोणीही शत्रू नाही, आपले सामर्थ्य रोखू शकेल असा कोणीही अस्तित्वात नाही ॥१२ ॥

प्र तत्ते अद्या करणं कृतं भूत्कुत्सं यदायुमतिथिग्वमस्मै । पुरू सहस्रा नि शिशा अभि क्षामुत्तूर्वयाणं धृषता निनेथ ॥१३ ॥

हे इंद्रदेवा ! जेव्हा आपण राजा तूर्वयाणसाठी कुत्स, आयु आणि अतिथित्व (दिवोदास) यांसारख्या हजारो बलाढ्य योद्ध्यांच्या शक्तीचे समरांगणात दमन केले आणि आपल्या अथांग धैर्याने, पराक्रमाने राजा तूर्वयाणला त्या संकटातून यशस्वीपणे बाहेर काढून विजयाकडे नेले तेव्हा आपला महान आणि विख्यात पराक्रम सर्वत्र प्रकट झाला ॥१३ ॥.

अनु त्वाहिघ्ने अध देव देवा मदन्विश्वे कवितमं कवीनाम् ।
करो यत्र वरिवो बाधिताय दिवे जनाय तन्वे गृणानः ॥१४॥
हे इंद्रदेवा ! आपण वृत्रासुराचा नाश करून संकटात सापडलेल्या भक्तांसाठी, दिव्य लोकांसाठी आणि स्वतःसाठी सुख-स्वातंत्र्य निर्माण केले. ज्ञानी लोकांमध्ये सर्वश्रेष्ठ असलेल्या हे इंद्रदेवा ! आपल्या या विजयाने सर्व देव हर्षित झाले आणि त्यांनी आपला गौरव केला ॥१४ ॥

अनु द्यावापृथिवी तत्त ओजोऽमर्त्या जिहत इन्द्र देवाः ।
कृष्वा कृत्नो अकृतं यत्ते अस्त्युक्थं नवीयो जनयस्व यज्ञैः ॥१५ ॥
हे इंद्रदेवा ! आकाशलोक, पृथ्वीलोक कधीही नष्ट न होणारे सर्व अमर देव आपल्या अथांग आणि विराट शक्ती पुढे नतमस्तक होतात. हे अनंत कर्म करणाऱ्या इंद्रदेवा ! आपले जे कार्य अजूनही अपूर्ण आहे किंवा आपण आधी कधी केले नाही ते आपण पूर्ण करावे ही विनंती आपण आमच्या या यज्ञाच्या माध्यमातून नवीन आणि श्रेष्ठ स्तुति युक्त स्तोत्रांची निर्मिती करावी ही विनंती ॥१५ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-१९

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

महाँ इन्द्रो नृवदा चर्षणिप्रा उत द्विबर्हा अमिनः सहोभिः ।
अस्मद्र्यग्वावृधे वीर्यायोरुः पृथुः सुकृतः कर्तृभिर्भूत् ॥१॥
हे इंद्रदेवा ! आपण महान आहात. आपण आपल्या भक्तगणांना वीर पुरुषांप्रमाणे ऐश्वर्य देणारे(नृवद)आणि इच्छा पूर्ण करणारे आहात. आपण आपल्या अमर्याद शक्तीने पृथ्वीलोक आणि स्वर्गलोक व्यापून टाकला आहे. हे विशाल, सर्वत्र प्रख्यात आणि उत्तम कर्म करणाऱ्या इंद्रदेवा ! आम्ही भक्तगण करत असलेल्या प्रार्थनेमुळे आमचा पराक्रम आणि समृद्धी वृद्धिंगत करावी ही विनंती ॥१॥

इन्द्रमेव धिषणा सातये धाद्बृहन्तमृष्वमजरं युवानम् ।
अषाळ्हेन शवसा शूशुवांसं सद्यश्चिद्यो वावृधे असामि ॥२॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तुती केवळ महान, श्रेष्ठ, अजरामर आणि नित्य तरुण अशा आपल्यासाठीच असते. आपण कधीही जिंकता न येणाऱ्या अथांग बलाने समृद्ध आहात. आपण स्तुती श्रवण करताच आपले सामर्थ्य तत्काळ पूर्णपणे व अमर्यादपणे वाढते ॥२॥

पृथू करस्ना बहुला गभस्ती अस्मद्र्यक्सं मिमीहि श्रवांसि ।
यूथेव पश्वः पशुपा दमूना अस्माँ इन्द्राभ्या ववृत्स्वाजौ ॥३ ॥

हे इंद्रदेवा ! आपण अफाट कर्मे करणाऱ्या आपल्या दोन्ही विशाल बाहूंना आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे वळवावे आणि आम्हाला भरपूर अन्न, धन अन् यश प्रदान करावे ही विनंती. ज्याप्रमाणे एखादा कुशल गुराखी आपल्या गायींच्या कळपाचे सर्व बाजूंनी काळजीपूर्वक रक्षण करतो, त्याचप्रमाणे आपण आमच्या जीवनाच्या संघर्षात पाठीशी उभा राहावे आणि आमचे रक्षण करावे ही विनंती. ॥३ ॥

तं व इन्द्रं चतिनमस्य शाकैरिह नूनं वाजयन्तो हुवेम ।
यथा चित्पूर्वे जरितार आसुरनेद्या अनवद्या अरिष्टाः ॥४॥
हे सामर्थ्याने शत्रूंना पळवून लावणाऱ्या इंद्रदेवा ! समृद्धी आणि विजय मिळवण्याची इच्छा ठेवणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, आपल्याला आदरपूर्वक बोलावत आहोत. ज्याप्रमाणे पूर्वीचे स्तुती करणारे ऋषीगण कोणत्याही निंदेविना, सर्व संकटांपासून सुरक्षित राहिले, तसेच सुख आम्हांलाही प्राप्त व्हावे ही विनंती ॥४ ॥

धृतव्रतो धनदाः सोमवृद्धः स हि वामस्य वसुनः पुरुक्षुः ।
सं जग्मिरे पथ्या रायो अस्मिन्त्समुद्रे न सिन्धवो यादमानाः ॥५॥
हे इंद्रदेवा ! आपण नियमांचे पालन करणारे, भक्तांना धन देणारे आणि सोमरसाचे प्राशन करून बलवान होणारे आहात. ज्याप्रमाणे नद्या एकमेकांशी स्पर्धा करत शेवटी महासागरात जाऊन मिळतात, त्याप्रमाणे ऐश्वर्य आणि समृद्धी देणारे सर्व मार्ग आपल्याकडेच येतात. ॥५ ॥

शविष्ठं न आ भर शूर शव ओजिष्ठमोजो अभिभूत उग्रम् ।
विश्वा द्युम्ना वृष्ण्या मानुषाणामस्मभ्यं दा हरिवो मादयध्यै ॥६॥

हे अत्यंत शूर, उग्र आणि शत्रूंना पराभूत करणाऱ्या इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना शक्तिशाली बळ आणि तेज प्रदान करावे ही विनंती. हे अश्व जोडलेल्या रथावर स्वार होणाऱ्या इंद्रदेवा ! आपण आम्हाला सर्व प्रकारचे यश आणि पराक्रम प्राप्त करून द्यावे ही विनंती जेणेकरून आम्ही जीवनात नेहमी आनंदी आणि तृप्त राहू शकू ॥६ ॥

यस्ते मदः पृतनाषाळमृध्र इन्द्र तं न आ भर शूशुवांसम् ।
येन तोकस्य तनयस्य सातौ मंसीमहि जिगीवांसस्त्वोताः ॥७॥

हे इंद्रदेवा ! शत्रूच्या सैन्याला पराभूत करणारा, कधीही नष्ट न होणारा आपला वाढलेला उत्साह आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करावा ही विनंती. आपल्या या उत्साहाच्या बळावर आम्ही भक्तगण आपल्या कृपेने आमच्या पुत्र-पौत्रांच्या रक्षण करण्याच्या युद्धात विजयी बनू आणि त्यात आम्ही स्वतःला धन्य मानू ॥७ ॥

आ नो भर वृषणं शुष्ममिन्द्र धनस्पृतं शूशुवांसं सुदक्षम् ।
येन वंसाम पृतनासु शत्रून्तवोतिभिरुत जार्मीँरजामीन् ॥८॥

हे इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी इच्छांची पूर्तता करणारे (वर्षक), शत्रूंना कंपित करणारे, संपत्ती मिळवून देणारे, वृद्धिंगत होणारे कुशल सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती. या सामर्थ्याच्या आणि आपल्या कृपेच्या बळावर आम्ही युद्धांमध्ये

आमच्या स्वकीय आणि परकीय अशा सर्व शत्रूंवर विजय मिळवू शकू. ॥८ ॥

आ ते शुष्मो वृषभ एतु पश्चादोत्तरादधरादा पुरस्तात् ।
आ विश्वतो अभि समेत्यर्वाङिन्द्र द्युम्नं स्वर्वद्धेह्यस्मे ॥९ ॥
हे वृषभा सारख्या सामर्थ्यवान इंद्रदेवा ! आपले शत्रूंचा थरकाप उडवणारे सामर्थ्य आमच्या पाठीमागून (पश्चिम), वरून (उत्तर), खालून (दक्षिण) आणि समोरून (पूर्व) आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे येवो ही विनंती. आपण आम्हाला स्वर्गीय सुखाने युक्त असे दैदीप्यमान ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥९ ॥

नृवत्त इन्द्र नृतमाभिरूती वंसीमहि वामं श्रोमतेभिः ।
ईक्षे हि वस्व उभयस्य राजन्धा रत्नं महि स्थूरं बृहन्तम् ॥१० ॥
हे इंद्रदेवा ! आपण दिलेल्या अत्यंत श्रेष्ठ अशा रक्षणाच्या सहाय्याने, आम्ही वीर पुरुषांनी वेढलेले, सुंदर, इच्छित आणि कीर्ती वाढवणारे ऐश्वर्य प्राप्त करू शकू . हे राजन्! आपण पार्थिव (भौतिक) आणि दिव्य (आध्यात्मिक) या दोन्ही प्रकारच्या धनांचे स्वामी आहात. आपण आम्हांला महान, निरंतर टिकणारे, स्थिर आणि गुणांनी परिपूर्ण असलेले अफाट ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥१० ॥

मरुत्वन्तं वृषभं वावृधानमकवारिं दिव्यं शासमिन्द्रम् ।
विश्वासाहमवसे नूतनायोग्रं सहोदामिह तं हुवेम ॥११ ॥
हे इंद्रदेवा ! मरुद्गणांनी वेढलेल्या भक्तांवर कृपावर्षाव करणाऱ्या, निरंतर वृद्धिंगत होणाऱ्या, शत्रूंकडून कधीही निंदा न केल्या

जाणाऱ्या, दिव्य आणि संपूर्ण जगावर शासन करणाऱ्या आपली आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, स्तुती करतो. सर्वांना पराभूत करणाऱ्या, उग्र आणि सामर्थ्य देणाऱ्या हे इंद्रदेवा ! आम्ही आमच्या रक्षणासाठी आणि नवीन सुखाच्या प्राप्तीसाठी आपले आवाहन करत आहोत ॥११ ॥

जनं वज्रिन्महि चिन्मन्यमानमेभ्यो नृभ्यो रन्धया येष्वस्मि ।
अधा हि त्वा पृथिव्यां शूरसातौ हवामहे तनये गोष्वप्सु ॥१२॥
हे इंद्रदेवा ! जे शत्रू स्वतःला खूप मोठे आणि बलाढ्य समजून गर्वाने वागत आहेत त्यांना आपल्या आश्रयाखाली असलेल्या योद्ध्यांच्या स्वाधीन करून त्यांचा पराभव करावा ही विनंती. या पृथ्वीवर जेव्हा वीरांमध्ये युद्ध होते, तेव्हा संततीच्या रक्षणासाठी, तसेच गायी आणि पाण्याच्या प्राप्तीसाठी आम्ही भक्तगण रक्षणासाठी आदरपूर्वक आपलेच आवाहन करतो. ॥१२ ॥

वयं त एभिः पुरुहूत सख्यैः शत्रोःशत्रोरुत्तर इत्स्याम ।
घ्नन्तो वृत्राण्युभयानि शूर राया मदेम बृहता त्वोताः ॥१३ ॥
हे अनेक भक्तांद्वारे आदरपूर्वक बोलावल्या जाणाऱ्या पुरुहूत इंद्रदेवा ! आपल्याशी असलेल्या या पवित्र मैत्रीच्या बळावर आम्ही यज्ञकर्ते भक्तगण प्रत्येक शत्रूंवर निश्चितपणे विजय मिळवू शकू. आपल्या द्वारे रक्षण केलेले आम्ही अंतर्गत (मानसिक विकार) आणि बाह्य (भौतिक संकटे) अशा दोन्ही प्रकारच्या संकटांचा नाश करत आपल्याकडून मिळालेल्या अथांग धनाचा उपभोग घेऊन नेहमी आनंदी आणि तृप्त राहू ॥१३ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२०

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप् :७ विराट्

द्यौर्न य इन्द्राभि भूमार्यस्तस्थौ रयिः शवसा पृत्सु जनान् ।
तं नः सहस्रभरमुर्वरासां दद्धि सूनो सहसो वृत्रतुरम् ॥१॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे विशाल आकाश संपूर्ण पृथ्वीला व्यापून स्थिर राहिले आहे, त्याप्रमाणे आपण आपल्या शक्तीने युद्धांमध्ये शत्रूंवर विजय मिळवून श्रेष्ठ स्थानावर स्थिर आहात. हे बलपुत्रा ! वृत्रासुराचे दमन करणारे आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना हजारो प्रकारची संपत्ती, अत्यंत सुपीक आणि समृद्ध शेतजमीन प्रदान करावी ही विनंती ॥१॥

दिवो न तुभ्यमन्विन्द्र सत्रासुर्यं देवेभिर्धायि विश्वम् ।
अहिं यद्वृत्रमपो वव्रिवांसं हन्नृजीषिन्विष्णुना सचानः ॥२॥
हे सोमरस प्राशन करणाऱ्या ऋजीषिन् इंद्रदेवा ! जेव्हा विष्णुदेवांच्या सहाय्याने पाण्याचे अथांग प्रवाह अडवून धरणाऱ्या वृत्रासुराचा आपण वध केला तेव्हा सर्व देवतांनी आकाश लोकांपेक्षाही श्रेष्ठ असलेले आपले सामर्थ्य एकमताने मान्य केले ॥२ ॥

तूर्वन्नोजीयान्तवसस्तवीयान्कृतब्रह्मेन्द्रो वृद्धमहाः ।
राजाभवन्मधुनः सोम्यस्य विश्वासां यत्पुरां दर्त्नुमावत् ॥३॥
हे इंद्रदेवा ! आपण शत्रूंचा वेगाने पराभव करणारे, सर्व ओजस्वी शक्तींमध्ये अत्यंत ओजस्वी आहात. भक्तगणांनी रचलेल्या

स्तुतियुक्त स्तोत्रांमुळे आपला महिमा अधिक वाढत आहे. आपण जेव्हा शत्रूंच्या किल्ल्यांचा नाश केला तेव्हा भक्तगणांनी आपल्याला मधुर सोमरसाने तृप्त केले आणि आपण त्या भक्तगणांचे रक्षण केले ॥३॥

शतैरपद्रन्पणय इन्द्रात्र दशोणये कवयेऽर्कसातौ ।
वधैः शुष्णस्याशुषस्य मायाः पित्वो नारिरेचीत्किं चन प्र ॥४॥
हे इंद्रदेवा ! यज्ञाच्या रक्षणासाठी केलेल्या युद्धामध्ये आपल्या शेकडो शस्त्रास्त्रांना पाहून लुबाडणारे शत्रू, पणी, पळून गेले. आपण 'दशौणि'ऋषींच्या आणि कुत्सऋषींच्या रक्षणासाठी सर्वांना गिळंकृत करणाऱ्या मायावी 'शुष्ण' राक्षसाच्या सर्व कपटी युक्त्यांचा आपल्या शस्त्रांच्या प्रहारांनी पूर्णपणे नाश केला. त्याने चोरलेल्या सोमरसाचा एक छोटासा अंशही आपण त्याच्याकडे शिल्लक राहू दिला नाही ॥४ ॥

महो द्रुहो अप विश्वायु धायि वज्रस्य यत्पतने पादि शुष्णः ।
उरु ष सरथं सारथये करिन्द्रः कुत्साय सूर्यस्य सातौ ॥५ ॥
हे इंद्रदेवा ! जेव्हा आपल्या वज्राच्या प्रहारामुळे छळणारा 'शुष्ण' राक्षस मृत्युमुखी पडला तेव्हा महान द्रोही असुराची संपूर्ण जगाला ग्रासणारी शक्ती पूर्णपणे नष्ट झाली. त्यानंतर आपण कुत्सऋषींच्या रथावर आरूढ होऊन स्वतः सारथ्य करून सूर्यदेवांसाठी विस्तीर्ण आणि सुरक्षित मार्ग तयार करून दिला॥५॥

प्र श्येनो न मदिरमंशुमस्मै शिरो दासस्य नमुचेर्मथायन् ।
प्रावन्नमीं साप्यं ससन्तं पृणग्राया समिषा सं स्वस्ति ॥६॥

हे इंद्रदेवा ! श्येनपक्ष्याप्रमाणे आपण स्वर्ग लोकातून आनंद देणारा सोमरस घेऊन आलात. आपण प्रजेला छळणाऱ्या 'नमुची' नावाच्या दुष्ट राक्षसाचे मस्तक चिरडून टाकले. आपण आपला मित्र असलेल्या, गाढ निद्रेत असलेल्या 'नमी ' ऋषींचे रक्षण केले आणि त्यांना अन्न, ऐश्वर्याने तृप्त करून त्यांचे कल्याण केले॥६॥

वि पिप्रोरहिमायस्य दृळ्हाः पुरो वज्रिञ्छवसा न दर्दः ।
सुदामन्तद्रेक्णो अप्रमृष्यमृजिश्वने दात्रं दाशुषे दाः ॥७ ॥
हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपण आपल्या अथांग सामर्थ्याने कपटी मायावी 'पिप्रू' राक्षसाचे अत्यंत मजबूत आणि दृढ किल्ले पूर्णपणे तोडून उद्ध्वस्त केले. हे उत्तम दान देणाऱ्या इंद्रदेवा ! आपण यज्ञामध्ये हविष्यान्नाची आहुती अर्पण करणाऱ्या ऋजिश्व नवाच्या प्रामाणिक भक्ताला सुरक्षित आणि शाश्वत धन प्रदान केले.॥७॥

स वेतसुं दशमायं दशोणिं तूतुजिमिन्द्रः स्वभिष्टिसुम्नः ।
आ तुग्रं शश्वदिभं द्योतनाय मातुर्न सीमुप सृजा इयध्यै ॥८ ॥
हे उत्तम आणि कल्याणकारी ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या इंद्रदेवा ! आपण दहा प्रकारच्या माया जाणणाऱ्या दशमाय, बलाढ्य दशोणि आणि पीडा देणाऱ्याला तूतुजी या अत्यंत बलाढ्य शत्रूंचा पराभव करून द्योतन राजाच्या स्वाधीन केले . ज्याप्रमाणे माता आपल्या बालकाला सर्व बाजूंनी प्रेमाने जवळ घेते त्याप्रमाणे आमच्या यशासाठी तुग्रअसुराचे हत्तीसारखे बलवान सैन्य आमच्या स्वाधीन करावे ही विनंती जेणेकरून आम्ही भक्तगण प्रगती करू शकू॥८॥
स ईं स्पृधो वनते अप्रतीतो बिभ्रद्वज्रं वृत्रहणं गभस्तौ ।

तिष्ठद्धरी अध्यस्तेव गर्ते वचोयुजा वहत इन्द्रमृष्वम् ॥९ ॥
हे इंद्रदेवा ! आपण आपल्या हातामध्ये वृत्रासुराचा संहार करणारे वज्र धारण केले आहे. आपण अजिंक्य आणि आपल्या सर्व शत्रूंना पराभूत करता. रथावर आरुढ, कुशल धनुर्धरासारखे आसनस्थ, महान हे इंद्रदेवा ! आपल्या केवळ वाणीने आपल्या रथाला जोडलेले हरी नावाचे वेगवान अश्व आपल्याला वाहून नेतात.॥९ ॥

सनेम तेऽवसा नव्य इन्द्र प्र पूरवः स्तवन्त एना यज्ञैः ।
सप्त यत्पुरः शर्म शारदीर्दर्द्धन्दासीः पुरुकुत्साय शिक्षन् ॥१०॥
हे इंद्रदेवा ! आपण दिलेल्या नवनवीन आणि सर्वोत्तम रक्षणाच्या (आश्रयाच्या) सहाय्याने आम्ही भक्तगण नेहमी समृद्धी प्राप्त करू . पुरू वंशातील लोक या यज्ञांद्वारे आणि स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपली स्तुती करतात जेव्हा आपण आपला राजाभक्त 'पुरुकुत्स' याला बल आणि विजय प्रदान करत होता तेव्हा आपण त्याच्या शत्रूंच्या, दस्युंच्या शरद ऋतूतील अत्यंत मजबूत अभेद्य किल्ल्यांना आपल्या प्रहाराने तोडून उद्ध्वस्त केले ॥१० ॥

त्वं वृध इन्द्र पूर्व्यो भूर्वरिवस्यन्नुशने काव्याय ।
परा नववास्त्वमनुदेयं महे पित्रे ददाथ स्वं नपातम् ॥११ ॥
हे इंद्रदेवा ! आपण कवीचे पुत्र असलेल्या उशना ऋषींच्या कल्याणासाठी, समृद्धीसाठी पुरातन काळापासून मोठे हितकर्ते आहा. आपण नववास्तू नावाच्या बलाढ्य शत्रूचा पराभव करून, त्याला दूर हुसकावून लावले आणि त्याच्या ताब्यातून ऋषींच्या

वंशजाला मुक्त करून वंशजाला त्याच्या महान पित्याकडे सुरक्षित परत सोपवून दिले ॥११ ॥

त्वं धुनिरिन्द्र धुनिमतीऋृणोरपः सीरा न स्रवन्तीः ।
प्र यत्समुद्रमति शूर पर्षि पारया तुर्वशं यदुं स्वस्ति ॥१२ ॥
हे इंद्रदेवा ! आपण शत्रूंचा संहार करत, खळाळत वाहणाऱ्या नद्यांमध्ये अडकून पडलेल्या जलाला मुक्त करून प्रवाहित केले. हे पराक्रमी इंद्रदेवा! ज्याप्रमाणे आपण तुर्वश आणि यदु यांना समुद्राच्या पलीकडे सुरक्षितपणे पार उतरवले, त्या प्रमाणे आम्हा भक्तगणांना जीवनातील संकटांतून सुरक्षित पार करावे ही विनंती ॥१२ ॥

तव ह त्यदिन्द्र विश्वमाजौ सस्तो धुनीचुमुरी या ह सिष्वप् ।
दीदयदित्तुभ्यं सोमेभिः सुन्वन्दभीतिरिध्मभृतिः पक्थ्यर्कैः ॥१३ ॥
हे इंद्रदेवा ! युद्धातील आपले कार्य प्रसिद्ध आहे. यज्ञासाठी समिधा आणणाऱ्या, सोमरस सिद्ध करणाऱ्या, आपला भक्त असणाऱ्या दभीतिनी आपल्याला शिजवलेल्या हविष्यान्नाची आहुती देण्यासाठी प्रदीप्त केले तेव्हा भक्ताच्या रक्षणासाठी आपण धुनी आणि चुमुरी असुरांना निद्रिस्त असतानाच कायमचे झोपवून टाकले ॥१३ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२१

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र ९,११ विश्वेदेव

छन्द त्रिष्टुप्

इमा उ त्वा पुरुतमस्य कारोर्हव्यं वीर हव्या हवन्ते ।
धियो रथेष्ठामजरं नवीयो रयिर्विभूतिरीयते वचस्या ॥१॥

हे रथावर आरूढ असणाऱ्या कधीही वृद्ध न होणाऱ्या पराक्रमी शूर इंद्रदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या भक्तांच्या बुद्धीने रचलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी आणि हविष्यान्नाची आहुती अर्पण करून आम्ही भक्तगण आपले आवाहन करत आहोत. या आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांना आपण व्यापक ऐश्वर्य आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती ॥१॥

तमु स्तुष इन्द्रं यो विदानो गिर्वाहसं गीर्भिर्यज्ञवृद्धम् ।
यस्य दिवमति मह्ना पृथिव्याः पुरुमायस्य रिरिचे महित्वम् ॥२॥

आम्ही भक्तगण त्या प्रसिद्ध इंद्रदेवांची स्तुतियुक्त स्तोत्रांनी स्तुती करतो, जे इंद्रदेव अत्यंत ज्ञानी, ज्यांना स्तुतियुक्त स्तोत्रे अत्यंत प्रिय आहेत आणि जे यज्ञातील हविष्यान्नाच्या आहुतीने बलवान होतात. अफाट शक्ती असलेले इंद्रदेवांचे मोठेपण व सामर्थ्य आकाशलोकांच्या आणि विशाल पृथ्वीच्या वैभवापेक्षाही त्यांच्या स्वतःच्या मेहनतीमुळे अत्यंत श्रेष्ठ ठरले आहे ॥२ ॥.

स इत्तमोऽवयुनं ततन्वत्सूर्येण वयुनवच्चकार ।
कदा ते मर्ता अमृतस्य धामेयक्षन्तो न मिनन्ति स्वधावः ॥३ ॥
त्या इंद्रदेवांनी चहूबाजूनी पसरलेला अज्ञानाचा घोर अंधकार सूर्यदेवांच्या प्रकाशाने ज्ञानमय आणि मार्ग दाखवणारा केला. हे स्वतःच्या सामर्थ्याने युक्त असलेल्या इंद्रदेवा ! अमरत्वाच्या शाश्वत निवासस्थानाची इच्छा करणारे मर्त्य मानव, भक्तगण, आपल्या नियमांचे कधीही उल्लंघन करत नाहीत किंवा त्या नियमांना बदलू शकत नाहीत॥३ ॥

यस्ता चकार स कुह स्विदिन्द्रः कमा जनं चरति कासु विक्षु ।
कस्ते यज्ञो मनसे शं वराय को अर्क इन्द्र कतमः स होता ॥४॥
ज्यांनी सृष्टीची आणि पराक्रमाची महान कर्मे केली आहेत ते इंद्रदेव सध्या कुठे बरे आहेत ? ते सध्या कोणत्या लोकांमध्ये वावरत आहेत किंवा कोणत्या प्रजाजनांमध्ये निवास करत आहेत हे इंद्रदेवा ! आपला कोणता यज्ञ आपल्या मनाला सुख देणारा आणि सर्वात श्रेष्ठ ठरेल? कोणते स्तुतियुक्त स्तोत्र आपल्याला सर्वात जास्त प्रिय आहे. आपल्याला प्रिय असलेली हविष्यान्नाची आहुती प्रदान करणारा अग्रणी यज्ञकर्ता कोण बरे आहे ?॥४ ॥

इदा हि ते वेविषतः पुराजाः प्रत्नास आसुः पुरुकृत्सखायः ।
ये मध्यमास उत नूतनास उतावमस्य पुरुहूत बोधि ॥५॥
हे अनेक भक्तगणांद्वारे बोलावल्या जाणाऱ्या इंद्रदेवा ! प्राचीन काळात जन्मलेले आणि यज्ञकर्मात व्यस्त असलेले जे जुने ऋषी-मुनी होते, ते सर्व आपल्या महान कर्माच्या कृत्याचे मित्रच होते, त्याचप्रमाणे जे मध्य काळातील ऋषी झाले आणि जे अगदी नवीन

काळातील ऋषी आहेत, तेही आपले मित्र आहेत म्हणून हे अनेकांद्वारे बोलावल्या जाणाऱ्या पुरुहूत इंद्रदेवा ! आपण सर्व थरातील भक्तगणांच्या आणि आमच्यासारख्या अलीकडच्या भक्तगणांच्या प्रार्थनेची दखल घ्यावी आणि आम्हाला सुबुद्धी द्यावी ही विनंती. ॥५ ॥

तं पृच्छन्तोऽवरासः पराणि प्रत्ना त इन्द्र श्रुत्यानु येमुः ।
अर्चामसि वीर ब्रह्मवाहो यादेव विद्म तात्त्वा महान्तम् ॥६॥
हे इंद्रदेवा ! आजच्या काळातील आम्ही नवीन भक्तगण आपल्या त्या महान आणि प्राचीन पराक्रमांबद्दल पूर्वजांना विचारतो आणि दिव्य कथांचे व नियमांचेच श्रवण करून त्यानुसारच आचरण करतो. हे स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करणाऱ्या पराक्रमी वीर इंद्रदेवा ! आम्हा भक्तगणांना आपल्याबद्दल जे काही माहिती आहे तितक्याच ज्ञानाने आपण महान आहात हे जाणून आम्ही आपली स्तुती आणि उपासना करत आहोत ॥६ ॥.

अभि त्वा पाजो रक्षसो वि तस्थे महि जज्ञानमभि तत्सु तिष्ठ ।
तव प्रत्नेन युज्येन सख्या वज्रेण धृष्णो अप ता नुदस्व ॥७॥
हे इंद्रदेवा ! आसुरी शक्तींच्या राक्षसांचे हे अक्राळविक्राळ हिंसक सैन्य आम्हा भक्तगणांच्या चहूबाजूला पसरलेले आहे. आमच्या मागे दृढ उभे राहून आमचे आपण रक्षण करावे ही विनंती. हे इंद्रदेवा ! आपल्या प्राचीन काळापासूनच्या आणि नेहमीच अचूक साथ देणाऱ्या मित्रासारख्या आपल्या वज्राने या सर्व राक्षसी शक्तींना दूर हुसकावून लावावे ही विनंती ॥७ ॥

स तु श्रुधीन्द्र नूतनस्य ब्रह्मण्यतो वीर कारुधायः ।
त्वं ह्यापिः प्रदिवि पितृणां शश्वद्बभूथ सुहव एष्टौ ॥८॥
हे पराक्रमी, शूरवीर, भक्तगणांचे संवर्धन करणाऱ्या इंद्रदेवा ! स्तुतियुक्त स्तोत्रे रचणाऱ्या या नवीन काळातील भक्तगणांच्या प्रार्थना आपण नक्की श्रवण कराव्यात कारण आपण प्राचीन काळापासूनच आमच्या पूर्वजांचे जिवलग मित्र आणि बंधू राहिले आहात आणि यज्ञाच्या आवाहनात हाक मारताच नेहमीच सहज धावून आला आहात. ॥८ ॥

प्रोतये वरुणं मित्रमिन्द्रं मरुतः कृष्वावसे नो अद्य ।
प्र पूषणं विष्णुमग्निं पुरंधिं सवितारमोषधीः पर्वताँश्च ॥९॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आजच्या या पावन दिवशी आमच्या रक्षणासाठी आणि कल्याणासाठी वरुणदेव, मित्रदेव, इंद्रदेव आणि मरुद्गणांना अनुकूल करून घ्यावे. त्याचप्रमाणे सृष्टीचे पोषण करणाऱ्या पूषन् देव, विष्णुदेव, अग्निदेव, बुद्धीची देवता पुरंधि, आणि सविता देवता त्याचबरोबर सर्व औषधी वनस्पती आणि पर्वतांनाही आमच्या सहाय्यासाठी प्रकर्षाने अनुकूल करून घ्यावे ही विनंती ॥९ ॥

इम उ त्वा पुरुशाक प्रयज्यो जरितारो अभ्यर्चन्त्यर्कैः ।
श्रुधी हवमा हुवतो हुवानो न त्वावाँ अन्यो अमृत त्वदस्ति ॥१०॥
हे महान शक्तिशाली (पुरुशाक) पूजनीय इंद्रदेवा ! हे स्तुतियुक्त स्तोत्रांनी स्तुती करणारे यज्ञकर्ते भक्तगण आपली आदरपूर्वक आळवणी करत आहेत. अंतःकरणापासून आपल्याला हाक

मारणाऱ्या भक्तगणांची आवाहने आपण श्रवण करावी ही विनंती. हे अमर इंद्रदेवा! या संपूर्ण विश्वात आपल्यापेक्षा श्रेष्ठ आणि दुसरा कोणीही रक्षक नाही ॥१० ॥

नू म आ वाचमुप याहि विद्वान्विश्वेभिः सूनो सहसो यजत्रैः ।
ये अग्निजिह्वा ऋतसाप आसुर्ये मनुं चक्रुरुपरं दसाय ॥११॥
हे सर्व काही जाणणाऱ्या, अरणीच्या मंथनातून प्रकट झालेल्या बलपुत्रा इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या प्रार्थनेचा स्वीकार करण्यासाठी त्वरित यावे ही विनंती. सत्याचे पालन करणाऱ्या आणि अग्निदेवांच्या माध्यमातून हविष्यान्नाची आहुती स्वीकारणाऱ्या, मनुष्याला, मनूला, शत्रूंचा पराभव करण्यासाठी आणि त्यांच्यावर विजय मिळवण्यासाठी नेहमीच श्रेष्ठ स्थान आणि शक्ती दिली आहे अशा सर्व पूजनीय देवांनाही आपण सोबत घेऊन यावे ही विनंती ॥११ ॥

स नो बोधि पुरएता सुगेषूत दुर्गेषु पथिकृद्विदानः ।
ये अश्रमास उरवो वहिष्ठास्तेभिर्न इन्द्राभि वक्षि वाजम् ॥१२॥
हे सर्वज्ञ इंद्रदेवा ! आपण आम्हा भक्तगणांसाठी जागृत होऊन, पुढारी बनून, सोप्या तसेच कठीण आणि संकटमय मार्गावर आमच्यासाठी मार्गदर्शक व्हावे ही विनंती. आपले सामर्थ्यशाली, कधीही न थकवणारे, अत्यंत वेगाने रथ वाहून नेणाऱ्या अश्वांना रथाला जोडून आमच्याकडे यावे आणि आम्हाला समृद्धी, अन्न आणि विजय प्राप्त करून द्यावा ही विनंती. ॥१२ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२२

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

य एक इद्धव्यश्चर्षणीनामिन्द्रं तं गीर्भिरभ्यर्च आभिः ।
यः पत्यते वृषभो वृष्ण्यावान्त्सत्यः सत्वा पुरुमायः सहस्वान् ॥१॥

संपूर्ण मानवी प्रजेमध्ये (चर्षणीनाम्) जे एकमेव निश्चितच यज्ञाच्या आहुती स्वीकारण्यास आणि आदरपूर्वक आवाहन करण्यास योग्य आहेत, अशा इंद्रदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी पूजा करतो. हे इंद्रदेवा ! आपण संपूर्ण सृष्टीच्या भक्तांवर इच्छांचा वर्षाव करणारे, अथांग पराक्रमाने युक्त, परम सत्यस्वरूप, शूर योद्ध्यांचे रक्षण करणारे अद्भुत बुद्धी असलेले आणि शत्रूंना पराभूत करणारे अत्यंत शक्तिशाली देव आहात. ॥१॥

तमु नः पूर्वे पितरो नवग्वाः सप्त विप्रासो अभि वाजयन्तः ।
नक्षद्दाभं ततुरिं पर्वतेष्ठामद्रोघवाचं मतिभिः शविष्ठम् ॥२ ॥

शत्रूंना जिंकणाऱ्या, संकटातून तारून नेणाऱ्या, अढळ पर्वतासारख्या स्थिर राहणाऱ्या, सत्यवचनी हे इंद्रदेवा ! आमचे प्राचीन पूर्वज असलेल्या, नऊ महिन्यांचा यज्ञ पूर्ण करणाऱ्या नवग्वा आणि सात महान ज्ञानी (सप्तर्षी) ऋषींनी, अन्न शक्ती आणि समृद्धी मिळवण्याच्या इच्छेने त्यांच्या शुद्ध बुद्धीने, आपली स्तुती केली होती ॥२ ॥

तमीमह इन्द्रमस्य रायः पुरुवीरस्य नृवतः पुरुक्षोः ।
यो अस्कृधोयुरजरः स्वर्वान्तमा भर हरिवो मादयध्यै ॥३ ॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना, पुत्र-पौत्रांनी युक्त, विपुल अन्न, अथांग ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आपण भक्तगणांना अक्षय्य आयुष्य देणारे, चिरतरुण प्रकाशाने युक्त, 'हरी' नावाचे अश्व जोडलेल्या रथावर आरूढ होणारे आहात. आपण आम्हा भक्तगणांना आनंदित आणि तृप्त करण्यासाठी ते कधीही नष्ट न होणारे श्रेष्ठ ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥३ ॥

तन्नो वि वोचो यदि ते पुरा चिज्जरितार आनशुः सुम्नमिन्द्र ।
कस्ते भागः किं वयो दुध्र खिद्रः पुरुहूत पुरूवसोऽसुरघ्नः ॥४॥
शत्रूंचे दमन करणाऱ्या (खिद्रः), अनेक भक्तांद्वारे आदरपूर्वक आळवल्या जाणाऱ्या (पुरुहूत), अफाट धनाचा साठा असणाऱ्या (पुरूवसो) आणि असुरांचा वध करणाऱ्या (असुरघ्नः) हे इंद्रदेवा ! प्राचीन काळातील ऋषींना जशी आपली कृपा आणि सुख प्राप्त झाले होते त्याविषयी आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना स्पष्ट करून सांगावे ही विनंती. आपला यज्ञातील आवडता भाग कोणता आहे? आपल्याला कोणत्या हविष्यान्नाची आहुती प्रिय आहे? ते सांगावे जेणेकरून आम्ही भक्तगण ते आपल्याला अर्पण करू शकू॥४ ॥

तं पृच्छन्ती वज्रहस्तं रथेष्ठामिन्द्रं वेपी वक्वरी यस्य नू गीः ।
तुविग्राभं तुविकूर्मिं रभोदां गातुमिषे नक्षते तुम्रमच्छ ॥५ ॥

हातात वज्र धारण करणाऱ्या, रथावर विराजमान असणाऱ्या, शक्तिमान हे इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्यासाठीच आमची स्तुतियुक्त स्तोत्रे प्रकट करत आहोत. आपण शत्रूंना पराभूत करणारे महान कर्म करणारे,भक्तांना आश्रय देणारे आहात. आम्हा भक्तगणांची ही वाणी अन्न, समृद्धी आणि प्रगतीचा मार्ग शोधण्यासाठीच आपल्याकडे धाव घेत आहे ॥५ ॥

अया ह त्यं माययया वावृधानं मनोजुवा स्वतवः पर्वतेन ।
अच्युता चिद्वीळिता स्वोजो रुजो वि दृळ्हा धृषता विरप्शिन् ॥६ ॥
हे अथांग ऐश्वर्य आणि शक्ती असणाऱ्या (विरप्शिन्) इंद्रदेवा ! स्वतःच्याच सामर्थ्याने बलवान असणारे आपण आपल्या अद्भुत बुद्धीने शत्रूचे दमन करण्यासाठी निरंतर वृद्धिंगत होत आहात. आपण मनाच्या वेगाने चालणाऱ्या आपल्या वज्राने, कधीही न हलणाऱ्या (अच्युत), अत्यंत मजबूत आणि दृढ असणारे शत्रूंचे किल्ले आणि पर्वतांना आपल्या धैर्याने व प्रचंड शक्तीने पूर्णपणे तोडून उद्ध्वस्त करता ॥६ ॥

तं वो धिया नव्यस्या शविष्ठं प्रत्नं प्रत्नवत्परितंसयध्यै ।
स नो वक्षदनिमानः सुवह्मेन्द्रो विश्वान्यति दुर्गहाणि ॥७ ॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आपल्या कल्याणासाठी, नवीन स्तुतियुक्त स्तोत्रांनी आणि बुद्धीने, अत्यंत प्राचीन आणि अथांग शक्तिशाली इंद्रदेवांना आपण पूर्वजांप्रमाणेच प्रसन्न व संतुष्ट करूया. अमर्याद सामर्थ्यवान आणि संकटांतून सुखरूपपणे

तारून नेणारे इंद्रदेव आपल्या सर्वांना संपूर्ण कठीण संकटांतून आणि दुर्गम मार्गांवरून सुखरूप पार करतील ॥७ ॥

आ जनाय द्रुह्वणे पार्थिवानि दिव्यानि दीपयोऽन्तरिक्षा ।
तपा वृषन्विश्वतः शोचिषा तान्ब्रह्मद्विषे शोचय क्षामपश्च ॥८ ॥

हे शक्तिशाली, इच्छांचा वर्षाव करणाऱ्या इंद्रदेवा ! द्रोह करणाऱ्या दुष्टांना आणि ज्ञान, सत्याचा द्वेष करणाऱ्यांना आपण आपल्या शस्त्रांना प्रदीप्त करून भस्मसात करावे ही विनंती. पृथ्वीलोक आकाशलोक आणि अंतरिक्ष या तिन्ही लोकांमध्ये जे कोणी त्रास देत असतील त्यांना आपण आपल्या प्रखर ज्वाळांनी भस्मसात करावे ही विनंती ॥८॥

भुवो जनस्य दिव्यस्य राजा पार्थिवस्य जगतस्त्वेषसंदृक् ।
धिष्व वज्रं दक्षिण इन्द्र हस्ते विश्वा अजुर्य दयसे वि मायाः॥९॥

हे अत्यंत तेजस्वी, अविनाशी इंद्रदेवा ! आपण देवतांच्या प्रजेचे आणि या पृथ्वीवरील सृष्टीचे एकमेव सर्वश्रेष्ठ राजे आहात. हे चिरतरुण इंद्रदेवा ! आपण उजव्या हातात शत्रूचा थरकाप उडवणारे वज्र धारण करावे आणि भक्तांना छळणाऱ्या शत्रूंच्या सर्व कपटी व मायावी शक्तींचा पूर्णपणे नाश करावा ही विनंती. ॥९ ॥

आ संयतमिन्द्र णः स्वस्तिं शत्रुतूर्याय बृहतीममृध्राम् ।
यया दासान्यार्याणि वृत्रा करो वज्रिन्त्सुतुका नाहुषाणि॥१०॥

हे वज्रधारी इंद्रदेवा! आपण शत्रूंचा पराभव करण्यासाठी, आमचे रक्षण करण्यासाठी आम्हा भक्तगणांना कधीही खंडित न होणारे , महान आणि अक्षय्य सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती. या समर्थ्याच्या बळावर आपण अधर्मी शत्रूंच्या, आर्यांच्या आणि नहुष वंशातील दुष्ट शक्तींना चिरडून टाकले ॥१० ॥.

स नो नियुद्भिः पुरुहूत वेधो विश्ववाराभिरा गहि प्रयज्यो ।
न या अदेवो वरते न देव आभिर्याहि तूयमा मद्र्यद्रिक् ॥११॥

हे अनेकांद्वारे आदरपूर्वक बोलावल्या जाणाऱ्या पुरुहूत इंद्रदेवा ! सर्व प्रकारचे इच्छित धन व अन्न घेऊन आपल्या नियुत नावाचे अश्व जोडलेल्या रथावर स्वार होऊन आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. आपल्या या अश्वांचा वेग कोणताही देव किंवा देव न मानणारा अधर्मी शत्रू कधीही रोखू शकत नाही. अशा आपल्या अश्वांवर आरूढ होऊन आमच्याकडे अभिमुख होऊन अत्यंत वेगाने यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥११ ॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२३

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

सुत इत्त्वं निमिश्ल इन्द्र सोमे स्तोमे ब्रह्मणि शस्यमान उक्थे ।
यद्वा युक्ताभ्यां मघवन्हरिभ्यां बिभ्रद्वज्रं बाह्वोरिन्द्र यासि ॥१॥

हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! जेव्हा सोमरस सिद्ध केला जातो आणि स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण केले जाते तेव्हा आपण सोमरसात आणि प्रार्थनेत पूर्णपणे रमून जाता. अथवा जेव्हा आपण आपल्या दोन्ही हातांमध्ये वज्र धारण करून, रथाला जुंपलेल्या 'हरी' नावाच्या दोन वेगवान अश्वांवर स्वार होऊन शत्रूंवर चालून जाता तेव्हा आपण आमचे रक्षण करता ॥१॥

यद्वा दिवि पार्ये सुष्विमिन्द्र वृत्रहत्येऽवसि शूरसातौ ।
यद्वा दक्षस्य बिभ्युषो अबिभ्यदरन्धयः शर्धत इन्द्र दस्यून् ॥२॥

हे इंद्रदेवा ! जेव्हा आपण आकाशातील शूर योद्ध्यांच्या संग्रामात सोमरस अर्पण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे वृत्रासुरासारख्या महान संकटापासून रक्षण करता अथवा आपण स्वतः निर्भय (अबिभ्यत्) राहून, घाबरलेल्या पराक्रमी भक्तगणांसाठी गर्विष्ठ आणि आव्हान देणाऱ्या दुष्ट दस्यूंना आपल्या अधीन करता तेव्हा आम्ही आपला जयजयकार करतो ॥२ ॥

पाता सुतमिन्द्रो अस्तु सोमं प्रणेनीरुग्रो जरितारमूती ।
कर्ता वीराय सुष्वय उ लोकं दाता वसु स्तुवते कीरये चित् ॥३॥

हे शक्तिमान, पराक्रमी इंद्रदेवा ! आपण सिद्ध केलेल्या सोमरसाचे रक्षण करता, स्तुती करणाऱ्या भक्तगणांना प्रगतीच्या मार्गावर पुढे नेता. सोमरस अर्पण करणाऱ्या पराक्रमी भक्तगणांचा सुखाचा मार्ग मोकळा करून त्यांना विपुल धन ऐश्वर्य आपण प्रदान करता ॥३ ॥.

गन्तेयान्ति सवना हरिभ्यां बभ्रिर्वज्रं पपिः सोमं ददिर्गाः ।
कर्ता वीरं नर्यं सर्ववीरं श्रोता हवं गृणतः स्तोमवाहाः ॥४॥

हे इंद्रदेवा ! आपण, आपल्या हरी नावाच्या अश्वांवर स्वार होऊन प्रातःकालीन, माध्यंदिन व सायंकालीन यज्ञामध्ये हातामध्ये वज्र धारण करून, सोमरस प्राशन करण्यासाठी भक्तगणांना गायींचे दान देण्यासाठी, त्वरेने पोहोचता. आपण स्तुती करणाऱ्या भक्तगणांना त्यांच्या हिताचे रक्षण करणारी पराक्रमी संतती प्रदान करावी ही विनंती. आपण भक्तगणांची स्तुतियुक्त स्तोत्रे स्वीकारून त्यांच्या हाका श्रवण करता ॥४ ॥

अस्मै वयं यद्धावान तद्विविष्म इन्द्राय यो नः प्रदिवो अपस्कः।
सुते सोमे स्तुमसि शंसदुक्थेन्द्राय ब्रह्म वर्धनं यथासत् ॥५॥

हे इंद्रदेवा ! आपण आम्हा भक्तगणांसाठी प्राचीन काळापासून कल्याणकारी कर्मे केली आहेत म्हणून आम्ही आपल्याला सिद्ध केलेला सोमरस अर्पण करतो. सोमरस सिद्ध करताना आम्ही

भक्तगण आपली मनापासून प्रार्थना करतो जेणेकरून आमच्या या प्रार्थनेमुळे आपले बळ आणि सामर्थ्य वाढू दे ॥५ ॥

ब्रह्माणि हि चकृषे वर्धनानि तावत्त इन्द्र मतिभिर्विविष्मः ।
सुते सोमे सुतपाः शंतमानि राण्ड्या क्रियास्म वक्षणानि यज्ञैः ॥६॥

हे सोमरस प्राशन करणाऱ्या इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपली आमच्या बुद्धीने आणि स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपली मनःपूर्वक सेवा करतो कारण आमच्या प्रार्थना आणि आमची स्तोत्रे आपले सामर्थ्य वाढवणारी आहेत. सोमरस सिद्ध करण्याच्या पवित्र प्रसंगी यज्ञांच्या माध्यमातून आम्ही भक्तगण आपल्यासाठी अत्यंत सुखदायक, कल्याणकारी आणि आनंददायी कर्मे करुन आपल्याला तृप्त करू॥६ ॥

स नो बोधि पुरोळाशं रराणः पिबा तु सोमं गोऋजीकमिन्द्र ।
एदं बर्हिर्यजमानस्य सीदोरुं कृधि त्वायत उ लोकम् ॥७॥

हे इंद्रदेवा ! आपण प्रसन्न होऊन आमच्या या पुरोडाशाचा, हविष्यान्नाच्या आहुतीचा स्वीकार करावा, आमची प्रार्थना ऐकून जागृत व्हावे, गायीच्या दुधामध्ये मिसळलेल्या मधुर सोमरस प्राशन करावा ही विनंती. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या दर्भासनावर आपण विराजमान व्हावे आणि आपल्यावर मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या आम्हा भक्तगणांसाठी विस्तीर्ण व समृद्ध मार्ग निर्माण करावा ही विनंती ॥७॥

स मन्दस्वा ह्यनु जोषमुग्र प्र त्वा यज्ञास इमे अश्नुवन्तु ।
प्रेमे हवासः पुरुहूतमस्मे आ त्वेयं धीरवस इन्द्र यम्याः ॥८॥

हे पराक्रमी इंद्रदेवा ! आपण आमच्या या यज्ञाने आपल्या इच्छेनुसार प्रसन्न व्हावे ही विनंती. आम्ही भक्तगणांनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाची आहुती आपल्याला प्राप्त होवो. हे अनेकांनी आदरपूर्वक बोलावल्या गेलेल्या पुरुहूत इंद्रदेवा ! आम्ही करत असलेल्या यज्ञामधील आमच्या प्रार्थना आपल्यापर्यंत पोहोचोत आणि आमच्या या भक्तीपूर्ण प्रार्थना आमच्या रक्षणासाठी आपल्यासाठी समर्पित आहेत ॥८॥

तं वः सखायः सं यथा सुतेषु सोमेभिरीं पृणता भोजमिन्द्रम् । कुवित्तस्मा असति नो भराय न सुष्विमिन्द्रोऽवसे मृधाति ॥९॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आपण सिद्ध केलेला सोमरस उदार आणि ऐश्वर्यशाली इंद्रदेवांना अर्पण करून त्यांना तृप्त करावे. इंद्रदेव सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तगणांचे कल्याण आणि रक्षण करण्याच्या बाबतीत कधीही उपेक्षा करत नाही ॥९ ॥

एवेदिन्द्रः सुते अस्ताव सोमे भरद्वाजेषु क्षयदिन्मघोनः । असद्यथा जरित्र उत सूरिरिन्द्रो रायो विश्ववारस्य दाता॥१०॥

भरद्वाज कुळातील ऋषींनी, सोमरस सिद्ध करत असताना , शत्रूंचा नाश करणाऱ्या आणि परम ऐश्वर्यशाली इंद्रदेवांचीच खरोखर स्तुती केली आहे. हे इंद्रदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या भक्तगणांसाठी आणि यज्ञाचे आयोजन करणाऱ्या विद्वानांसाठी, सर्वांना हव्या असणाऱ्या सर्वोत्कृष्ट धन प्रदान करावे ही विनंती॥१०॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२४

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

वृषा मद इन्द्रे श्लोक उक्था सचा सोमेषु सुतपा ऋजीषी ।
अर्चत्र्यो मघवा नृभ्य उक्थैर्ह्रुक्षो राजा गिरामक्षितोतिः ॥१॥
हे इंद्रदेवा ! आपण शुद्ध सोमरस स्वीकारणारे, सोमरस प्राशन करून अत्यंत हर्षित आणि शक्तिशाली होणारे, भक्तगणांच्या इच्छापूर्ती करणारे आहात. भक्तगणांची स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्याला प्रसन्न करतात. स्तोत्रांद्वारे पूजिले जाणारे, ऐश्वर्यवान हे इंद्रदेवा ! आपण आकाशात राहणारे राजे असून स्तुती करणाऱ्या भक्तगणांना अक्षय्य रक्षण प्रदान करता ॥१॥

ततुरिर्वीरो नर्यो विचेताः श्रोता हवं गृणत उर्व्यूतिः ।
वसुः शंसो नरां कारुधाया वाजी स्तुतो विदथे दाति वाजम् ॥२ ॥
हे इंद्रदेवा ! आपण शत्रूंचा वेगाने नाश करणारे, (ततुरिः)महापराक्रमी, हितकर्ता, सर्वज्ञानी (विचेताः) स्तुती करणाऱ्या भक्तगणांची हाक ऐकून त्यांचे रक्षण करणारे सर्वव्यापी आहात. भक्तगणांना संपत्ती देणाऱ्या , पालन पोषण करणाऱ्या , यज्ञामध्ये स्तुती केल्या गेलेल्या हे इंद्रदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना उत्तम अन्न, बळ आणि समृद्धी (वाजम्) प्रदान करावी ही विनंती ॥२ ॥

अक्षो न चक्र्योः शूर बृहन्प्र ते मह्ना रिरिचे रोदस्योः ।

वृक्षस्य नु ते पुरुहूत वया व्यूतयो रुरुहुरिन्द्र पूर्वीः ॥३॥
हे पराक्रमी इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे रथाचा आस रथाच्या दोन्ही चाकांना आपल्या नियंत्रणात धरून ठेवतो, त्याचप्रमाणे आपण आपल्या सामर्थ्याने आकाशलोकांना आणि पृथ्वीलोकांना नियंत्रणात ठेवले आहे. हे अनेक भक्तांद्वारे आदरपूर्वक बोलावल्या जाणाऱ्या पुरुहूत इंद्रदेवा ! ज्या प्रमाणे मोठ्या आणि प्राचीन वृक्षांच्या फांद्या चहूबाजूला पसरतात त्याप्रमाणे आपले कृपाछत्र आम्हा भक्तगणांवर सर्वत्र पसरावे ही विनंती ॥३ ॥

शचीवतस्ते पुरुशाक शाका गवामिव स्रुतयः संचरणीः ।
वत्सानां न तन्तयस्त इन्द्र दामन्वन्तो अदामानः सुदामन्
॥४॥
हे सामर्थ्यवान, उत्तम दान देणाऱ्या, कर्म कुशल इंद्रदेवा ! ज्या प्रमाणे गायींना संचार करण्यासाठी सर्व मार्ग मोकळे असतात त्याप्रमाणे आपले सहाय्य करण्याचे सर्व मार्ग खुले असतात. वासरांना बांधणाऱ्या दोऱ्यांप्रमाणे, आपली शक्ती स्वतः मुक्त राहून शत्रूंना बांधते.॥४ ॥

अन्यदद्य कर्वरमन्यदु श्वोऽसच्च सन्मुहुराचक्रिरिन्द्रः ।
मित्रो नो अत्र वरुणश्च पूषार्यो वशस्य पर्येतास्ति ॥५ ॥
हे इंद्रदेवा !आपले आजचे कर्म वेगळे आहे आणि उद्याचे कर्म नक्कीच काहीतरी वेगळं असेल. जे आज असत्य किंवा अदृश्य आहे ते आपण आपल्या शक्तीने क्षणार्धात सत्य किंवा दृश्य रूपात बदलता. आपल्या या परिवर्तनाच्या चक्रात, मित्रदेव, वरुणदेव, पूषन् देव आणि अर्यमादेवता या सृष्टीला नियंत्रणात

ठेवत आम्हा भक्तगणांचे रक्षण करतात आणि सन्मार्ग दाखवतात ॥५ ॥

वि त्वदापो न पर्वतस्य पृष्ठादुक्थेभिरिन्द्रानयन्त यज्ञैः ।
तं त्वाभिः सुष्टुतिभिर्वाजयन्त आजिं न जग्मुर्गिर्वाहो अश्वाः ॥६॥

हे इंद्रदेवा! ज्याप्रमाणे पर्वताच्या शिखरावरून (उंचावरून) पाण्याचे प्रवाह चहूबाजूंनी वेगाने खाली वाहतात, त्याप्रमाणे आम्ही स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करणारे भक्तगण आमच्या श्रेष्ठ मंत्रांनी आणि यज्ञांनी आपल्याला आमच्या यज्ञस्थळी घेऊन येतात. विजयाची आणि अन्नाची इच्छाअसणाऱ्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तोत्रे आपल्याकडे युद्ध भूमीवर वेगाने धावणाऱ्या अश्वांप्रमाणे आपल्या दिशेने धाव घेतात ॥६ ॥

न यं जरन्ति शरदो न मासा न द्याव इन्द्रमवकर्शयन्ति ।
वृद्धस्य चिद्वर्धतामस्य तनूः स्तोमेभिरुक्थैश्च शस्यमाना ॥७॥

हे इंद्रदेवा ! आपल्याला सरणारे शरद ऋतू (वर्षे) म्हातारे करू शकत नाहीत, दिवस आपले सामर्थ्य क्षीण करू शकत नाही. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तोत्रांनी आपली प्रशंसा करत असताना आपले अत्यंत समृद्ध महान सामर्थ्य आणखी वृद्धिंगत होवो ॥७ ॥

न वीळवे नमते न स्थिराय न शर्धते दस्युजूताय स्तवान् ।

अज्रा इन्द्रस्य गिरयश्चिदृष्वा गम्भीरे चिद्भवति गाधमस्मै ॥८ ॥

हे भक्तगणांद्वारे स्तुती केल्या जाणाऱ्या इंद्रदेवा ! आपण स्वतःला बलवान समजणाऱ्या शत्रूसमोर झुकत नाही, दस्यूंनी फूस लावलेल्या गर्विष्ठ शत्रूंसमोर कधीही नतमस्तक होत नाही. आपल्या पराक्रमापुढे मोठे आणि प्रचंड पर्वत थरथर कापतात. आपल्या आश्रयाला आलेल्या भक्तांसाठी खोल पाण्याचा डोह देखील उथळ बनतो. ॥८ ॥

गम्भीरेण न उरुणामत्रिन्प्रेषो यन्धि सुतपावन्वाजान् ।
स्था ऊ षु ऊर्ध्व ऊती अरिषण्यन्नक्तोर्व्युष्टौ परितक्म्यायाम् ॥९ ॥

हे सोमरस प्राशन करणाऱ्या इंद्रदेवा ! आपण आपल्या गंभीर आणि विशाल सामर्थ्याने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अन्न, समृद्धी आणि विजय प्रदान करावा ही विनंती. कोणत्याही शत्रूंकडून कधीही पराभूत न होणाऱ्या (अरिषण्यन्) हे इंद्रदेवा ! रात्रीचा अंधार संपून जेव्हा पहाट होते, त्या संधिप्रकाशाच्या वेळी आपण आमचे रक्षण करण्यासाठी आमच्या पाठीशी दृढपणे आणि जागरूकतेने उभे रहावे ज्यामुळे आमची कोणतीही हानी होणार नाही ॥९॥

सचस्व नायमवसे अभीक इतो वा तमिन्द्र पाहि रिषः ।
अमा चैनमरण्ये पाहि रिषो मदेम शतहिमाः सुवीराः ॥१० ॥

हे सोमरस प्राशन करणाऱ्या इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या पाठीशी उभे राहून युद्धाच्या प्रसंगी सर्व बाजूंनी

आमचे रक्षण करावे ही विनंती. शत्रूंपासून आमचा बचाव करावा, घरात असताना किंवा प्रवासात असताना आम्हा भक्तगणांचे सर्व संकटापासून रक्षण करावे ही विनंती. आपल्या कृपेने आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या वीर पुत्रांसह आनंदाने आणि सुखाने शतायुषी होवू. ॥१०॥

।। अथ षष्ठं मण्डलम्।।

सूक्त-२५

ऋषि- भरद्वाज बार्हस्पत्य **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

या त ऊतिरवमा या परमा या मध्यमेन्द्र शुष्मिन्नस्ति ।
ताभिरू षु वृत्रहत्येऽवीर्न एभिश्च वाजैर्महान्न उग्र ॥१॥
हे अथांग सामर्थ्य असलेल्या (शुष्मिन्,) पराक्रमी इंद्रदेवा ! आपल्याकडे असलेल्या कनिष्ठ, मध्यम आणि उच्च स्वरूपाच्या दिव्य संरक्षण साधनांनी आणि शक्तीने आपण वृत्रासुराच्या वध प्रसंगी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे उत्तम प्रकारे रक्षण करावे ही विनंती. आम्हाला नवनवीन अन्नाने आणि समृद्ध बलवान आणि महान बनवावे ही विनंती ॥१॥

आभिः स्पृधो मिथतीररिषण्यन्नमित्रस्य व्यथया मन्युमिन्द्र ।
आभिर्विश्वा अभियुजो विषूचीरार्याय विशोऽव तारीर्दासीः ॥२॥
हे इंद्रदेवा ! आपण स्वतःला सुरक्षित ठेवून, (अरिषण्यन्) आपल्या दिव्य शक्तीने, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर चालून येणाऱ्या हिंसक शत्रूंच्या सैन्याचा पराभव करावा, त्यांचा क्रोध आणि अहंकार मोडून काढावा ही विनंती. चारी दिशांनी आमच्यावर चालून येणाऱ्या आमच्या सर्व शत्रूंना पळवून लावावे, सत्यनिष्ठ भक्तांच्या प्रजेचे रक्षण करण्यासाठी आसुरी प्रवृत्तींच्या शत्रूंना पूर्णपणे नमवून टाकावे ही विनंती. ॥२ ॥

इन्द्र जामय उत येऽजामयोऽर्वाचीनासो वनुषो युयुज्रे ।

त्वमेषां विथुरा शवांसि जहि वृष्ण्यानि कृणुही पराचः ॥३ ॥
हे इंद्रदेवा ! आमच्या जवळचे असूनही शत्रु बनलेले, आणि परके असलेले आमचे शत्रू हिंसक प्रवृत्तीने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर समोरून आक्रमण करण्यासाठी आले आहेत, त्या सर्व शत्रूंचे बळ आणि आणि त्यांचा पराक्रम दुर्बळ करून नष्ट करावा, त्यांना युद्धभूमी मधून पळून जाण्यास भाग पाडावे ही विनंती. ॥३ ॥

शूरो वा शूरं वनते शरीरैस्तनूरुचा तरुषि यत्कृण्वैते ।
तोके वा गोषु तनये यदप्सु वि क्रन्दसी उर्वरासु ब्रवैते ॥४॥
हे इंद्रदेवा ! रणभूमीवर जेव्हा दोन शूर योद्धे एकमेकांवर मात करण्यासाठी एकमेकांशी भिडतात तेव्हा आपल्या कृपेने एक योद्धा दुसऱ्या योद्ध्याला आपल्या शरीराच्या बळाने आणि अस्त्रांच्या तेजाने पराभूत करतो. जेव्हा पुत्रपौत्रांच्या रक्षणासाठी, पशुधनाच्या प्राप्तीसाठी, पाणी आणि सुपीक जमिनीसाठी दोन सैन्ये गर्जना करत एकमेकांवर तुटून पडतात तेव्हा आपली शक्तीच त्यांना विजय मिळवून देते. ॥४ ॥

नहि त्वा शूरो न तुरो न धृष्णुर्न त्वा योधो मन्यमानो युयोध ।
इन्द्र नकिष्ट्वा प्रत्यस्त्येषां विश्वा जातान्यभ्यसि तानि ॥५॥
हे इंद्रदेवा ! स्वतःला कितीही श्रेष्ठ मानणारा कोणताही शूर पुरुष, वेगवान आक्रमण करणारा शत्रू, किंवा अत्यंत धाडसी योद्धा आपल्याशी युद्ध करू शकलेला नाही. या संपूर्ण सृष्टीत आपल्या तोडीचा किंवा आपल्याशी मुकाबला करू शकेल असा कोणीही अस्तित्वात नाही. जगामध्ये जितक्याही वस्तु किंवा जीव उत्पन्न

झाले आहेत, त्या सर्वांवर केवळ आपलेच नियंत्रण आहे आणि आपण त्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहात.॥५ ॥

स पत्यत उभयोर्नृम्णमयोर्यदी वेधसः समिथे हवन्ते ।
वृत्रे वा महो नृवति क्षये वा व्यचस्वन्ता यदि वितन्तसैते॥६ ॥
हे इंद्रदेवा ! जेव्हा दोन विस्तीर्ण आणि पराक्रमी सैन्ये परस्परांशी भिडतात, तेव्हा बुद्धीमान यज्ञकर्ते भक्तगण युद्धामध्ये संरक्षणासाठी आपलेच आवाहन करतात. ज्याप्रमाणे आपण वृत्रासारख्या महाशत्रूचा नाश करण्यासाठी युद्धाचे नियंत्रण केले त्याप्रमाणे आपण दोन्ही बाजूंच्या योद्ध्यांच्या शारीरिक बळाचे आणि पराक्रमाचे नियंत्रण करता ॥६ ॥

अध स्मा ते चर्षणयो यदेजानिन्द्र त्रातोत भवा वरूता ।
अस्माकासो ये नृतमासो अर्य इन्द्र सूरयो दधिरे पुरो नः॥७॥
हे इंद्रदेवा ! जेव्हा यज्ञकर्ते भक्तगण यज्ञ करतात तेव्हा आपण त्यांचे रक्षणकर्ते आणि दुःखात निवारण करणारे आश्रयदाते व्हावे ही विनंती. हे इंद्रदेवा ! आम्हा भक्तगणांचे जे श्रेष्ठ शूर आणि विद्वान नायक आहेत जे आपल्याला सर्वांच्या कल्याणासाठी अग्रभागी ठेवतात आपण, त्यांचे आणि आमचे रक्षण करावे ही विनंती ॥७ ॥

अनु ते दायि मह इन्द्रियाय सत्रा ते विश्वमनु वृत्रहत्ये ।
अनु क्षत्रमनु सहो यजत्रेन्द्र देवेभिरनु ते नृषह्ये ॥८ ॥
हे पूजनीय, यज्ञास पात्र इंद्रदेवा ! वृत्रासुराचा वध करण्यासाठी आणि शत्रूंचा विनाश करण्यासाठी देवतांनी आपल्या महान आणि

विराट इंद्रियांच्या शक्तीसाठी (महे इन्द्रियाय) सामर्थ्य दिले. वृवृत्रासुराच्या वधाच्या युद्धामध्ये संपूर्ण सृष्टीचे बळ आपल्या पाठीशी उभे राहिले. हे इंद्रदेवा ! दुष्टांवर विजय मिळवण्यासाठी आणि मानवांच्या रक्षणासाठी सर्व देवतांनी आपल्याला सर्वोच्च क्षात्रतेज आणि शत्रूला नमवणारे बळ प्रदान केले ॥८ ॥

एवा नः स्पृधः समजा समत्स्विन्द्र रारन्धि मिथतीरदेवीः ।
विद्याम वस्तोरवसा गृणन्तो भरद्वाजा उत त इन्द्र नूनम् ॥९॥
हे इंद्रदेवा ! आपण आमच्याशी स्पर्धा करणाऱ्या आणि आमच्यावर चालून येणाऱ्या दुष्ट, दैवी गुण नसलेल्या हिंसक शत्रूंचा पूर्णपणे पराभव करावा ही विनंती. आपली स्तुतियुक्त स्तोत्रे पठण करणाऱ्या आम्हा भरद्वाज कुलातील वंशजांना आपल्या दिव्य रक्षणा द्वारे, ज्ञान आणि सुरक्षित निवास प्रदान करावा ही विनंती ॥९ ॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे एकोणिसावे वर्ष आहे. प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे एकोणिसावे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६६ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता

देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६६ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), **आसावरी काकडे** (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३४)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(२२),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(२७ भूगोल विज्ञान

विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१९)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)





आधीचे मंडल
वाचण्यासाठी
इथे क्लिक करा